


# अनुशासनपर्व

# महाभारत

मराठी अनुवाद

खंड ४६

श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड सेहेचाळीसावा

## अनुशासन पर्व भाग पहिला

## अनुशासन पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० नोव्हेंबर २०२१**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मूळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंन्नासांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सेहेचाळीसावा खंड, अनुशासन पर्व भाग पहिला, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये व्यावहारिक नितीशास्त्राची उदाहरणं आणि महाभारतातील अखेरचा इतिहास सांगितला आहे. त्याशिवाय महादेव आख्यान आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र आणि अध्यात्म विद्या समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. तरी अनुशासन पर्वाच्या दुसर्या भागत थोडा परिचयवाजा उल्लेख आहे कर्मकांडाचा. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुपं कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ

रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे व्यासांना ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं, हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो मात्र अप्रतिम आहे. आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, त्यांच्या पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. नितीशास्त्रात माणसाने समाजत कसे वागावे त्याबद्दलचे मार्गदर्शन आहे. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा, कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235‌0.html

## - अनुशासन पर्व भाग पहिला सुरू -

# अनुशासन पर्व

नारायणाला आणि नराला लवून नमस्कार करून व देवी माता सरस्वतीला वंदन करून जय असा घोष करून युधिष्ठीर बोलतो, "अहो पितामहा, असें सांगतात कीं, मनाची शांती एक तरल गोष्ट असते, त्यावरील आपले अनेक विचार मी आधीसुद्धा ऐकले आहेत, तरी मला मनाच्या शांतीच्या तरलपणाबद्दल कांहीं शंका आहेत. मला अजून ती साध्य झालेली नाही. तुम्ही मनाला कसे शांत करावे त्याबाबत कांहीं युक्त्या सांगत होते. परंतु, केवळ अशी माहिती समजून उपयोग होत नाही. म्हणून ती खोखरच कशी साध्य करावी ते आपण मला समजावून द्याल तर बरे होईल. आपले शरीर बाणांनी भरलेले आहे ते पाहून, त्याच्या जखमा वहात आहेत हे दिसत असतांना मला मनाची शांती कशी प्राप्त होणार"?

"आपली हि परिस्थिती पाहून मला फार मानसिक यातना होत आहेत. मी समजतो कीं, तुमच्या ह्या स्थितीला मी सर्वस्वी जबाबदार आहे. अनेक राजे आणि त्यांचे युवराज माझ्यामुळें मृत्यूमुखी पडले आहेत. कौरवांच्या आतताईपणामुळे मला युद्ध करण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. कौरव माझ्या दृष्टीने मोठे भाग्यवान समजले पाहिजेत कारण त्यांना तुमची ही अवस्था पहावी लागत नाही. मी तुमच्या आणि इतर अनेक गुणी जनांच्या मृत्यूला कारणीभूत आहे ह्या जाणीवेने माझी मनशांति संपली आहे, कांही सुचत नाही. आमच्या घराण्यातील सर्वात खराब असलेल्या दुर्योधनाने त्याच्या सगळ्या भावांचा नाश केला केवळ क्षत्रिय कर्तव्याच्या बहाण्याने तो त्याना लढावयाला लावत होता. तसे झाले नसते तर हा संहार झालाच नसता. तरी तो तुम्हास असा पडलेला पहात नाही. असें सगळे पहाता मला मृत्यू यावा असें वाटते. आम्ही सगळे बंधू ह्या समरात मेलो असतो तर बरे झाले असते असे मला सारखे वाटत असते. मला समजते कीं, विधात्याने आम्हा भावंडाना पापशक्तींचा नाश करण्यासाठी जन्माला घातले आहे. जर तुम्हाला माझे कल्याण करावयाचे असेल तर ह्या पापातून आमची सुटका कशी होईल

ते सांगा ज्यामुळें पुढच्या जन्मीसुद्धा आम्हाला त्या पापाची शिक्षा भोगावी लागणार नाही".

भिष्म त्याला सांगतात, "अरे भाग्यवंता, तू ह्या सगळ्यासाठी स्वतःला का दोष देत असतोस ते मला समजत नाही. हे सगळे दैव, वेळ आणि कर्मभोग ह्यांचे परिणाम असतात हे माहीत असूनही कां तू सदैव स्वताला त्रास करून घेत असतोस. त्यांचे परिणाम (दैव, वेळ आणि कर्म) तरल असतात. ते सहजपणे समजणे इंद्रियांना शक्य नसते. ह्या संदर्भात मी तुला एक प्राचीन किस्सा ऐकवतो. त्यात मृत्यू आणि गौतमी ह्यांचे सभाषण झाले होते वेळ आणि पारध्या मध्ये ज्यात सर्प सुद्धा बोलत असतो. भिष्म सांगू लागतो ती कथा, "एके काळी एक वृद्धा होती जिचे नांव होते गौतमी. तिला चांगली मनशांती प्राप्त झाली होती. तरी एकदा ती पहाते कीं तिच्या मुलाला एक सर्प चावतो आणि त्या दंशामुळें तो मरतो. त्यावेळी एक अर्जुनका नांवाचा पारधी रागावलेला असतो. तो त्या सापाला दोरीने बांधून गौतमीच्या पुढे आणतो. तो तिला बोलतो, "अगं म्हातारे, ह्या सापाने तुझ्या मुलाला दंश केला आहे. त्यांमुळे तुझा मुलगा मेला आहे. मला सांग मी ह्या सापाला कसे मारू? त्याला आगीत टाकू कां, तुकडे करू? ह्याला जगण्याचा अधिकार राहिलेला नाही".

गौतमी त्याला बोलते, "अरे अर्जुनका तुला कांहींच समजत नाही कां? त्याला सोडून दे. त्याला मारू नकोस. त्याला त्याच्या नशिबावर सोडून दे. त्याच्या नशिबात काय लिहीले आहे ते माहीत नाही. उगाच त्याला मारण्याचे पाप करू नकोस. पुण्याच्या मार्गाने जाणारे अध्यात्मिक शक्तीमुळें ह्या भवसागरात बुडत नाहीत त्याउलट विनाकारण पाप पदरी बांधणारे तुझ्यासारखे त्यात बुडून जात असतात हे समजून घे. अरे अर्जुनका, त्याला मारून माझा मुलगा परत येणार नाही. त्याला न मारण्याने तू पाप करण्यापासून दूर रहातोस हे महत्वाचे आहे. त्याला जीवंत ठेवण्यातच तुझे भले आहे. उगीच एका जीवाचा खून करून तू कां अधःपतित होऊ पहात आहेस. ते ऐकून पारधी तिला बोलतो, "अहो, मला चांगले आणि वाईट हे समजते. मुक्या प्राण्याला मारण्याच्या विरुद्ध शहाणे असतात. तुझे बोलणे कांहींना योग्य वाटेल पण जो अशा मृत्यूमुळे दुःखी झाला आहे त्याचे विचार वेगळे असणार. म्हणून मी ह्या सापाला मारणार

आहे. कारण तो आणखीन कोणाला दंश करण्याची शक्यता आहे. जे मनाची शांतता मिळावी म्हणून प्रयत्न करतात ते काळाला दोष देत असतात. परंतु, व्यवहारी माणसे (रजोगुणी) अशा परिस्थितीत जशास तसे ह्या नियमाचा उपयोग करणे योग्य समजतात. म्हणून मी त्यास मारले कीं, तुझ्या मुलाच्या मृत्यूची त्याला शिक्षा दिल्याचे समाधान तुझ्या अंतर्मनाला प्राप्त होईल".

गौतमी त्याला सांगते, "अरे पारध्या, माझ्या सारखी माणसं (सत्त्वगुणी) असें जशास तसे वागणे नेहमीच योग्य समजत नाहीत, त्या सापाने माझ्या मुलाला दंश केले कारण त्याचा पाय त्या सापावर चुकून पडला, ते त्याच्या स्वभावामुळें, माझ्या मुलावर कोणत्याही प्रकारच्या सुडामुळे त्याने ते केलेले नाही. आम्ही (सत्त्वगुणी) नेहमी सदाचाराने वागणे रास्त समजतो. माझ्या मुलाचा मृत्यू त्याच्या कर्मभोगाचा एक हिस्सा होता. तो साप केवळ कारणमात्र होता. हे मला चांगले माहीत असल्याने मी त्या सापाला मारण्याच्या विरुद्ध आहे. त्याने न्याय होणार नाही. उलट अन्याय होईल व तू नाहकपणे त्या पापाचा धनी होशिल.

सात्त्विक मनुष्य सुडाने वागत नाहीत. तसे केल्याने दुःख वाढते. म्हणून तूसुद्धा त्या सापाला भूतदयेच्या नियमानुसार सोडून दे".

पारधी तिला बोलतो, "माझ्या मते त्याला मारण्याने मी मोठे श्रेय मिळवणार आहे कारण अनेक जीवांचे त्याने प्राण वाचणार आहेत. जसे यज्ञात आहुति द्यावी तसे त्याला मारणे मी उचित समजतो. शत्रूला मारणे हितकारक समजले आहे, त्यामुळें पुण्य प्राप्त होते असे समजले जाते. त्या नालायक सापाला मारण्याची मला परवानगी देण्यामुळे तुलासुद्धा मोठे श्रेय मिळणार आहे. तुझ्या अध्यात्मिक स्थितीत सुधार होईल".

गौतमी त्याला बोलते, "शत्रूला छळण्याने व त्यानंतर मारण्याने कोणते पुण्य मिळणार आहे? आणि जर त्याला मुक्त केले तर कोणते पाप मला लागेल ते सांग"? "हा सगळा विचारांचा फरक आहे कारण तू रजोगुणी आहेस व त्या प्रमाणे तू विचार करत आहेस आणि मी सत्त्वगुणी असल्याने मी तशाप्रकारे विचार करत आहे. त्या सापाला मुक्त करून तू थोडे श्रेय प्राप्त करावे असें मला वाटते".

पारधी बोलतो, "अनेक निष्पाप प्राणी ह्याच्या मरण्याने वाचणार आहेत. ह्या एकाला जीवनदान करून आपण अनेक जीवांच्या मृत्यूला कारणीभूत होणार आहोत जर हा आता सुटला. पुण्यावान लोक पाप्याला त्यांच्या दैवावर सोडण्याची भाषा करतात, म्हणून त्याला मारणेच श्रेयस्कर आहे असें मला वाटते, तेंच त्याचे दैव ठरेल".

गौतमी त्याला बोलते, "ह्या सापाला मारून माझा मुलगा परत येणार नाही आणि त्यांमुळें दुसरा कोणताही चांगला उद्देश साध्य होणार नाही, म्हणून मी पुन्हा सांगते, त्या सापाला जीवनदान दे. पारधी म्हातारीला सांगतो, इंद्रांने वृत्राला मारून यज्ञातील मोठा हिस्सा मिळवला आणि महादेवानी दक्षाचा यज्ञ तोडून त्याचा यज्ञाचा हिस्सा मिळवला होता, म्हणून मी सुद्धा त्या सापाबद्दल कोणताही द्वेष न बाळगता त्याला मारून त्याचे श्रेय (अनेक जीवांना वाचवल्याचे) मिळवू इच्छितो. त्यात तूसुद्धा सामील होशिल तर बरे होईल".

भिष्म पुढे सांगतात, "उच्च विचाराची गौतमी पारध्याच्या सतत सांगण्यांने विचलित होत नाही. ती ठामपणे सांगते कीं, त्या पापात मी सामील होणार नाही".

तो साप पारध्याच्या रस्सीने करकचून बांधलेला होता. त्यामुळे त्याला श्वास घेणे मुष्किल जात होते. तरी त्यातून तो मोठ्या कठीण परिस्थितीत माणसाच्या आवाजात बोलतो, "अरे मूर्ख अर्जुनका, ह्यात माझा कोणता दोष तू पहात आहेस? मी माझ्या मनाने ते कृत्य केले नव्हते. मी अशाबाबत स्वताच्या मनाने कांहीं करत नसतो. मृत्यूदेवांने मला सांगितले म्हणून ते झाले. मला त्या मुलाबाबत अनुकंपा असूनही दिलेले कार्य मला करावेच लागले. म्हणून ज्या पापामुळे तो मेला ते पाप त्याचे होते गेल्या जन्माचे, जे तो फेडत होता मृत्यू स्वीकारून. आता तो त्याच्या त्या पापापासून मुक्त झाला आहे हे सत्य आहे. तू समजून घे".

पारधी बोलतो, "तू जे केलेस ते पापकृत्य होते हे निश्चित, परंतु, तू सांगतोस कीं, ते तू तुझ्या इच्छेने केले नव्हते, तू केवळ कारणमात्र होतास. परंतु, तुला माहीत आहे कीं, कुंभार जेव्हां मडके घडवतो तेव्हां त्याच्या सह ते चाक , काठी, माती असें सगळे त्याला कारणीभूत असतात. त्याप्रमाणे ह्या कृत्यात तू, इच्छा असो अगर नसो, सक्रीय होतास हे मान्य करावे लागेल. म्हणून तुला मृत्यू ही शिक्षा होणे क्रमप्राप्त आहे,

असे मला वाटते. म्हणून मी तुला मारणे जरूरीचे आहे. तू स्वतः कबूल केले आहेस कीं, तू त्यात सामील होतास".

साप त्याला उत्तर देतो, "तुझ्या उदाहरणातील माती, चाक, काठी हे स्वतंत्रपणे काम करत नसतात त्याप्रमाणे ह्या बाबतीतसुद्धा मी एकमेव घटक नव्हतो म्हणून मला दोष लागत नाही. त्याकरतां मला त्या मृत्यूसाठी जबाबदार ठरवता येणार नाही. ज्याअर्थी मी ते कृत्य ठरवून केले नव्हते परंतु, अपघाताने झाले होते, मला पापसुद्धा लागत नाही. कारण पाप तेव्हांच लागते जेव्हा ते कृत्य करण्याचा इरादा ठरवून असतो. जे अपघाताने किंवा इतर कारणाने घडते तेव्हां त्या कृत्याचे श्रेय करणार्याला लाभत नाही. म्हणून तू मला मारणे न्यायाला धरून होणार नाही".

पारधी बोलतो, "तू मुख्य कर्ता नाहीस असे गृहीत धरले तरी तो तुझ्या दंशाने मेला हे सत्य तू नाकारत नाहीस. म्हणून तू त्याच्या मृत्यूचे प्रमुख कारण ठरतोस हे नाकारता येणार नाही. म्हणून तुला मरावे लागेल. आता तुला काय सांगावयाचे आहे ते सांग".

साप बोलतो, "वरकरणी कांहीं कारण दिसो अगर न दिसो, जे घडले त्याचे कांहींतरी कारण असणारच. जरी ते समजत नसले तरी ते होते हे मान्य करावे लागते. म्हणून मला ज्या कारणांने त्याला दंश करावा लागला ते मुख्य दोषी आहे हे तुला मान्य करावे लागेल".

पारधी बोलतो, "अरें मूर्खा, तुला जीवंत रहाण्याची एवढी हौस आहे कीं, कांहींही मुद्दे मांडत आहेस, तुझा मृत्यू माझ्या हातून निश्चित आहे".

साप बोलतो, "अरे पारध्या, तू माझी आहुति देण्याच्या गोष्टी करत होतास तेव्हां तुला माहित आहे कीं, तू ह्या यज्ञात ऋग्विज ठरतोस व त्याला आहुतिचा हिस्सा मिळत नाही हे तू जाणतोसच. म्हणून तू मला खाऊ शकणार नाहीस".

भिष्म पुढे सांगतात, "सापाच्या बरोबर मृत्यू देव (यमदूत) होता तो त्या सापाला बोलतो, "तू काळाच्या आदेशांने ते केले आहेस. आपण दोघे त्या बालकाच्या मृत्यूस प्रत्यक्ष कारणीभूत नाहीत. त्या मृत्यूचे कारण त्या बालकाचे गतजन्माचे कृत्य होते. आपली गत अशी असते कीं वार्यावर तरंगणारे ढग, जेथे तो नेईल तेथे जावे लागते. काळाच्या प्रेरणेने सत्त्व, रज आणि तम हे गुण उत्तजित होत असतात. सगळे सृष्टीतील

चराचर ह्या तीन गुणांच्या प्रभावाखाली काम करत असतात. हा साप त्याच्या तमोगुणांने प्ररित असा वागत होता. सगळे जग तसेंच वागत असते. आकाशातील सूर्य, चंद्र, विष्णू, सगळी पंचमहाभूतं, सगळे यज्ञ, अग्नी, मित्र, पर्जन्य, आदिती, वसू, सगळ्या नद्या आणि समुद्र काळाच्या आज्ञेत असतात. जे जे उत्पन्न झाले ते ते यथावकाश नष्ट होणारेच असते व त्यासाठी कोणीतरी कारणमात्र असावा लागतो. त्यासाठी कोणी दोषी नसतो. परंतु, जे पापबुद्धीने केले जाते त्यासाठी करणारा जबाबदार असतो व त्यासाठी तो भोगत असतो. जसा हा मुलगा त्याच्या गतकर्माच्या पापामुळे अकाली मेला. अरे सापा, तू मला त्या मृत्यूचा जबाबदार ठरवतोस कां? मी ह्या मृत्यूला जबाबदार नाही".

भिष्म पुढे सांगतो, "ते संभाषण साप आणि मृत्यू ह्यांच्यात झाल्यावर तो साप अर्जुनकाला बोलतो, "पहा ते मृत्यूचे ऐक बोल. तोसुद्धा त्या बालकाच्या मृत्यूला जबाबदार नाही. म्हणून मला त्या कारणाने तू मारलेस तर ते अयोग्य होईल. मी निर्दोष आहे मला सोडून दे".

पारधी बोलतो, "मी सगळे ऐकले आहे, परंतु, तू पुर्णपणे निर्दोष ठरू शकत नाही. मृत्यू आणि तू दोघे त्या बालकाच्या मरण्याला जबाबदार अहात. मृत्यूच्या कावेबाजपणात तू अडकला आहेस हे मी समजतो. तू मृत्यूच्या प्रभावाखाली ते कृत्य केलेस म्हणून तू दोषी ठरतोस माझ्या मते".

मृत्यू बोलतो, "आम्ही दोघे स्वतंत्रपणे काम करत नसतो. आम्ही काळाच्या आदेशाचे पालन करत असतो. जर तू नीटपणे पाहिलेस तर तुझ्या लक्षात येईल".

पारधी बोलतो, "तुम्ही सांगता कीं, तुम्ही दोघे काळाच्या आदेशात अहात मग मला सांगा सुख आणि क्रोध, तुम्हाला कां असतात"?

मृत्यू सांगतो, "जे घडते ते काळाच्या प्रभावाखालीच होत असते. म्हणून काळ सगळ्या घटनांचा कर्ता असतो ह्या सृष्टीमध्ये. जे आम्ही करतो काळाच्या आदेशांने त्यात आम्हाला सुख अथवा क्रोध असें कांहींच नसते. म्हणून तू आम्हाला दोष देऊ शकणार नाही".

भिष्म पुढे सांगतात, "त्यावेळी काळ तेथे येतो. त्या नैतिकतेच्या चर्चेत तो भाग घेतो. तेथे साप, अर्जुनका आणि मृत्यू जमलेले होते".

काळ सांगतो, त्या मृत्यूस हा साप आणि मृत्यू दोघेही जबाबदार नाहीत. अरे पारध्या, मी त्या मृत्यूची जबाबदारी घेतो. त्या बालकाच्या गतकर्मामुळें ते घडले आहे. माणसाचे कर्म त्याचे पुढील जन्माचे जीवन ठरवत असते. जे चांगले आणि वाईट घडते ते त्याच्याच कर्माचे फळ असते. इतर जे कारणीभूत दिसतात ते फक्त कारणमात्र असतात. म्हणून त्या बालकाच्या कर्मानुसार तो मृत झाला आहे. बाकीचे केवळ साधन मात्र होते काळाच्या हातातील. परंतु, जर ते साधन त्या कर्मांत गुंतले तर मात्र ते साधन त्या गुंतण्यामुळें एकाद्या नवीन कर्मभोगास कारणीभूत ठरते". त्यानंतर गौतमी जी ते सगळे ऐकत होती अर्जुनकाला सांगते, "अरे पारध्या, मी तुला सांगितले होते तेंच काळांनी सांगितले". आता तुम्ही सगळे आपापल्या ठिकाणी जावे. पारधी सापाला सोडून देतो.

भिष्म पुढे सांगतात, "अरे राजा युधिष्ठीरा, ह्या कथेतून तुला समजले असेल कीं, जे मृत्यू घडले ते त्या योद्ध्यांच्या गतकर्मानुसार योग्य झाले होते. माणसें स्वर्गात जातात किंवा नरकात जातात त्यांच्या कर्मामुळे ते होत असते. म्हणून तू जे बोलतोस कीं तू मारलेस ते चुकीचे आहे. असे समजणे हा तुझा अहंकार आहे. हे जर तू चांगले समजलास तर तुला मनःशांति मिळण्यास कांहीं अडचण होणार नाही. दुर्दैवाने तुझा अहंकार तुला सुचवतो कीं, तू त्याच्या मृत्यूस कारणीभूत आहेस. जर तुझा अहंकार निमाला तर तसे समजणे बंद होईल.

वैशंपायन पुढे सांगतात, ते ऐकल्यावर युधिष्ठीर शांत झाला. त्यानंतर दुसरे प्रश्न विचारू लागला.

अनुशासन पर्व भाग एक संपला.

# अनुशासन पर्व
## भाग दोन

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहो पितामहा, आपण फार हुशार अहात, आपण सगळे वेद अभ्यासले आहेत. मी तुमच्या तोंडून अशा बर्याच कथा ऐकल्या आहेत. परंतु, माझे समधान झालेले नाही. म्हणून मला आणखीन कांहीं अशाच बोधक कथा ऐकवल्या तर मोठी कृपा होईल. त्यात मला समजून घ्यावयाचे आहे ते असें कीं, कोणी गृहस्थ मृत्यू जिंकू शकतो कां? त्या संदर्भातील कांहीं कथा तपशिलात असतील तर त्या ऐकवा".
भिष्म सांगू लागतात, हा फार प्राचीन इतिहास आहे जो मी तुला सांगणार आहे. त्यातून तुला गृहस्थ त्याच्या पुण्याईने कसा मृत्यू जिकतो ते समजेल. प्रजापति मनुला एक पुत्र होता. त्याचे नांव होते इक्ष्वाकू त्याला शंभर मुलगे झाले होते सगळे सूर्या सारखे तेजस्वी होते. त्याचा दहावा मुलगा, त्याचे नांव होते दसवा. तो मोठा पवित्र होता. तो महिश्मतिचा राजा होता. त्याचा मुलगा मोठा पवित्र मनाचा होता तो सतत धर्म आणि दान करण्यात व्यस्त असें. त्याचे नांव होते मदिरस्व. त्याचे राज्य सगळ्या पृथ्वीवर पसरलेले होते. तो वेदाचा व्यासंग करत असे. त्याशिवाय शस्त्रांचा सुद्धा तज्ज्ञ होता. त्याचा मुलगा होता द्युतिमत. त्याचे वैभव अवर्णनीय होते. त्याचा मुलगा सुविर इंद्रासारखा श्रीमंत होता. त्याला एक मुलगा होता जे अजिंक्य होता. त्याचे नांव होते सुदरज्य. तो दुसरा इंद्र होता पृथ्वीवर. त्याचा मुलगा अग्नीसारखा चमकत असें. त्याचे नांव होते दुर्योधन. तो राजर्षी होता. त्याच्या राज्यात, महिश्मतिमध्ये कधी पाऊस पाण्याचे कमी नव्हते. इंद्र त्याच्यावर संतुष्ट होता. तो कधी युद्धातून पळून गेला नव्हता. त्या राजाच्या सगळ्या नगरी धन धान्याने भरलेल्या असतं. रत्न, जवाहिर ह्यांचे कधी कमी नव्हते. त्याच्या राज्यात कोणी कंजूष नव्हता. कोणी आजारी होत नव्हते. कारण त्याची जनतासुद्धा पुण्य कर्मात (माणूसकी, चांगुलपणा, भूतदया, कृतज्ञता आणि प्रामाणिकपणा, ह्याला पंचव्रत असें म्हणतात) गुंतलेली असे. तो बोलण्यात मधूर, निगर्वी, शांत, दयाळू, माणूसकी ह्यांने पूर्ण असा होता. तो यज्ञ

करत असें. त्यातून दानधर्म करत असें. त्याचे इंद्रियसंयमन उत्तम होते, तो गुणी जनांचा चाहता होता. तो कधी कोणाचा उपमर्द करत नसे. त्याचा वेद आणि वेदांताचा अभ्यास उत्तम होता. स्वर्गीय नदी नर्मदा त्याच्या प्रेमात पडली. त्यांना एक कमलनयना मुलगी झाली. तिचे नांव होते सुदर्शना होते. सगळ्या मानव समाजात अशी सुंदर कन्या जन्मली नव्हती. अशी दुर्योधनाची कन्या होती. अग्नी सुदर्शनाशी लग्न करण्याचे ठरवतो. तो एका ब्राह्मणाचे रुप घेऊन तिला मांगणी करतो. परंतु, दुर्योधन त्याला कन्या देण्यास तयार नसतो कारण तो दरिद्री ब्राह्मण होता आणि त्याच्या तोलामोलाचा नव्हता. त्यामुळे रागावलेला अग्नी त्याच्या यज्ञातून पसार झाला. असा अग्नी यज्ञातून नाहीसा होणे म्हणजे मोठे पाप घडले आहे असें समजले जात होते त्या काळात. राजा अशारितीने अग्नी होमातून नाहीसा होण्याचे करण शोधण्यासाठी ब्राह्मणांना विचारणा करतो. कोणाचे पाप आहे, राजाचे कां त्या यज्ञ करणार्या ब्राह्मणांचे त्याचा शोध होवू लागतो. त्याबरोबर यज्ञ करणारे ब्राह्मण अग्नीदेवाची आराधना करू लागतात. तो यज्ञ देव त्यांच्यापुढे प्रकट होतो. तो अग्निदेव ब्राह्मणांना सांगतो कीं, त्याने सुदर्शनाचा हात मागितला होता पण राजाने ते मान्य केले नाही म्हणून मी यज्ञातून गायब झालो आहे. ते ऐकून सगळे ब्राह्मण नवल करतात दुसर्या दिवशी राजाला अग्नी गायब होण्याचे कारण सांगतात. ते ऐकून राजा अतिप्रसन्न होतो व ब्राह्मणांना सांगतो, त्याला ते लग्न मंजूर आहे पण अग्नीला हुंडा द्यावा लागेल त्यासाठी. तो असा कीं, अग्नी सदैव त्याच्याकडेच राहील. त्या वेळेपासून अग्नी सदैव महिश्मति नगरात असतो. तो अग्नी सहदेवाने राजसूय यज्ञाच्यावेळी दक्षिणेकडे गेला असतांना पाहिला आहे. राजा त्याची कन्या अग्नीला दान करतो. तिच्या अंगावर सुंदर दागिने घातलेले होते. अग्नी त्यामुळें राजावर अतिप्रसन्न होतो. त्यांना एक मुलगा होतो. त्या मुलाचे नांव सुदर्शन होते. तो चंद्रासारखा देखणा होता. लहानपणीच तो ब्रह्मज्ञानी झाला.

आणखीन एक कथा सांगतो, एक ओघावत नावांचा राजा होता. तो नृगाचा आजोबा होता. त्याला एक कन्या होती तिचे नांव होते ओघवती. त्याला मुलगा होता त्याचे नांव होते ओघरथ. ओघवत त्याची कन्या सुदर्शनाला देतो. ते दोघे गृहस्थी जीवन जगत होते. त्यांचे वस्तीस्थान होते कुरूक्षेत्री. तो बुद्धीमान राजपुत्र ठरवतो कीं, तो

गृहस्थाश्रमात राहून मोक्षसिद्धी प्राप्त करील. अग्नीचा मुलगा ओघवतीला बोलतो, माझ्या प्रिय सुदर्शना, तू कधींच असें कांहीं करणार नाहीस ज्यामुळे चांगुलपणा होणार नाही. सदैव त्या व्रतात रहाशिल. अतिथींचा कधी अपमान होणार नाही. कोणी जे मागेल ते द्यावयाचे ठरते. अगदी प्राण मागितला तर तोसुद्धा देण्याचे ठरते. कारण गृहस्थांसाठी त्यापेक्षा मोठा धर्म नसतो. तो तिच्याकडून तसे वचन घेतो. त्याची पत्नी बोलते कीं, ती त्यास वचनबद्ध आहे. आपण जे सांगाल ते मी करणार आहे. ओघवती त्याला बोलते. त्यानंतर मृत्यू सुदर्शनाला धरण्यासाठी येणार असतो. तो सुदर्शन आणि ओघवती ह्यांच्या वागण्यात कोठे खोट आहे ते शोधू लागतो. असेंच एकदा सुदर्शन वनात सरपण आणण्यासाठी गेला असतांना ब्राह्मणाच्या रुपात मृत्यू ओघवतीला भेटतो. ओघवती त्या अतिथीचे स्वागत करते. ती विचारते, "आपण काय कामासाठी आला अहात. मी आपल्याला कांहीं मदत करू शकते कां"? तो ब्राह्मण तिला सांगतो कीं, त्याचे तिच्याशीच काम आहे. जर तुम्ही गृहस्थाश्रमाची कर्तव्ये योग्य प्रकारे पालन करणार असला पाहिजे. त्यासाठी तुला तुझे शिल माला द्यावे लागेल. ती त्याला इतर बर्याच गोष्टी देण्याचे आश्वासन देते परंतु, तो ब्राह्मण त्याची मागणी धरून बसते. ती समजते कीं, तो ब्राह्मण त्याची मागणी सोडण्यास तयार नाही. परंतु, तिला फार शरम वाटते. तरी तिने पतिला जे वचन दिले होते त्या प्रमाणे ती त्या ब्राह्मणाच्या पुढे तयार होते. त्या सुमारास अग्नीचा मुलगा त्याचे सरपण गोळा करण्याचे उरकून घरी परतत असतो. मृत्यू त्याचवेळी सुदर्शनाच्या जवळ असतो, त्याच्या प्रतिक्रीया पहात असतो. कोठे तो चूक करतो ते तो पहात असतो. तो त्याच्या घरी आल्यावर त्याच्या बायकोला हांक मारतो. ती त्याला दाद देत नाही. तो विचारतो कीं, ती कोठे बाहेर गेली आहे कां"? ती त्या ब्राह्मण रूपातील मृत्यूच्या मिठीत होती. ती स्वताला भ्रष्ट समजू लागते. ती कांहीं बोलत नाही. तो विचारतो कीं त्याची शुद्ध पत्नी आता कोठे गेली आहे. तो हांका मारत असतो पण ती त्याला साथ देत नाही. त्यावेळी तो ब्राह्मण त्याला उत्तर देतो कीं, त्याच्याकडे ब्राह्मण अतिथी आला आहे व त्याची बायको त्या अतिथीची सेवा करत आहे. जर तुला तिचे माझी सेवा करणे मान्य नसेल तर तू जे पाहिजे ते करू शकतोस. ते होत असतांना मृत्यू त्या सुदर्शनाकडे त्याचा लोखंडी सोटा घेऊन जातो. परंतु, तो

पहातो कीं, सुदर्शन कोणत्याही प्रकारचा क्रोध न दाखवता त्याला अनुमोदन देतो. अशारितीने सुदर्शन त्याचे गृहस्थी कर्तव्य, अतिथीची सेवा करण्याचे, करतो व त्यामुळें यमदूत खजिल होतो. गृहस्थाश्रमात जे कांहीं आहे ते अतिथीच्या सेवेसाठी असते ह्या तत्वानुसार तो वागतो. त्यानंतर तो ब्राह्मण जो साक्षात धर्म होता तेथून बाहेर येतो आणि सुदर्शनाला सांगतो कीं, ते सगळे मायावी होते तुझी परिक्षा घेण्यासाठी. तुझे कल्याण हो, असे तो त्याला आशिर्वाद देतो. धर्म त्याला बोलतो कीं, तू मृत्यूला जिंकले आहेस. तुझी पत्नी श्रेष्ठ आहे. कोणी तिला स्पर्श करू शकणार नाही. तुझी पत्नी एक नदी बनून राहिल आणि त्यात तीर्थक्षेत्री लोक स्नान करतील. तुम्ही दोघे तुमच्या शरीराने यमलोकांत जाल.

भिष्म पुढे सांगतो, इंद्र त्याचा हजार घोडे असलेला रथ घेऊन येतो. त्याला सांगतो गृहस्थाला अतिथी सेवा हांच धर्म आहे व तो तू आणि तुझ्या पत्नीने योग्य प्रकारे निभावला आहे. जो गृहस्थ लायक अतिथीची सेवा करणार नाही त्याचे पुण्य नष्ट होते. एवढे सांगून भिष्म पुढे बोलतो कीं, त्या कथेने गृहस्थाश्रमी कशा प्रकारे स्वर्गात जाऊ शकतो ते समजते.

अनुसाशन पर्व भाग दोन संपला.

# अनुशासन पर्व

## भाग तीन

युधिष्ठीर पुढे विचारतो, ब्राह्मण होणे फार अवघड असते. सगळ्या तिनही वर्णांमध्ये. तरी विश्वामित्र जन्माने क्षत्रिय असूनही (कर्माने) कसा ब्राह्मण झाले ते सांगा. मला तो इतिहास समजून घ्यावयाचा आहे. ते शक्तीमान ज्याचे पावित्र्य, तपोसामर्थ्य, वैराग्य अतुलनीय होते, ज्यानी वसिष्ठांचे शंभर मुलगे रागाच्या भरात एका फटक्यात ठार मारले, ज्यानी असंख्य राक्षसांना निर्माण केले, ज्यांची तुलना साक्षात काळाशी केली जाते, जे विद्वान कुशीक घराण्यातील होते, ज्या घराण्यात अनेक राजर्षी होऊन गेले होते, जे ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ होते, त्याने त्यांचे विश्व निर्माण केले होते, अशा घरात सुनसेफ जो रुचिकाचा मुलगा होता. ज्याचा एका यज्ञात बळी दिला होता अम्वरिषाने एकाद्या पशूप्रमाणे, त्याला विश्वामित्रानी मुक्ती दिली होती. हरिश्चंद्र ज्याने देवांना प्रसन्न केले होते एका यज्ञाच्या वेळी तो विश्वामित्राचा मुलगा होता. त्याचे पन्नास मुलगे शापीत झाले होते म्हणून चांडाळ झाले होते कारण त्यांनी त्यांच्या ज्येष्ठ भावाला देवव्रताला योग्य सन्मान दिला नव्हता. त्रिशंकू इक्ष्वाकूचा मुलगा वसिष्ठाच्या शापामुळे सुद्धा चांडाळ झाला होता. त्याला पुन्हा विश्वामित्र त्यातून मुक्त करतात. विश्वामित्राची एक नदी होती. त्या कौशिका नांवाच्या नदीवर अनेक ऋषी स्नान करण्यासाठी जात असतं. अशा विश्वामित्राचे तप भ्रष्ट करण्यासाठी रंभा इंद्राने पाठवली होती, त्या अप्सरेचा इरादा समजल्यावर तो ऋषी तिला शाप देऊन एका फत्तरात बदलून टाकतो. विश्वामित्राच्या भयाने वसिष्ठ स्वताला पाण वेलीने बांधून विपाशा नदीत झोकून देतो परंतु, तो त्यातून सुटतो आणि नदीच्या बाहेर येतो. त्यानंतर तो इंद्राची आराधना करतो तेव्हां इंद्र त्याला त्या शापातून मुक्त करतो. त्याशिवाय आकाशाच्या उत्तरेच्या दिशेत तो असा जातो की तो त्या सात ऋषींना आडवा जाईल. तो ध्रुवाला जो उत्तानपादाचा मुलगा होता, सुद्धा आव्हान देतो. अशी त्याची कर्तबगारी सर्वश्रूत आहे. अशी सगळी कर्तबगारी क्षत्रिय करत होते. म्हणून मला त्यांच्या नंतर ब्राह्मण होण्याच्या आग्रहाबद्दल फार कुतूहल

आहे. विशेष म्हणजे ह्याची देही तो ते सगळे कर्तब करत असें. असा क्षत्रिय अखेरीस ब्राह्मण कां होतो"?

"मला ते सगळे पुन्हा आपल्या मुखातून ऐकण्याची इच्छा आहे. आपण मला मातंगाची कथा जशी सांगितली तशीच हीसुद्धा सांगा. जर मातंग जो मुळात चांडाळ होता जरी मोठा योगीसुद्धा होता कधी ब्राह्मण होऊ शकला नव्हता. असे असतांना विश्वामित्र कसा ब्रह्माने ब्राह्मण म्हणून मान्य केला ते सांगा.

अनुशासन पर्व भाग तीन संपला.

# अनुशासन पर्व
# भाग चौथा

भिष्म सांगतात, "अरे पृथा, ऐक नीटपणे विश्वामित्र कसा क्षत्रियातून ब्राह्मण झाला. एके काळी भरत वंशांत अजमिदा नांवाचा राजा होऊन गेला होता. त्यांने अनेक यज्ञ केले होते. त्याचे चारित्र्य वाखाणण्यासारखे होते. त्याला एक मुलगा होता त्याचे नांव होते जन्हू. त्याच्या मुलीचे नांव होते जान्हवी (गंगा). त्याचा मुलगा होता जो ख्यातनाम होता आणि मोठा पवित्र होता त्याचे नांव होते सिंधूद्विप. त्याच्या मुलात राजर्षी वालकस्व झाला. त्याच्या मुलाचे नांव होते वल्लभ. तो धर्माचा अवतार होता. त्याचा मुलगा होता कुशिक. तोसुद्धा त्याच्या वाडवडलांप्रमाणे श्रेष्ठ होता. त्याची तुलना इंद्राशी करत असतं ऋषी. त्या कुशिकाला एक मुलगा होता त्याचे नांव होते गधी. गधी निपुत्रिक होता. त्याला मुलगा हवा होता. त्यासाठी तो तपस्या करण्याचे ठरवतो आणि अरण्यात जातो. तेथे वनवासात असतांना त्याला एक कन्यारत्न प्राप्त होते. तिचे नांव होते सत्यवती. तिचे सौंदर्य अप्रतिम होते. पुढे च्यवनाचा मुलगा ज्याचे नांव होते रुचिक जो भृगू कुळातील होता, गधीच्या मुलीचा हात लग्नासाठी मागतो. परंतु, गधी त्याची गरीबी पाहून तो प्रस्ताव नाकारतो. तो तेथून जात असतांना गधी त्याला सांगतो कीं, जर तो हुंडा देणार असेल तर तो त्याची सत्यवती त्याला बायको म्हणून देण्यास तयार आहे. त्यावर रुचिका त्याला बोलतो, "अहो राजे, आपल्याला काय हुंडा पाहिजे ते निःसंकोचपणे मला सांगा".

गधी सांगतो, "अरे भृगूच्या वंशजा, मला एक हजार अश्व असें पाहिजेत सर्वांगाने शुभ्र आहेत आणि त्या प्रत्येकाला एक कान काळा आहे".

भिष्म पुढे सांगतो, "ते ऐकल्यावर तो च्यवनाचा वंशज वरुणाला विनंति करतो कीं असे घोडे मिळवून आणावे. वरुण जलदेवता होती. तो त्याला सांगतो कीं वेगवान शुभ्र घोडे हजार ज्यांचे एक कान काळा आहे असें मला आणून दे. वरुण जो अदितीचा मुलगा होता ते मान्य करतो आणि तसे घोडे प्राप्त होतात. त्या प्रमाणे तसे घोडे गंगेच्या पाण्यातून बाहेर येतात. ते कन्यकुंज येथे घडते . म्हणून तेथील गंगेच्या किनार्यांला

अश्वतिर्थ असें सांगतात. रुचिका ते घोडे गधीला देतो. त्याला भिती वाटते कीं, आता आणखीन परीक्षा घेत बसले तर रुचिका शाप देईल त्या पेक्षा मुलगी देणे योग्य. गधी त्याची कन्या दागदागिन्यानी मढलेली त्याला दान करतो. ती राजकन्यासुद्धा प्रसन्न होते कारण तिला त्या उच्चकुळातील ब्राह्मण वर मिळाला होता. ऋषी रुचिका त्या मुलीच्या वागणूकीने प्रसन्न झाले आणि तिला कोणता वर पाहिजे असें विचारले. ती कन्या तिच्या आईला ते सांगते. तिची आई तिला बोलते, "जर तुला शक्य असेल तर माझ्यासाठीसुद्धा एक वर मागून पहा. तो ऋषी मलासुद्धा वर देऊ शकतो". ती कन्या तिच्या घरी जाते व आपल्या पतिला, रुचिकाला तिच्या आईची इच्छा सांगते. रुचिका तिला सांगतो कीं, मी इतका प्रसन्न आहे तुझ्यावर कीं मी तुझ्या आईची सुद्धा मनोकामना पूर्ण होण्याचा वर देत आहे. तो वर असा होता, तुम्ही दोघी माता व्हाल, तुमचे वंश वाढतील, त्यासाठी तुझी आई पिंपळाच्या झाडाला मिठी मारेल जेव्हां ती मासिक पाळीत असेल, तसेंच तू फणसाच्या झाडाला मिठी मारशिल. असें केले कीं, तुमच्या मनोकामना पूर्ण होतील. त्यानंतर तो एक पुजा करतो व त्यांना त्याचा प्रसाद खाण्यासाठी देतो. त्यानंतर रुचिकाची सासू तिच्या मुलीला सांगते कीं, ती तिचा प्रसाद आईला देईल व स्वतः आईचा प्रसाद घेईल. अशारितीने ऋषीच्या आज्ञेपेक्षा विपरित ते त्यांचे प्रसाद खातात. त्याच प्रमाणे त्या त्यांची झाडेसुद्धा बदलतात. त्यामुळे सत्यवती फणसाच्या झाडाला आणि तिची मुलगी पिंपळाच्या झाडाला मिठी मारतात. त्यांना दिवस जातात. ऋषी रुचिका आनंदी होतो. परंतु, तो तिला सांगतो कीं, त्या दोघींनी जी अदलाबदल केली ते चांगले केले नाही त्याचे भयंकर परिणाम लवकरच दिसून येतील. मी तुझ्या प्रसादात ब्राह्मणाचे फळ आणि तुझ्या आईच्या प्रसादात क्षत्रियाचे फळ घातले होते आता ते कसे येतात ते पहावे लागेल. ते अशासाठी कीं मला तू एका थोर ब्राह्मणाला जन्म द्यावा आणि तुझ्या आईने एका थोर क्षत्रियाला जन्म द्यावा असे योजलेले होते. परंतु तुम्ही ते प्रसाद अदलाबदल केले आहेत. त्यामुळे तुझी आई एका ब्राह्मणाला आणि तू एका क्षत्रियाला जन्म देणार अहात. अशारितीने मी दिलेल्या प्रसादाची अदलाबदल करून तुम्ही मोठी चूक केली आहे. त्या चुकीचे भयंकर पडसाद उमटणार हे समजल्यावर गधीची मुलगी चक्कर येऊन खाली पडते. त्यानंतर ती उठते व आपल्या

ऋषी पतिला विनंती करते कीं, ते मोठे सिद्ध ऋषी आहेत तेव्हां त्यावर कांहीं उपाय करावा. ती सुचवते कीं, असे कांही करा कीं, तो क्षत्रिय माझ्या पोटी जन्म घेणार नाही. त्या ऐवजी माझा नातू तसा क्षत्रिय व्हावा व माझ्या पोटी ब्राह्मणच जन्मावा. असे करून मला उपकृत करावे असे ती बोलते. त्यावर ऋषी तथास्तु असें बोलतो. त्यानंतर सत्यवती एका ब्राह्मणाला जन्म देते ज्याचे नांव जमदाग्नी होते. गधीची राणीसुद्धा जन्म देते एका क्षत्रियाला जन्म देते त्याचे नांव होते विश्वामित्र होते. पुढे तो तपस्या करून ब्राह्मणपदाला जातो असा इतिहास आहे. तो एका ब्राह्मण समाजाची स्थापना करतो. त्याच्या मुलांपासून अनेक उच्चकुलिन ब्राह्मण जन्माला येतात. त्यांचे वेदाचा अभ्यास आणि तपस्या विलक्षण होती. त्यातील कांहींची नांव अशी आहेत, मधूश्चंद्र, देवव्रत, अक्षिण, शकुंत, वभ्रू, कलापथ, याज्ञवल्क्य, स्थुल, उलुक, मुद्गल, सैंधव्यन, वलगुजंघ, ऋषी गलेव, ऋषी, वज्र, सलंकयन, लिलाध्य, नारद, कर्चमुख, वहूली, मुशळ, वक्षग्रीव्ह, अंघ्रिक, नैकद्रीक, सित्युप, सीत, सुची, चक्रक, मरुतनत्व, वटघ्न, अश्वलयन, श्यामायन, गर्ग्यय, जवली, शुश्रुत, करीषी, संघश्रृत्य, परापौरव, तंतू, महान ऋषी कपिल, तर्कायन, उपगहन, असुरयान, मर्गद, हिरण्याक्ष, जंघ्री, भवरावयनी, सुती, बिभूती, सुत, सुरक्रीत, अरणी, करीषी, नचिका, शंपेय, उज्जन, नवतानू, वकनख, सयन्य, यति, अंभूरुह, अमत्स्यसेन, श्रीशीन, गर्धवी, उर्जयोनी, रुजपेकहीन, नारदीन हे सगळे मुनी विश्वामित्राचे पुत्र होते. ते ब्रह्मज्ञानी होते.
अरे राजा, युधिष्ठीरा, रुचिकाच्या ब्रह्म प्रसादामुळें ते जन्मले होते. हि माहिती मी तुला विश्वामित्राच्या जन्माची सांगितली. तुला आणखीन काय समजून घ्यावयाचे आहे ते सांग. ती माहिती मी तुला सांगेन.

अनुशासन पर्व भाग चौथा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पांचवा

युधिष्ठीर विचारतात, "अहो तात, आपण धर्माची रहस्ये सगळी जाणता, त्यातील दयाबुद्धी ह्या सत्त्वगुणाचे परिणाम काय ते सांगा. त्याच प्रमाणे ईशभक्ती करणार्यांची लक्षणं कोणती ते सांगा.

भिष्म सांगतात, "ते समजण्यासाठी एक प्राचीन कथा तुला सांगतो जी इंद्र आणि शुकाबद्दलची आहे. त्याचे असे झाले, काशीच्या राजाच्या हद्दीत एक पारधी विषारी बाणांनी काळवीटाची शिकार करण्यासाठी गेला होता. त्यासाठी वनात फिरत असतांना त्याला एक काळवीटाचे जोडपे दिसते. तो नेम धरून मारतो पण त्याचा नेम चुकतो. त्याचे बाण झाडाला लागतात. त्यातील जहरामुळें ते झाड मरते. त्याची पानं खाली पडू लागतात. त्याला लागलेली फळं सुद्धा खाली पडतात. त्या झाडाच्या खोडात रहाणारा पोपट मात्र ते झाड सोडून जात नाही. तो खाण्यापिण्याशिवाय गुपचुप त्या डोलीत बसून असतो. अतिदुःखी झाला होता. त्या झाडाबरोबर तो सुद्धा सुकून जातो. ते पक (इंद्र) पहात असतो. त्याला आश्चर्य वाटते कीं, हा पोपट असा एकाद्या योग्यासारखा कसा तेथे रहात आहे. तेव्हां त्याच्या मनात एक विचार येतो. तो विचार करू लागतो, ह्या पक्षात असे गुण जे माणसात असतात कसे आणि कोठून आले"? असे विचार मानवेतर प्राण्यात येणे सहसा शक्य नसते. कदाचित सगळे प्राणी अशारितीने एकमेकांशी समजुतीने वागू शकत असतीलही. त्यानंतर तो शक्र एका ब्राह्मणाचे सोंग घेऊन पृथ्वीवर येतो. त्या पक्षाला बोलतो, "अरे शुका, दक्षाची नात तुला जन्माला घालून फार समाधानी झाली आहे. मला समजत नाही, ह्या झाडात आता कांहीं राहिले नसतांना तू ह्यात कां रहात आहेस"? त्याला पोपट उत्तर देतो, "अहो देवांचे राजे तुमचे स्वागत असो, माझ्या तपस्येमुळे मी आपल्याला ओळखले आहे". इंद्राला आश्चर्य वाटते की हा पोपट तपस्यासुद्धा करत आहे. तसे त्याला माहित असते कीं, सगळ्या पक्षात पोपट हा जास्त बुद्धीमान आणि समजूतदार असतो. तो पुन्हा त्याला तोंच प्रश्न विचारतो कीं, तो

त्या मेलेल्या झाडात कां तसा रहात आहे. तो बालतो, हे वन फार मोठे आहे आणि त्याला ह्यापेक्षा जास्त प्रशस्थ झाडं सहज मिळतील. मग ह्याच झाडात कां तो रहात आहे"?

भिष्म पुढे सांगतो, तो सद्‌गुणी पोपट ते ऐकून मोठा उसासा टाकत बोलतो, "देवांच्या आज्ञांचे नेहमी पालन करावयाचे असते. मला तुझ्या प्रश्नाचे कारण समजले तर बरे होईल. तुला सांगावयाचे असें की मी एक नेकइमानदार आणि कृतज्ञ पक्षी आहे कारण मी पंचव्रताचे पालन करतो. तसे पहा, मी येथे जन्मलो, येथे मोठा झालो, ह्या झाडाने मला सगळे दिले जे मला हवे होते, त्या झाडाने मला रहावयास जागा दिली, माझे शत्रूंपासून संरक्षण केले आहे, अशा झाडाला मी सोडून जावे हे कोणत्या कृतज्ञास शोभेल ते सांगा"? उपकार विसरणार्यांपैकी मी नाही. जो उपकार विसरतो तो स्वर्गात जाण्यासाठी अयोग्य असतो. तो मोठा धर्म आहे. त्यात चांगुलपणा आहे. तसे न केल्याने मी कृतघ्न ठरेन. मला ह्या झाडाला सोडून जाण्याचे सांगू नका. ते माझ्या धर्मात येत नाही. जेव्हां ते जीवंत होते त्यांने मला सांभाळले त्या बदल्यात कांहीं अपेक्षासुद्धा केली नाही".

ते ऐकून इंद्र प्रसन्न झाला. इंद्र त्याला बोलतो, "मी तुझ्या माणूसकीच्या वागण्याने फार संतुष्ट झालो आहे. त्याला इंद्र विचारतो कीं, तुला मी कोणता वर द्यावा ते मांग. तो कृतज्ञ पोपट बोलतो कीं, अहो देवांचे देव मला एकच वर द्या कीं, हे झाड पुन्हा सजीव व्हावे. इंद्र त्या झाडावर अमृत शिंपतो आणि ते झाड जीवंत होते. ते झाड पूर्वीप्रमाणे बहरते. त्या पोपटाची तपस्या फलदृप होते. त्याच प्रमाणे इंद्र त्याचा मित्र होतो. चांगल्या लोकांच्या सहवासात रहाण्याने नेहमी चांगले होते. त्यांच्या सगळ्या कामना पूर्ण होतात. त्या झाडाच्या उपकाराची परत फेड तो कृतज्ञ पोपट त्या झाडाला जीवनदान देऊन पूर्ण करतो.

अनुशासन पर्व भाग पांचवा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सहावा

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा, कर्तव्य आणि नशिब ह्यात श्रेष्ठ कोण व तसे कां ते मला सांगा.

भिष्म सांगतात, "मी तुला एक प्राचीन किस्सा सांगणार आहे त्यातून तुझ्या शंकांचे समाधान होईल असे मला वाटते. त्यात ऋषी वसिष्ठ आणि ब्रह्म ह्यांचे संभाषण आहे. अरे युधिष्ठीरा, फार पूर्वीच वसिष्ठ ब्रह्मदेवाला हांच प्रश्न विचारत होते. तो प्रश्न होता कीं, प्राण्याचे कर्म जे तो करतो ह्या जन्मात किंवा गेल्या जन्माचे कर्म भोग ज्याला दैव म्हणून सांगितले जाते असें दोनही त्या प्राण्याचे हे जीवन घडवण्यात महत्वाची भूमिका निभावत असतात कां? त्यातील नशिब जास्त प्रभावी असते कां कर्म"?

कमळातून उद्भवलेले ब्रह्मदेव सांगतात, कांहींही उगाचच घडत नसते. कारण असल्याशिवाय कार्य आणि परिणाम दोनही नसतात. जसे कर्म तसे त्याचे परिणाम असतात. चांगल्या कर्माचे चांगले आणि वाईट कर्माचे वाईट हा अबाधित नियम आहे. कारण नसतांना जे काम केले जाते ते निरर्थक असते. त्याचा कांही उपयोग नसतो. गेल्या जन्मातील कर्मामुळे त्याचे नशिब आणि म्हणून जीवन रचना बनलेली असल्यामुळें ते ह्या जन्मातील कर्मापेक्षा जास्त शक्तीमान ठरते. ह्या जन्मातील कर्म गेल्या जन्मातील कर्माचा परिणाम असें ठरते म्हणजे ते दैवापेक्षा कमी ताकदवान असते. एका अर्थी दैव ह्या जन्मातील कर्माची दिशा ठरवत असते. जसें दैवाने श्रीमंत असलेला त्या जन्मात श्रीमंती उद्योग करत असतो व दैवाने भिकारी असलेला ह्या जन्मात गरीबीत राहून कर्म करत असतो. ह्या जन्मातील सगळेंच गेल्या जन्माच्या कर्मविपाकाचा भाग असतात. त्यामुळें नशिब कर्मापेक्षा नेहमी वरचढ असते. जर नशिबाच्या विरूद्ध कर्म केले तर ते निष्फळ ठरण्याची मोठी शक्यता नाकारता येत नाही. नशिबाचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे कर्म करणारा त्याच्या कामात यशस्वी होतो. जो नशिबाला आव्हान देतो त्याच्या विपरीत कर्म करतो तो सहसा अयशस्वी होतो हा साधारण अनुभव आहे. ह्यावरून दैव कर्मापेक्षा बलवत्तर आहे हे स्पष्ट होते. तरी केवळ दैव चांगले असून भागत नाही, त्याला कर्माची

साथ असावी लागते. दोघांच्या योग्य संतुलनाने यश मिळत असते. म्हणजे केवळ दैव चांगले असले तरी ते जीवन सुखी होण्यासाठी जर चांगल्या कर्माची साथ नसेल तर ते दैव व्यर्थ असते. सृष्टीत जे बलवान झाले आहेत जसे राक्षस, नाग, सूर्य, चंद्र, वारे, हे एकेकाळी त्यांच्या कर्माने त्यांच्या उच्चपदाला पोहोचले आहेत. परंतु, ज्याचे दैव चांगले नाही त्याला खूप जास्त कष्ट करून यश मिळवावे लागते. दैव म्हणजे गेल्या जन्माची साथ ह्या जन्मात असली तर ते चांगले असते. दैवामुळें उत्तम घराण्यात जन्म मिळतो, त्याचे फायदे त्याला मिळत असतात. कित्येक केवळ गेल्या जन्माच्या पुण्याईवर मजेत रहात असलेले आपण पहातो. म्हणून चांगले दैव असणे केव्हाही जास्त सोईस्कर असते हे निश्चित. ह्या जन्माच्या चांगल्या कर्मामुळे व जर तपस्या केली असेल तर पुढचा जन्म निश्चितपणे सुखाचा असतो. आपला पुढचा जन्म कसा असावा हे मनुष्य ह्या जन्मातील कर्माने ठरवत असतो म्हणून कर्म आणि दैव विभक्तपणे विचारात घेता येत नाहीत. दैव हे एका प्रकारचे कर्मच असते. पुढच्या जन्मी मी कसा असावा, सुंदर, आरोग्यसंपन्न, श्रीमंत, उच्चकुलीन, सत्तावान इत्यादी हे ह्या जन्माच्या कर्माने ठरत असते हा कर्मविपाकाचा सिद्धांत आहे, आणि तो सगळ्यांना सारखाच लागू असतो. जो हे सत्य समजून त्याचे जीवन जगतो त्याचे नंतरचे जीवन सुद्धा प्रसन्न असते. अध्यात्मविद्या सांगते कीं, दैवाचे व्यवस्थापन कांहीं लोकपाल देवता करत असतात. त्यांना संतुष्ट करून कोणी यज्ञयागांच्या माध्यमाने आपले दैव सोईस्कर करून घेऊ शकतात. त्याबद्दलचे नियम आगम शास्त्रात आहेत. त्यानुसार कर्मकांड केली जातात. ते कृतयुगापासून होत आहे. त्यामुळें कित्येक राक्षस त्यांचे बिघडलेले नशिब सुधारून यशस्वी झाले आहेत असे पुराणात सांगितले आहे. हे शक्य असल्यामुळे देवता आणि ऋषी ह्यांच्यात अनेक वाद असल्याचे आढळते. म्हणजे ह्या जन्मातील कर्मकांडी यज्ञयागाने दैव बदलण्याचे त्याचे ह्या जन्मातील भोग सोईस्कर करता येत असतील तर असे मानता येईल कीं, कर्म दैवापेक्षा बलवत्तर आहे. अनेक ऋषींनी ते करू दाखवले आहे. परंतु, ती अपवादात्मक उदाहरणं आहेत. सर्वसाधारणपणे सामान्य माणसासाठी दैव कर्माची दिशा ठरवत असते हेंच जास्त दिसून येते. कर्म जरी त्याचे असले तरी दैवाबाबत कांहीं गुंतागुंती असतात त्या तुला सांगतो. दैव त्या माणसाचे

असते तसे तो ज्या परिवारात जन्मला त्याचेसुद्धा असते, तो ज्या देशात आहे त्याचे सुद्धा असते अशाप्रकारे माणसाचे स्वताचे दैव आणि त्या बरोबर ही इतर दैव असे सगळे त्याचे जीवन घडवण्यात गुंतलेली असतात. शुद्र कितीही कमी दैवाचा असला तरी जर तो अशा द्विजाकडे काम करत आहे ज्याचे दैव बलवत्तर आहे तर तो शुद्रसुद्धा सुखी होतो. जसे जरी इतरत्र कठोर उन्ह असले तरी मोठ्या वृक्षाच्या झायेत प्रवासी आराम करत असतो, तसें हे आहे.

ह्यासाठी अरे युधिष्ठीरा, दैवाचे व्यवस्थापन करणे हे सुद्धा एक कर्म आहे. ते जर करता आले तर चांगले दैव नसलेला सुद्धा त्याच्या कर्माने त्याचे जीवन सुखी करू शकतो. दुर्दैवी घरात जन्मलेला सुदैवी सुद्धा त्या दुर्दैवाने पिडीत होत असतो. दुर्दैवी राज्यातील सुदैवी हालाखीच्या परिस्थितीत असतात. म्हणून दैव हे जास्त व्यापक असते. त्याची व्याप्ती समजून त्याचे व्यवस्थापन करावयाचे असते. ते व्यवस्थापन कर्माच्या माध्यामातून करावे लागते म्हणून पुन्हा कांहीं समजतात की, कर्म जास्त शक्तीमान आहे. आगम शास्त्रात अनेक विधी आणि यज्ञ दिले आहेत ज्यांचे योग्य आचरण केले तर दुर्दैवाचे सुदैवात रुपांतर करता येते असे समजले जाते. त्यासाठी पुन्हा कर्म आलेच कारण कर्माच्या माध्यमानेच ते करता येते. आगम शास्त्राशिवाय सुद्धा इतर मार्ग आहेत कर्मयोगाचे, तेसुद्धा दुर्दैवाचे सुदैवात रुपांतर करण्यासाठी उपयोगाचे असतात. पवित्र जीवन जगणार्यावर देवता प्रसन्न होतात त्यांच्या कृपेने तो मनुष्य सुदैवी होत असतो. अशारितीने पहाता असें दिसते कीं, कर्म आणि दैव दोघांच्या संतुलनाने जीवन यशस्वी करता येते.

अनुशासन पर्व भाग सहावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सातवा

युधिष्ठीर विचारतो, " अहो पितामहा, मला सांगा माणसाने चांगले करण्याची काय गरज असते"?

भिष्म सांगतात, "मी तुझ्या शंकेचे समाधान करणार आहे. आता जे मी सांगणार आहे ते ऋषींचे रहस्यमय ज्ञान आहे. फार लोकांना ते माहीत नाही. मृत्यूनंतर माणसाचे काय होते ते मी तुला सांगणार आहे. मनुष्य जे त्या देहांत करतो ते त्यास त्याच योनीतील जन्मात पुढे भोगावे लागते. त्याचे असें मनाने केलेली कर्मं तो त्याच्या स्वप्नात भोगू शकतो आणि जे तो शरीराने करतो ते त्याला त्याच्या ह्या अथवा नंतरच्या जन्मात शरीरानेच भोगावे लागते. म्हणजे शरीराचे कर्म शरीराने भोगावे आणि मनाचे (विचारांचे) कर्म विचाराने अथवा स्वप्नात भोगावे लागते. कांहींही केलेले कर्म प्रतिक्रीये शिवाय रहात नाही. जसें फेकलेला चेंडू परत उलटून येत असतो. फक्त फरक एवढाच असतो कीं, चेंडू त्वरित उलटत असतो व कर्म विपाक थोड्या अवधीनंतर परतून येत असते. कारण कर्माचे विपाक ठरवण्यास नियतिला अवधी लागत असतो. ते विधात्याची रचना लक्षात घेऊन कसे वागावयाचे ते सांगतो, त्यासाठी लक्षात असू द्यावे कीं, प्रत्येक कर्माची नोंद पंचमहाभूतात केली जाते. ती नोंद माणसाच्या लिंगदेहात होत असते. जो अंतरात्मा बरोबर असतो. त्यासाठी मनुष्य जशास तसे वागेल तर ते त्याच्या भल्याचे असते. चांगल्याला चांगले व वाईटाला वाईट असें वागण्याच्या यज्ञाला पंचदक्षिणा यज्ञ असें म्हणतात. चांगुलपणा द्यावा आणि घ्यावा असें सांगितले आहे भोग विपाकाच्या नियमांत. अडचणीत असलेल्याला मदत करणे कोणतीही अपेक्षा न ठेवता हा पंचदक्षिणा यज्ञाचा भाग आहे. यज्ञ ह्याचा अर्थ कोणतेही कर्म, जे विशिष्ट उद्देश ठेवून केले आहे. अशा उपकार करण्याच्या उद्देशाने केलेल्या कर्माने त्याची (यजमानाची) अध्यात्मिक उर्जा मोठ्या प्रमाणात वाढत असते. त्याच्या उलट वाईट कर्माचे सुद्धा तसेंच आहे. कोणाचे विनाकारण नुकसान करण्याने करणार्याचे पुढच्या जन्मी भयंकर मोठे नुकसान होत असते. त्याची अध्यात्मिक उर्जा फार मोठ्या प्रमाणात कमी होत असते.

लोकपाल देवता नाराज होतात. जो तपस्या करत आहे आणि ज्याचे ध्यान योगमय झाले आहे तो पुढच्या जन्मी वैभवात रहात असतो. परंतु, त्याला त्या जन्मात माहीत नसते कीं, तो असा सुखात कां आहे? तेंच जीवनाचे रहस्य असते. ती जाणीव नसल्याने तो त्या सुखोपभोगांच्या प्रभावामुळे चुकून अहंकाराच्या आधीन जातो आणि त्याचा अध्यात्मिक र्हास होतो. परंतु, जर तो हे विज्ञान लक्षात घेऊन समजला कीं, ह्या जन्मात मला हे सुख मिळत आहे कारण मी माझ्या गेल्या जन्मात ध्यानसाधना करत होतो तर तो ती ध्यानसाधना त्या त्याच्या आयुष्यात पुन्हा करू लागेल व मिळणार्या सुखात रमण्याची चूक करणार नाही. असें झाले तर त्याची अध्यात्मिक प्रगती होत राहिल एरवी तो त्या मिळणार्या सुखात रमत राहिला व त्याची अध्यात्म साधना विसरला कीं, त्याची अध्यात्मिक प्रगति कुठीत होऊन तो तमोगुणात अडकून जातो. ब्रह्मचर्य पाळणार्याच्या मोहात अनेक बायका जातात पण त्यामुळे जर तो विचलित झाला तर जे ब्रह्मचर्याने त्याने कमावले होते ते तो घालवून बसतो. त्यात त्या बायकांचा कांहीं दोष नसतो, त्या निसर्ग नियमानुसार वागत असतात. जे उत्तम भोग ह्या जन्मात मिळत आहेत त्याचे कारण आपण कांहीं उत्तम कर्म केले होते ते समजून त्या भोगांत फार न गुंतता पुन्हा तशी उत्तम कर्म करण्यावर जे भर देतात ते पुढे जिंकत असतात. जीवाची पर्वा न करता जो योद्धा चांगल्याच्या भल्यासाठी लढत मरतो तो उच्च कोटीच्या लोकांत अनेक वर्षे सुखात रहात असतो. परंतु, तमोगुणी योद्धा चांगल्याच्या ऐवजी वाईटाच्या भल्यासाठी ते चांगले आहे, असे समजून मरतो तो बरबाद होतो म्हणून मनुष्य तमोगुणात रहाणार नाही असें पहावयाचे असते. वस्तुतः तमोगुण पशुंसाठी सांगितला आहे. परंतु, अज्ञानामुळें बरेच मनुष्य त्यात रहाणे योग्य समजून बरबादीच्या दिशेने जात असलेले आपण पहातो, युधिष्ठीरा. पुण्यकर्मात रमणारा स्वर्गात जातोच. विशेषकरून जो आपले पुण्यकर्म त्याच्या आराध्य देवतेला अर्पण करतो तो निवृत्तीच्या दिशेने प्रगती करत असतो. परंतु, निष्कारण स्वताच्या शरीराला त्रास देण्यास तपस्या समजून शरीराचे हाल करतो त्याला कांहींच लाभ होत नाही. शरीराच्या आवश्यक सुखांबद्दल घृणा बाळगणारा त्याच्या शरीराचा अपमान करत असतो त्यामुळें तो पुढची प्रगती करू शकत नाही कारण शरीर हे अध्यात्मिक साधनेचे एकमेव साधन असते. शरीराच्या भोगाच्या

मर्यादा जो समजतो तो पुढची प्रगती करत असतो. शरीराच्या वासना आणि आत्म्याची शुद्धता ह्यात शरीराच्या वासनाचे महत्व कमी आहे असे समजणे अध्यात्मिक उद्धारासाठी आवश्यक असते".

वैशंपायन पुढे बोलतात, युधिष्ठीर अशा विवेचनाने बेहद्द संतुष्ट झाले होते. ज्याने त्याच्या आत्म्याचे शुद्धीकरण केले नाही तो कितीही मोठे यज्ञ करत असेल तरीही त्यामुळें कांहीं साध्य होणार नाही. मुख्य साध्य असते अध्यात्मिक उद्धार, इतर गोष्टी व्यर्थ असतात. अहो युवराजे, तुझ्या शंकांचे समाधान मी करण्याचा प्रयास केला आहे. हे सगळे ऋषी सांगत असतात. आणखीन काय तू समजून घेऊ इच्छितोस"?

अनुशासन पर्व भाग सातवा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग आठवा

युधिष्ठीर बोलतो, "कोण पुजण्यास योग्य आहे ते कसे ठरते? कोण एवढा मोठा आहे कीं, त्याच्यापुढे लोकांनी नमावे? असे कोणी असते कां? ज्याच्यापुढे नमावे कशासाठी? त्याच्या वरील भक्तीमुळें कां त्याच्या भितीमुळे? मला ते आपल्याकडून समजून घ्यावयाचे आहे. केवळ संकटसमई कोणापुढे झुकावयाचे कां सुखाच्या समईसुद्धा प्रेमापोटी वंदन करावे? नेमके काय योग्य ठरते अध्यात्मिकतेच्या दृष्टीने ते मला समजावून द्या. अशा वागणूकीमुळे नंतरच्या (मृत्यू नंतरच्या) जीवनावर कांहीं प्रभाव पडतो कां? आणि शेवटी विचारतो, जर नाही वंदन केले तर कांहीं बिघडते कां, कशाप्रकारे"?

भिष्म सांगू लागतात, "माझ्यामते जे अध्यात्मिक दृष्ट्या उच्च पदाला पोहोचले आहेत ते नेहमी वंदनीय असतात. त्यांच्या त्या उच्च दर्जासाठी त्यांना वंदन करणे शिष्टाचाराला धरून आहे. गरज असो अगर नसो गुणवत्तेचे कौतुक करणे सुसंस्कृत माणसासाठी योग्य असते. त्याचप्रमाणे जे योगसाधना करतात, ज्यांची तपस्या पूर्ण होत आली आहे तेसुद्धा त्या त्यांच्या सिद्धीसाठी वंदनीय असतात. वेदाचा अभ्यास केलेले, पूर्वजांचे उच्च संस्कार प्रामाणिकपणे जोपासणारे, असे सगळे वंदनीय असतात. अरे युधिष्ठीरा, ज्यांचा सन्मान राजे करतात त्यांच्या ज्ञानासाठी आणि अनुभवासाठी ते सुद्धा सर्वथा वंदनीय असतात. वंदन करणे हे गुणग्राहीत्व दाखवण्यासारखे असते. त्यांना नुसते वंदन करून पुरेसे नसते, त्यांना शिधा, धन असे दान करावयाचे असते त्यांच्या प्रति असलेल्या आदराच्या अभिव्यक्तीसाठी असें मला वाटते. ज्या समाजात अशा लोकांचा आदर केला जातो त्या समाजात तसे लोक पुन्हा पुन्हा तयार होत असतात. अरे युधिष्ठीरा, अशा लायक मंडळींना कोणतीही अपेक्षा न ठेवता सन्मानाने वागवणे हे सुसंस्कृततेचे लक्षण आहे. तेंच खूप मोठे आहे. युद्धात लढण्यात जे धैर्य लागते त्यापेक्षा जास्त हिम्मत लागते अशांचे निरपेक्षपणे कौतुक करण्यासाठी. अरे माझ्या नातवा तू माझ्यासाठी प्रिय आहेस पण गुणी विद्वान ब्राह्मण मला तुझ्यापेक्षा जास्त प्रिय

असतो. असें करून मी माझ्या पित्याच्या (शंतनू) लोकांत जाऊ इच्छितो. माझे ब्राह्मणांवरील प्रेम सर्वात जास्त आहे त्यांच्या उत्तम गुणांमुळे. कांहीं पाहिजे म्हणूनच वंदन करावे हे झाले रजोगुणी आणि तमोगुणी दृष्टीकोन. खरे सात्त्विक केवळ गुणांसाठी कांहीं अपेक्षा न ठेवता त्या गुणीजनांचे कौतुक करत असतात. मी कधीही कांहीं अपेक्षा ठेवून कोणाला वंदन केलेले नाही. ती माझी पद्धत नाही. मी जे ब्राह्मणांसाठी माझ्या हयातीत केले त्याबद्दल मला अजिबात खंत वाटत नाही जरी आता मी शरपंजरी पडलेला आहे. लोक मला ब्राह्मण चाहता म्हणून ओळखतात. मला त्याचा अभिमान वाटतो. जसे प्रामाणिक बायको तिच्या पतिची चाहती असते तसा मी ब्राह्मणांचा चाहता आहे. असा एक लोक आहे जेथे ब्राह्मणांची पुजा होते मी त्या लोकात लवकरच जाणार आहे. बायकांसाठी त्यांचे पति वंदनीय असतात, तसे क्षत्रियांसाठी ब्राह्मण असले पाहिजेत. शंभर वर्षाच्या वृद्ध क्षत्रियांने पांच वर्षाच्या ब्राह्मण बालकांचा सन्मान केला पाहिजे. चार वर्णात जेव्हां ब्राह्मण उपलब्ध नसतील तेव्हां क्षत्रियांनी त्याचे काम करावे आणि जर क्षत्रियसुद्धा नसेल तर वैश्याने ते करावे म्हणूनच त्या तीन वर्णाना द्विज म्हणून एकत्र संबोधले आहे. कारण ते सगळे वेदाचा अभ्यास करणारे आहेत. ब्राह्मण बुद्धीत त्यांत सर्वात जास्त श्रेष्ठ असतात असे समजले जाते व त्या समजूतीनुसार असा प्रघात आहे.
खरे ब्राह्मण त्यांच्या नम्रपणासाठी, शांत वृत्तीसाठी, विद्वत्तेसाठी, चारित्र्यासाठी ओळखले जातात. कारण ती खर्या ब्राह्मणांची लक्षण असतात. ज्याच्यात त्यातील एक लक्षण जरी नसेल तरी तो जरी जन्माने ब्राह्मण असला तरी गुणकर्मांने ब्राह्मण समजला जात नाही. मी तशा दिखाऊ ब्राह्मणांचा तिरस्कार करतो. ब्राह्मणाच्या तपस्येपुढे आणि अध्यात्मिक ताकदीपुढे सगळ्यांनी नतमस्तक व्हावयाचे असते. ब्राह्मण त्यांच्या व्रतवैकल्यात गुंतलेले असल्यामुळें त्यांचे संरक्षण कुमार्गीपासून करण्याचे काम क्षत्रियानी करावयाचे असते. ब्राह्मणांच्या सगळ्या निजी गरजांसाठी इतर वर्णांच्या लोकांनी कार्यतत्पर राहून लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते.
अनुशासन पर्व भाग आठवा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग नववा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामहा, मला सांगा त्या लोकांचे काय होते जे अज्ञानाच्या प्रभावाखाली खर्या विद्वानांचा योग्य आदर सत्कार करण्याचे विसरतात. अशा विसरणार्यांचा अंत कसा होतो"?

भिष्म सांगतात, "ब्राह्मणांना दान न देणारे त्यांच्या इच्छा अपूर्ण राहिल्याने निराशेने जगत रहातात जसे एकादा नपुसक मुलगा होत नाही म्हणून निराश होत असतो. जो सद्‌गुणांचे सन्मान करण्याचे महत्व समजत नाही त्याच्या सगळ्या कर्मकांडांचा त्याला कांहीं उपयोग होत नाही कारण कर्मकांडं स्वता कांहीं मिळवून देत नसतात, ते फक्त लाक्षणिक असतात. मुख्य जे काम करणारे असते ते त्या माणसाचे गुण असतात. ते गुण नसतील तर त्याचे अध्यात्मिक जीवन व्यर्थ असते. असें शास्त्रसुद्धा सांगत आहे. केवळ माझे मत आहे असे समजू नकोस. शास्त्र सांगते कीं, अशा माणसाला प्रायश्चित्त म्हणून हजार शुभ्र घोडे ब्राह्मणाना दान करावे लागतात ज्या घोड्यांचा एक कान काळा आहे. त्या संदर्भात एक दंतकथा आहे ती मी तुला सांगतो. ती कथा एक मांकड आणि कोल्हा ह्यांची आहे. त्याच असं झालं, ते त्यांच्या गत जन्मात मनुष्य होते. एकाच गांवात ते पुन्हा जन्म घेतात आणि एकदा माकड पहातो कीं, कोल्हा प्रेतागाराच्या बाहेर एक मृत देह खात असतो. तो माकड त्याला ओळखतो कीं, हा त्याचा गेल्या जन्माचा मित्र आता कोल्हा बनून आला आहे. तो त्याला बोलतो, "अरे तू कोणते पाप केलेस गेल्या जन्मात कीं, तू कोल्हा बनून प्रेत खात आहेस"?

कोल्हां त्याला उत्तर देतो कीं, "गेल्या जन्मात त्याने एका ब्राह्मणाला दान करण्याचे आश्वासन दिले होते परंतु, ते तसेंच राहिले त्यामुळे मला हा जन्म मिळाला आहे. आणि म्हणून मी भुक लागल्याने हे प्रेत खात आहे".

भिष्म पुढे सांगतात, त्यानंतर कोल्हा माकडाला विचारतो, "तू कोणते पाप केलेस म्हणून माकड झाला आहेस"? माकड सांगतो, गेल्या जन्मी मी ब्राह्मणांना दिलेले फळं

चोरून खात होतो म्हणून मला हा माकडाचा जन्म मिळाला आहे. ब्राह्मणांशी वाद घालण्याने गाढवाचा जन्म मिळतो असे तो सांगतो.

भिष्म पुढे सांगतो, मी हे माझ्या गुरूकडून ऐकल्यावर समजलो कीं, ब्राह्मणांचा शाप खाऊ नये. त्याच्या वाटेला जाऊ नये त्यांना त्यांच्या नशिबावर सोडावयाचे असते. ते त्यांचे भले बुरे सगळे समजत असतात. त्यांना अक्कल देऊ नये असें कांहीं करू नये ज्यामुळे ते शाप देतील कारण त्यांची वाचा फार वाईट असते. त्यांची नजरसुद्धा विषारी असते. म्हणून ब्राह्मणांपासून दूर रहावे म्हणजे कोणताही त्रास होणार नाही. परंतु, जर ब्राह्मण खूष झाला तर फार चांगले करतो असें समजले जाते कारण, त्यांच्या अभ्यासात मंत्रविद्या असते. तिच्या मदतीने ते त्यांच्या चाहत्याचे कल्याण करू शकतात. असे समजतात कीं, खरे ब्राह्मण कधी कोणाला त्रास, पिडा देत नाहीत. त्यांची कृपा झाली तर स्वर्ग मिळणे सोपे असते.

भिष्म पुढे सांगतात, दान करावयाचे असेल तर ते ब्राह्मणांना करावे ते दान उच्च प्रतिचे दान समजले जाते. शुद्राला केलेले दान व्यर्थ समजले जाते आणि क्षत्रियाला व वैश्यांना दानं करावयाची नसतात.

अनुशासन पर्व भाग नववा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग दहावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा, खालच्या वर्णाच्या इसमास जर मित्रत्वाच्या नात्याने कोणी ब्राह्मणांनी अध्यात्मिक कामात मदत केली त्यात कांहीं दोष होतो कां? अशा कामात कर्तव्याचे नियम मोठे तरल असतात. त्यासाठी काय योग्य व काय अयोग्य ते तुमच्याकडून मला समजून घ्यावयाचे आहे".
भिष्म पुढे सांगतात, ह्या संदर्भात मी तुला एक किस्सा ऐकवणार आहे. तो मला कांहीं ऋषींनी सांगितला आहे. असा संकेत आहे कीं अयोग्य माणसास ते ज्ञान देऊ नये. असे सांगतात कीं, जर कोण्या शिक्षकाने तसे केले तर त्याला पाप लागते. हे फार पूर्वी घडले आहे. ते एका ब्राह्मणाच्या आश्रमात घडले. तो हिमालयात होता. त्या आश्रमात अनेक सिद्ध आणि चरण रहात असतं. ते सगळे ब्रह्मचारी होते. बहुतेक वनवासी जीवन जगणारे होते. त्याशिवाय कित्येक ब्राह्मण तेथे वस्तीला होते. ते सगळे विविध प्रकारची व्रत वैकल्ये करत असत. त्यातील कांही दिक्षीत होते. असंख्य वालखिल्य ऋषी तेथे रहात होते. ते सगळे संन्यासी होते. त्या आश्रमात वेदांचा घोष सतत होत असे. अशा ठिकाणी एकदा एक शुद्र भूतदयेच्या प्रेरणेने त्या भागात आला होता. त्याचे यथेचित स्वागत तेथे होते. त्या अध्यात्मिक शक्तीने समर्थ असलेल्या योग्याना तो पहात असतो. जणूकाय देवता असाव्यात असें ते वाटत होते. त्यांना पाहून तो शुद्र प्रसन्न झाला. त्यांचे पाहून तोसुद्धा त्यांच्याप्रमाणे व्रतस्थ जीवन जगण्याचे ठरवतो. तो त्या आश्रमाच्या कुलपतीला नमस्कार करतो. तो विनति करतो कीं, त्यालासुद्धा दिशा द्यावी. त्याला वैराग्याची दिक्षा पाहिजे असें तो बोलतो. मी शुद्र आहे जन्माने तरी मला ह्यात रस आहे. त्यासाठी मी तुमची सेवा करणार आहे. कुलपती त्याला बोलतो, ते शक्य नाही. एक शुद्र असें उच्च दर्जाचे वैराग्य घेऊ शकणार नाही. परंतु, तुला येथे रहावयाचे असेल तर राहू शकतोस. केवळ येथे रहाण्याने कदाचित तू कांहीं विद्या आत्मसात करू शकशिल तर तेवढी शिकण्यास माझी हरकत नाही.

भिष्म पुढे सांगतो, ते ऐकल्यावर तो शद्र विचार करू लागला, आता काय करावयाचे? माझ्या भल्याचे जे असेल ते मी केले पाहिजे. त्यानंतर तो त्या आश्रमापासून दूर अशा ठिकाणी जातो. तेथे तो काटक्या जमा करतो व एक आसरा तयार करतो. तेथे तो एक यज्ञवेदी सुद्धा तयार करतो. तेथे स्वताची निजण्याची व्यवस्था करतो आणि देवतेसाठी जागा तयार करतो. तेथे तो सन्यस्थ जीवनाला सुरूवात करतो. तो मौन धारण करतो. दिवसातून तिनदा तो देवाला अर्घ्य देऊ लागतो. इतर नियमांचेसुद्धा तो पालन करू लागतो. तो सगळ्या भौतिक वसनांचा पूर्णतया त्याग करतो. केवळ फळाहार करत असतो ज्या फळांची तेथे मुबलक सोय होती. जे त्याच्या झोपडीला भेट देत त्यांचे तो रिवाजाप्रमाणे स्वागत करत असतो. अशारितीने तो बराच काळ तेथे तपस्या करत असतो. त्यामुळें तो शुद्र पूर्ण सात्त्विक झाला होता. एके दिवशी एक जोगी त्याच्या आसर्याला येतो. तो वृद्ध शुद्र त्या ऋषीची पुजा करतो. तेथे तो ऋषी त्या शुद्राबरोबर तो जन्माने शुद्र आहे हे माहीत असूनही विविध अध्यात्मिक बाबींची चर्चा करतो. अशारितीने तो ऋषी त्या शुद्राच्या आसर्यात वारंवार येत रहातो. एकदा तो शुद्र त्या ऋषीला त्याची इच्छा सांगतो कीं, त्याला त्याच्या पितरांचे श्राद्ध करावयाचे आहे. ते कसे करावयाचे ते सांगा असें तो त्या ब्राह्मणाला बोलतो. त्यानंतर तो शद्र त्या ब्राह्मणाचे पाय धुण्यासाठी पाणी देतो. कांहीं कुस गवत आणतो व त्याची गादी तयार करतो. कांहीं फळ, कंदमुळं इत्यादि देतो. त्या गवतांची तो एक गादी तयार करतो ज्याला वृषी म्हणतात. परंतु, ती दक्षिणेच्या दिशेने तो ठेवतो. त्यामुळे त्यावर बसणारा पश्चिमेकडे तोंड करून असतो. ते नियमाच्या विरुद्ध होते. ते पाहून ऋषी त्याला सुधारण्यासाठी सांगतो कीं, आसनाचे तोंड पूर्वेकडे असले पाहिजे. त्यानंतर तो त्या शुद्राला सांगतो कीं आता त्याने स्वताला शुद्ध करावे व असे बसावे कीं त्याचे तोंड उत्तरे कडे असेल. शुद्र ते सगळे करतो जे ऋषीने सांगितले होते. त्यानंतर प्रामाणिकपणे श्राद्ध करणार्या शुद्राचे ते विधी संपन्न होतात. त्यानंतर तो ब्राह्मण त्याच्या घरी जातो. कालांतराने तो शुद्र त्या आसर्यातच त्याचा मृत्यू गाठतो. त्या श्राद्धामुळें तो पवित्र झालेला शुद्र त्याचा पुढचा जन्म एका राजघराण्यात मिळवतो. त्या जन्मी तेथे तो सुखाने रहात असतो. एक चांगला राजा म्हणून ख्यातनाम होतो. त्याच प्रमाणे, तो ऋषीतुल्य ब्राह्मण त्याचे तप पूर्ण

केल्यानंतर पुढच्या जन्मी एका पुरोहिताच्या घरात येतो. अशारितीने ते दोघे आपापल्या कर्मानुसार त्यांच्या योग्य कर्मफळानुसार जन्म घेतात. ते एकाच राज्यात असल्याने पुढे तो ब्राह्मण आता पुरोहित झालेला त्या राजाकडे पौरोहित्य करणार असतो. शुद्र त्याचा आधीचा जन्म आठवत असतो त्यामुळें त्याला जेव्हां तो ब्राह्मण त्याच्याकडे काम करतो हे समजते त्याला मोठे आश्चर्य वाटते. त्याला त्याचे हसू येते. त्यानंतर जेव्हां जेव्हां तो ब्राह्मण त्याच्या पुढे पौरोहित्य करण्यासाठी जात असें त्याला पाहून तो शुद्र राजा पोट भरून हसत असें. त्यामुळें ब्राह्मणाला संकोच होत असे. अखेरीस तो ब्राह्मण ठरवतो की, राजा त्याला पाहून असा कां हसतो ते समजून घेतले पाहिजे. एकदा आजूबाजूस कोणी नाही असें पाहून तो ब्राह्मण राजाला विचारतो कीं, तो असा त्याला पाहून कां नेहमी हसत असतो? त्या ब्राह्मणाला त्याचा गत जन्म स्मरत नसतो त्यामुळे त्यांचे गेल्या जन्माचे नाते तो स्मरत नसतो. ब्राह्मण राजाला विनंती करतो कीं, राजा त्याला एक वर देईल. राजा मोठ्या खूषीत बोलतो कीं, अहो ब्राह्मणा एकच कां, मी आपल्याला शंभर वर देण्यास तयार आहे. असे बोलून तो पुन्हा हंसू लागतो. तेव्हां तो ब्राह्मण राजाला बोलतो कीं त्याला समजून घ्यावयाचे आहे कीं, राजा त्याला पाहून असा कां हसत असतो? तो प्रश्न ऐकल्यावर राजाला पुन्हा हसू येते पण तो ते आवरतो व सांगतो कीं, त्याला त्या दोघांचे आधीचे जन्म माहीत असल्यामुळे त्या अनुषंगाने तो ब्राह्मणाला हसत असतो. तो ब्राह्मणाला सांगतो कीं, त्या हसण्यात कोणताही कुत्सितपणा नाही पण तो त्यांच्या बदललेल्या नियतीला हसत असतो. असें सांगून नंतर तो राजा आधीच्या जन्मात तो ब्राह्मण एक ऋषी होता व त्यांने शुद्रावर कशी कृपा केली आणि त्यांमुळे त्या शुद्राचा राजा झाला व ऋषीने शुद्राचे श्राद्ध केले म्हणून त्याचा कसा एक केवळ ब्राह्मण झाला. त्यावरून त्या शुद्धबुद्धी असलेल्या ब्राह्मणास समजते कीं, त्यांने जे उपकार केले शुद्रावर अनवधानाने म्हणून त्याचा अध्यात्मिक दृष्ट्या अधःपात झाला होता व त्यामुळें त्या पूर्वाजन्मीच्या शुद्राचे भले झाले होते. ब्राह्मणाला ते समजल्यावर त्याने गत जन्मात केलेल्या सत्कृत्याचे दुःख अजिबात होत नाही. तो त्या राजाला अभिष्टचिंतन करतो. राजा त्या ऋषीने केलेल्या उपकारामुळें आज ह्या जन्मी राजा (क्षत्रिय) झाला आहे व ते उपकार तो विसरू इच्छित नाही. आपण माझ्यावर जे उपकार केले त्या

बदल्यात तुमचा अध्यात्मिक र्हास झाला ह्याचेसुद्धा मला हसू येते कारण ही काय नियती आहे कीं, उपकार करणेसुद्धा शिक्षेल पात्र ठरावे! आपण पुन्हा तपस्या करून तुमचे अध्यात्मिक सामर्थ्य मिळवणार अहात ह्याबद्दल त्याला विश्वास आहे असें राजा मोठ्या आपुलकीने त्या ब्राह्मणास सांगतो आणि हा किस्सा कोणाला न सांगण्याचे ते ठरवतात. हसत हसत राजा ब्राह्मणाला बोलतो कीं, ह्या जन्मात कोणा शुद्राला मदत करू नका नाहीतर पुढच्या जन्मी आणखीन खालच्या वर्णात आपला जन्म होईल. खजिल झालाला ब्राह्मण संकोचून इतरत्र पहात रहातो. तुम्ही केलेल्या उपकाराच्या बदल्यात आपल्याला हवी तेवढी संपत्ती मी देणार आहे. त्यानंतर तो ब्राह्मण त्याच्या वर्णाच्या लोकांना अनेक भेटी आणि दानं करतो. कठोर तपस्या करतो, गेलेले पुण्य पुन्हा जमवण्याचा प्रयत्न करतो. तो अनेक तीर्थक्षेत्री यात्रा करतो. तेथे दानं करतो. राजा त्याला पूर्ण सहकार्य करत असतो. अशारितीने तो ब्राह्मण त्याच्या आधीच्या अध्यात्मिक योग्यतेला पोहोचतो. त्या गेल्या जन्मातील आश्रमात पोहोचतो.

भिष्म पुढे सांगतात कीं, ह्यासाठी ब्राह्मणांनी कधीही शुद्राला ज्ञान देण्याची चूक करावयाची नसते. तसे केल्याने शुद्राचे कल्याण होते परंतु, ब्राह्मण भ्रष्ट होतो. त्यातून पुन्हा वर येण्यास त्याला फार मोठी तपस्या करावी लागते. त्याच प्रमाणे ब्राह्मणाने शुद्राकडून कांहीं शिकणे हे सुद्धा निषिद्ध समजले जाते. त्याचे नियम फर विलक्षण असतात. सामान्याला ते समजत नाहीत. ब्राह्मण क्षत्रियांना व वैश्यांना शिकवू शकतो पण शुद्राला नाही. तो शुद्राला दिक्षा सुद्धा देऊ शकत नाही अशी परंपरा आहे. परंतु, सूज्ञ शुद्र इतर शुद्रांचे प्रबोधन करू शकतात. म्हणून बरेच ब्राह्मण मौन धारण करतात. म्हणजे त्यांना कोणाला कांहीं सांगण्याची पाळी येत नाही. भिष्म पुढे बोलतात, "मी तुला कोणी कोणाला शिकवावयाचे त्याबद्दलचे नियम सांगितले. त्यासाठी कोणाला कांहीं शिकवू नये असे योग्य समजले जाते.

अनुशासन पर्व भाग दहावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग अकरावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामहा, मला सांगा कोणत्या प्रकारच्या इसमा मध्ये (स्त्री अथवा पुरूष) समृद्धी देवता रहात असते"?

भिष्म सांगतात, ह्या बाबत मी तुला एक किस्सा सांगतो जो मला समजला आहे. एकदा समृद्धी देवता तिच्या तेजाने चमकत होती, तिचा रंग तांबूस कमळासारखा होता. त्यावेळी रुक्मिणी, प्रद्युम्नची आई, ज्याच्या उरावर मकर ध्वज चिन्ह आहे, मोठ्या कुतूहलाने देवकीच्या मुलापुढे (कृष्णापुढे) समृद्धी देवतेला विचारते कीं, "ते कोण असतात जे तुमच्या बाजूना असतात. ज्यांना तुमचा आधार असतो? आणि ते कोण आहेत ज्यांच्यावर तुमची कृपा होत नाही? मला ते सगळे समजून घ्यावयाचे आहे. आपण त्या सात ऋषींच्या बरोबरीचे अहात", ते ऐकल्यावर समृद्धी देवता कृष्णाच्या समक्ष सांगते,

श्री बोलते, "मी त्याच्या सह नेहमी असते. किंबहूना मी त्याचेच एक रुप आहे. जो बोलका आहे, कार्यक्षम आहे, क्रोधहीन आहे, आणि ज्याच्या सगळ्या वासना (इच्छा) मर्यादीत आहेत. मी त्यांच्या बरोबर कधीच नसते जे आळशी, बेशिस्त, अश्रद्ध, कृतघ्न, वासना मर्यादेत नाहीत, चोर आहे, उद्धट आहे, भ्रष्ट वर्तणूक आहे, गुरूशी बेईमान आहे, क्रोधी आहे, अधीर आहे, स्वार्थी आहे, उपकार विसरतो, मनात एक आणि करण्यात दुसरे असा स्वभाव आहे, अल्पसंतुष्ट आहे असे लोक मला पसंत नाहीत. मला ते पसंत असतात जे कर्तव्यदक्ष आहेत, जे त्याच्या वर्णाचे कर्तव्य पार पाडतात. जे माणूसकीने वागतात, ज्यांच्यात भूतदया आहे, ज्यांच्या वागण्यात चांगुलपणा आहे, ज्याचा इंद्रीयांवर ताबा आहे, जे क्षमाशिल आहेत. मी त्या महिलांच्या बरोबर असते ज्या प्रामाणिक आहेत, ज्या सश्रद्ध आहेत, ज्या घर चांगले सांभाळतात परंतु, त्यांच्यात नसते ज्या घराची चांगली निगा करत नाहीत. पुरूषाला मदत करत नाहीत संसारात. मला दागदागिन्यांचा शोक असलेल्या बायका फार आवडतात. नटून थटून मिरवणार्या बायका माझ्या रुपाचे कौतुक करत

असतात. त्या मला अतिप्रिय असतात. हास्यवदन असलेल्या बायका मला आवडतात, कारण त्या माझे रुप दाखवत असतात. पापाचरणी, व्यभिचारी, भ्रष्ट, निर्लज्ज, फाजिल, मर्यादा नसलेल्या, शरीराचे प्रदर्शन करणार्या, घाणेरड्या, आधाशी, भांडखोर, चुगल्या करणार्या अशा बायका मला अजिबात पसंत नसतात.
मी वाहनात असते, मी कुमारीकांत असते, मी यज्ञात असते, मी पावसाच्या ढगांत असते, फळावर आलेल्या पिकात असते, मी कमळात असते, माझा ऋतू आहे शरद ऋतू. मी सुमधूर गाण्यात आहे, मी बारमासी नद्यात असते, मी वाहत्या पाण्यात असते. जेथे ब्राह्मण वेदाचा घोष करतात तेथे मी असते. माजलेल्या हत्तीत असते, माजावर आलेल्या बैलात असते, ज्या घरात आराध्य देवतेची पुजा नियमितपणे होते तेथे असते. मी तेथे मोठ्या आनदांत असते, ज्यातून मोठे व्यवहार होत असतात. जेथे भक्ती आहे तेथे मी असते. जेथे जेथे चांगुलपणा, माणूसकी, प्रामाणिकपणा, कृतज्ञता आणि भूतदया आहे तेथे तेथे मी आहे. मी नारायणात आहे. ज्याच्यामध्ये मी आहे तो समृद्ध होतो. त्याच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात.
रुक्मिणी विचारते, "परंतु, तू ज्यात नाहीस अशी अनेक पापकर्मी समृद्ध असतात ते कसे"? समृद्धी देवता हसत हसत सांगते, "ती माझी बहीण अवदसा असते. तसेंच कर्जाने जी श्रीमंती येते तीसुद्धा अवदसा असते. ती त्यांचा नंतर नाश करते".
अनुशासन पर्व भाग अकरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बारावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो सर्वज्ञानी पितामहा, तुम्ही सगळे जाणता तरी एक रहस्य आहे जे कोणालाच समजत नाही त्याबद्दल मला कुतूहल नेहमीच राहिले आहे. तो विषय आहे स्त्री-पुरूष ह्यांच्या समागमाचा. मला सांगा त्यात कोणाला जास्त सुख मिळते व तसा भेद विधात्याने कां ठेवला आहे"?

भिष्म सांगतात, "त्यासाठी प्राचीन काळी झालेला एक संवाद सांगतो जो भंगस्वन आणि शक्र ह्यांच्यात झाला होता. त्याचे असे झाले, फार प्राचीन काळी एक राजा होऊन गेला होता. त्याचे नांव होते भंगस्वन. तो फार गुणी होता. तो राजर्षी म्हणून जाणला जात होता. परंतु, तो निपुत्रिक होता. म्हणून तो एक पुत्रकामेष्ठी यज्ञ करतो. त्यात अग्नीश्लुत असते. त्या यज्ञात केवळ अग्नीदेव पुजला जातो तो यज्ञ इंद्राला आवडत नाही कारण त्यात देवांना त्यांचा हिस्सा नसतो. परंतु, तो यज्ञ त्या लोकांसाठी असतो ज्यांच्या विशिष्ट पापामुळें ते निपुत्रिक असतात, ते पाप साफ केले जाते अग्नीच्या मदतीने. इंद्राला समजते कीं राजा तो यज्ञ करत आहे कारण त्याला पिता व्हावयाचे आहे. तेव्हां पासून इंद्र भंगस्वनाचे कोणते पाप (दोष) आहेत म्हणून तो निपुत्रिक आहे त्याचा शोध घेऊ लागतो. भरपूर शोध घेऊन सुद्धा त्याला त्या राजात कांहीं दोष सापडत नाही. त्यानंतर राजा शिकारीच्या मोहिमेवर निघतो. इंद्राला ते समजते तेव्हां त्यात कांहीं गोम सामजते कां ते पहाण्याचे तो ठरवतो. इंद्र राजाला भ्रमात टाकतो. त्यामुळे राजा एकटाच शिकार करण्यासाठी निघतो. शोध घेत असतांना त्याला भूक आणि तहान लागते. राजा एवढा भ्रमात टाकला गेला होता कीं, त्याला तो कोठे जात आहे ते समजत नव्हते. तहानेने व्याकूळ झालेला राजा एका तलावाकडे जातो त्यातील पाणी नितळ होते. तो आणि त्याचा घोडा दोघे भरपूर पाणी पितात. त्याला ते पाणी प्याल्यानंतर असा भास होतो कीं तो बदललेला आहे. त्यानंतर हा काय प्रकार आहे ते शोधण्यासाठी तो त्याच्या घोड्याला बांधून पुन्हा पाण्यात शिरतो. त्याला धक्का बसतो कारण त्याला समजते कीं त्याचे बाईमध्ये रुपांतर होत आहे. त्याला फार शरम वाटू

लागते. त्याचा प्रचंड गोधळ उडाला होता. त्याला प्रश्न पडतो आता तो घोडा कसा चालवणार? मी आता माझ्या राज्यात कसा जाणार अशा विवंचनेत तो होता. मी केलेल्या अग्निश्लुत यज्ञामुळें मला शंभर पुत्र झाले आहेत त्यांचे मी लालन पालन कसे करणार? मी माझ्या बायकांना कसे तोंड दाखवू माझे नातवाईक मला काय म्हणतील, माझी प्रजा मला ओळखेल कां? तरी त्याला त्याच्या राज्यात जाणे भाग होते. तो विचार करतो, सूज्ञ सांगतात कीं, मृदूपणा आणि धीर हे बायकांचे गुण आहेत. सहनशिलता हा बायकांचा गुण आहे, कठोरपणा आणि ताकद हे माणसाचा गुण आहे. अरे माझे पौरुष्य कोठे गेले? अशाप्रकारचे हताश करणारे विचार त्याच्या मनात येत होते. त्याला स्त्रीरुपात पाहून ते त्याचे प्रजाजन आणि आप्त नवल करू लागतात. ते पाहून तो राजर्षी त्यांना बोलतो, जे झाले ते सांगतो. त्यानंतर तो त्याच्या प्रजा जनाना सांगतो कीं ह्यापुढे तो अरण्यात तपस्या करण्यासाठी जात आहे. अरण्यात गेल्यावर तो एका बैराग्यांच्या आश्रमात येतो. तेथे यथावकाश त्या बैराग्या पासून तो शंभर पुत्रांना जन्म देतो. त्यासगळ्या मुलांना घेऊन ती तिच्या आधीच्या मुलांकडे जाते. त्यांना सगळे सागते. त्यानंतर सगळे त्यांचे पुत्र एकत्र कुटूंबासारखे राहू लागतात. ते सगळे मजेत आहेत हे इंद्राला खपत नाही. त्याला फार राग येतो. त्याला समजते कीं ह्या राजर्षीला बाई करून उलट मी त्याचे भले केले आहे. त्यानंतर तो एका ब्राह्मणाचे सोंग घेऊन त्या राजाच्या गांवात येतो. तो ब्राह्मण झालेला इंद्र त्या राजपुत्रांच्या डोक्यात वितुष्ट पेरतो. त्यांच्यात दुफळी निर्माण करतो. इतकी कीं, ते परस्परांशी युद्ध करतात. ते समजल्यावर स्त्री झालेला भंगस्वन फार दुःखी होतो. इंद्र ब्राह्मणाच्या सोंगात त्याच्याकडे जातो. तो तीला तिच्या दुःखाचे कारण विचारतो. ती सगळी कथा सांगते. कसे त्याचे तो पुरूष असतांना झालेले आणि स्त्री झाल्यानंतर तिला झालेले शंभर पुत्र एकमेकांशी यादवी करून एकमेकांना मारतात ते सांगतो. त्याला फार दुःख झाले होते. त्यावेळी इंद्र तिला सांगतो खरी गोष्ट काय आहे. तो रागावून राजाला बोलतो कीं, ते त्याने सुडबुद्धीने केले कारण त्याच्या पुत्रकामेष्ठी यज्ञात त्याला वाटा अग्नी देत नाही. त्यानंतर राजा त्याची चूक मान्य करतो व इंद्रापुढे साष्टांग प्रणिपात करतो. त्यामुळे इंद्राला त्याची दया येते व तो राजाला विचारतो कीं, त्याला कोणता वर मागावा

असें वाटते. इंद्र त्याला विचारतो, अरे राजा, तुला कोणती मुलं पुन्हा जीवंत व्हावी असे वाटते ते सांग. तुझी तू पुरूष असतांनाची कीं, तू बाई झाल्यानंतरची"? राजा सांगतो माझी मी बाई असतांनाची मुलं दे. ते ऐकल्यावर इंद्र त्याची सगळीच मुलं जीवंत करतो. त्यानंतर इंद्र राजाला विचारतो कीं, तुला तुझी पुरूष असतांनाची मुलं कां कमी महत्वाची वाटत होती ते सांग. राजा सांगतो, स्त्री नेहमी जास्त प्रेमळ असते. तिला तिची मुलं इतरांपेक्षा जास्त प्रिय असतात. पुरूष प्रमाणाने कमी प्रेमळ असतो त्याचे त्याच्या मुलांवरील प्रेम कमी असते. भिष्म पुढे सांगतात, इंद्र त्याच्यावर फार संतुष्ट होतो व विचारतो अरे राजा, मी तुला तुझे पुरूषत्व पुन्हा देणार आहे तर ते मांग. त्यावर ती बोलते कीं, ती बाईच रहाणे पसंत करते कारण त्या स्वरुपात जास्त काम सुख त्याने उपभोगलेले होते. स्त्रीच्या स्वभावामुळे ते होते असे ती सांगते. पुरूष स्वभावाने कठोर, कमी क्षमाशिल असतात व बाई स्वभावतः जास्त मृदू आणि दयाळू असतात. त्याप्रमाणे त्याची सुख भोगण्याची क्षमता भिन्न असते. बाईचा अहंकार ममतेने लिप्त असतो परंतु, पुरूषाचा अहंकार कठोरतेने ग्रासलेला असतो. त्यामुळे पुरूष कोणतेही सुख नीटपणे भोगू शकत नाही. लैंगिक सुखात सुद्धा त्याप्रमाणे पुरूष कमी सुख भोगतो कारण त्याचा अहंकार तेथेसुद्धा अडमडत असतो. त्याशिवाय सत्व गुणी स्त्री तमोगुणी स्त्रीपेक्षा जास्त सुख भोगते. अशा अनेक कारणांसाठी स्त्री जन्म जास्त सुखमय असा विधात्याने केला आहे. त्यांचा अहंकार नम्र असतो त्यामुळे तो जास्त सुखकारक असतो. पुरूषाचा अहंकार कठोर असल्याने त्याला चांगले सुख धडपणे भोगता येत नाही. सुखाच्या बाबत अहंकाराचे स्वरुप आणि त्रिगुणांची (सत्त्व, रज आणि तम) अवस्था विचारात घ्यावी लागते. त्याशिवाय मृदू व गुबगुबीत शरीर असलेली स्त्री सडपातळ हाडकुळ्या शरीराच्या स्त्रीपेक्षा जास्त सुख भोगत असते. सत्त्वगुणी स्त्री आणि पुरूष तमोगुणी पेक्षा जास्त सुख भोगू शकतात. सुख आणि दुःख ही मनाची अंग असतात म्हणून मनाच्या अवस्थेनुसार ते त्याला मिळत असते. तमोगुणी दुःखात सुख पहात असतात. स्त्री तिच्या विशिष्ट स्वभावामुळें सुखलोलुप असते त्याप्रमाणे ती विविध सुख पुरूषांपेक्षा जास्त भोगत असते. पुरूष मुळातच कमी सुखवर्ती असतो. कपडे, दागिने, घराची सजावट, वाहन, खाद्यपदार्थ, फिरणे, आनंद

देणार्या सगळ्या गोष्टीत बाई जास्त उत्सुक असते त्याप्रमाणे ती त्यांतून सुख मिळवत असते. पुरूष अशा सगळ्यांबाबत थोडा त्रयस्थासारखा वागतो.

अनुशासन पर्व भाग बारावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग तेरावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "माणसाने सुखात रहाण्यासाठी कोणत्या गोष्टी करणे टाळावे आणि कोणत्या करण्याचा प्रयत्न करावा ते सांगा".

भिष्म सांगतात, सांख्यांच्या दृष्टीने पहाता, शरीराच्या तीन कृती त्याशिवाय वाचा, मनाने करावयाच्या तीन गोष्टी, दहा शरीराच्या इतर क्रिया ह्याचा विचार करावा लागेल. तीन क्रिया ज्या शरीराच्या मदतीने केल्या जातात त्या सर्वस्वी दुःख कारक असतात म्हणून कटाक्षाने टाळावयाच्या असतात. त्या आहेत, प्राण्यांची हत्या, प्राण्याना दुःख देणे, चोरी करणे म्हणजे न विचारता एकाद्याची वस्तु अपहरण करणे, दुसर्याच्या मालमत्तेचा, बायकांचा उपभोग घेणे ह्या तीनाने अध्यात्मिक सुखाचा नाश होतो म्हणून त्या टाळावयाच्या असतात. वाचेने काय करणे टाळावयाचे ते सांगतो, अपशब्द वापरून बोलावयाचे नसते, इतरांचे उणे काढावयाचे नसते, खोटे बोलणे टाळावयाचे, वेदाचा अपमान करणे टाळावे. असें मनाने करावयाचे असते. अशा संयमाने त्याची अध्यात्मिक शक्ती वाढते. केवळ अध्यात्मिक उर्जा वाढण्याने अवर्णनीय सुख मिळत असते त्याचे विशेष कीं, ते सुख कधीही कमी होत नाही, ते क्षणभंगूर नसते. इतर सुख क्षणभंगूर असतात. म्हणून अध्यात्मिक शक्ती वाढवण्यावर नेहमी भर असला पाहिजे.

अनुशासन पर्व भाग तेरावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग चौदावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहो गंगेया, तुम्हाला शंकराची सगळी नांव माहित आहेत. ती कोठे व कशी वापरली जातात ते समजावून सांगा. त्यांची ईशा आणि शंभू ही नांव सर्वत्र आहेत. तसेंच बभ्रू सुद्धा त्याला बोलतात. ज्याचे अंग म्हणजेच हे विश्व आहे. जो सगळ्या देवतांचा आणि असुरांचा (देवता म्हणजे निरहंकारी शक्ती आणि असुर म्हणजे अहंकारी शक्ती) जनक आहे, त्याला स्वयंभू म्हणून सुद्धा सगळे सांगतात. जो ह्या संसाराचा (विश्व) कर्ता आणि विनाश कर्ता आहे त्या महादेवाच्या संबोधनांची माहिती मला सांगा".

भिष्म बोलतात, "मी महादेवाचे कौतुक करण्यास पात्र नाही. त्यांचे गुण अवर्णनीय आहेत. ते सगळ्या जगाला व्यापूनसुद्धा त्यात दिसत नाहीत. महादेव प्रज्ञा आहेत ह्या सृष्टीची. सगळ्या देवता, ब्रह्मसुद्धा आणि पिशाच्च देवता महादेवाच्या इच्छेतून उत्पन्न झाल्या व त्या महादेवाची पुजा करत असतात. महादेव प्रकृती आणि पुरूषांच्या पेक्षा श्रेष्ठ अशा जागी असतात. सगळे ऋषी जे योग, तत्त्व ह्यांचा अभ्यास (व्यासंग) करतात ते महादेवावर ध्यान करत असतात. ते अविनाशी ब्रह्म आहेत. त्याच्या अध्यात्मिक उर्जेच्या जोरावर सगळे प्रकृती आणि पुरूष कार्यरत असतात. महादेव म्हणजेच अध्यात्मिक उर्जा अशी वस्तुस्थिती आहे. जन्म, व्याधी आणि मृत्यू हे चक्र त्यानी ब्रह्माच्या मदतीने सुरू केले. अशा देवादिदेवाचे गुण मी कसा सांगणार"? केवळ नारायण जो चक्रगदाधारी आहे, त्याचे वर्णन करण्यास समर्थ आहे. योगाच्या दिव्य दृष्टीने तो सगळे पहात असतो, तो बद्रीमध्ये बसून योग साधनेच्या मदतीने महादेवाला पाहू शकतो. दुसरे कोणी तसे पाहू शकत नाहीत. महादेवाच्या कृपेमुळे वासुदेवाला जगाचे ज्ञान प्राप्त झाले होते. महादेवाची कृपा जगातील सगळ्या संपत्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. देवांची एक हजार वर्षे माधव महादेवाचे ध्यान करत होता. त्यानंतर त्याला ती कृपा प्राप्त झाला होती. प्रत्येक युगात नारायण महादेवाच्या नांवाने तशी ध्यान साधना करत असतो

त्यामुळे हे विश्व चालवण्याची क्षमता त्याला उपलब्ध होत असते. कृष्ण त्याला मुलगा व्हावा म्हणून महादेवाची आराधना करत होता हे मला माहीत आहे. अशा परिस्थितीत फक्त एक कृष्ण असा आहे जो महादेवाच्या विविध लिला आणि त्यातून त्याची संबोधनं सांगू शकेल.

वैशंपायन बोलतात, "असें बोलल्या नंतर भिष्म वासुदेवाकडे पहात विचारतात भवाचे कौतुक करावे तर ते तुझ्या शिवाय कोण करणार"?

भिष्म बोलतात, "अहो वासुदेवा, आपण सगळ्या देव आणि असुरांचे धनी अहात. आपण ख्यातनाम अहात. सगळ्या जगाला आपण वेढलेले आहे म्हणून आपण विष्णू सुद्धा अहात. म्हणून ह्या बाबतीत (शीवांबद्दल) आपण बोलू शकता. युधिष्ठीर त्याबद्दल विचारत आहे. प्राचीन काळी ऋषी तंडण जो ब्राह्मापासून तयार झाला होता, ब्रह्माच्या उपस्थितीत महादेवाची हजार नांव गाऊन दाखवत असे. ती नांव येथे जमलेल्यात, ज्यात व्यासासह सगळे ऋषीसुद्धा आहेत ऐकवून दाखवाल कां"? महादेवांच्या चिरानंदी स्वभावाचे जे अतुलनीय सुद्धा आहेत, जे जगाचे गुरूसुद्धा आहेत, ज्यांचे ऋषी, मुंडीन आणि कपर्दीन असें वर्णन करतात, त्या महादेवाची अरे वासुदेवा, सगळी वर्णनं तू करशिल कां? वासुदेव बोलातात, "ज्याच्याकडे सगळे गुणीजन (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृज्ञता असलेले, पंचव्रत आचरणारे) अखेरीस जातात. आदित्य ज्यांना सुक्ष्मदृष्टीची सिद्धी आहे तेसुद्धा महादेवाची रुप पाहू शकत नाहीत. असे असल्याने सामान्य इसम त्याला कसे जाणणार? तरी मी कांहीं नांव सांगतो, त्या असुरांच्या नियामकाची. जो सगळ्या यज्ञांचा स्वामी आहे. जो सगळ्या व्रतांचा नियंत्रक आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, असे बोलून त्यानंतर पवित्र जलाने वासुदेव स्वताचे शुद्धीकरण करून महादेवाचे गुण सांगू लागला.

वासुदेव सांगतो, अहो श्रेष्ठ ब्राह्मणांनो, गंगेया आणि युधिष्ठीरा, आता मी जी सांगतो ती देवादिदेवांची संबोधनं आहेत ज्यात कपर्दिन हे मुख्य आहे. प्राचीन काळी मला सम्वरामुळे महादेवाला पहाण्याची ती दृष्टी संपन्न झाली जी सहसा कोणाला प्राप्त होत नाही. त्या काळात माझ्या योगसाधनेच्या प्रभावामुळें ते दर्शन मला होत होते. असुर

सम्वराचा वध माझ्या रुक्मिणीपासून झालेल्या प्रद्युम्नने केल्यानंतर बारा वर्षांनी मी एकदा माझी त्या काळातील बायको जम्ववती मला सांगते कीं, "तिला आई होण्याची इच्छा आहे. ती मला सांगते कीं, तिला कसा मुलगा व्हावा असे वाटते त्यात ती सांगते कीं, तो देदिप्यमान, उत्तम योद्धा, सर्व शक्तीमान, निष्पाप आणि इतर गुण तुझ्या सारखे असा असावा. त्या आधी तिने माझ्या पासून झालेले माझे इतर दोन मुलगे, प्रद्युमन आणि चारूदेशन पाहिले होते. ती आणखीन सांगते कीं, तिला त्वरित तो मुलगा हवा आहे, त्यात उशीर करू नये. ह्या तीन जगात असें कांही नाही कीं, ते तुला शक्य नाही". तू इच्छा केलीस तर नवीन सृष्टी तयार करू शकतोस, गेली बारा वर्षे तपस्या करून तू महादेवाची कृपा प्राप्त केली आहेस. त्या तपस्ये नंतर तू प्रद्युम्नला तुझ्या इच्छेने जन्म दिलास. जो तूंच आहेस. त्यानंतर रुक्मिणीच्या कडून तू चारूदेशन, सुचारू, चारूवेश आणि यशोधन मिळवलेस. त्यानंतर चारूश्रवस, चारुयशस आणि शंभू झाले. मला तसाच मुलगा पाहिजे जसे तू रुक्मिणीला दिले आहेत. ते ऐकल्यावर मी तिला बोललो, "त्यासाठी मला थोडा समय लागणार आहे तो तिने द्यावा. म्हणजे मी तुझी कामना पूर्ण करीन. त्यानंतर ती मला सांगते कीं, मी माझ्या पद्धतीने ते साध्य करून घ्यावे. तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी मी पुन्हा नव्याने तपस्या करण्याचे ठरवले. ती सांगते कीं, सगळ्या देवता मला त्यात सहकर्य करतील त्यात ब्राह्मणदेव, शिव, काश्यप, सगळ्या नद्या, मनदेवता, पृथ्वीदेवता, सगळे ऋषी, वेदांतील छंद (त्या देवता), वनस्पती देवता, यज्ञ देवता, समुद्र देवता, साम, राक्षस, सगळे पितर, सगळ्या नरदेवता आणि मादी देवता, सूर्य, चंद्र, ग्रह, काळ, असें सगळे मला मदत करतील त्या तपस्येत असा ती आशिर्वाद मला देते. त्या देवता मला आनंदात ठेवतील आणि माझ्या साधनेत उत्तेजन देतील असे ती सांगते. त्यानंतर मी तिची रजा घेतली. त्यावेळी माझे जन्मदाता, माता राजा अहुक उपस्थित होते. त्यानंतर कपी राजपुत्रीचा मी निरोप घेतो. त्यांना मी सागतो कीं, ती विद्याधरांची राजकन्या माझ्याकडून काय अपेक्षा करत आहे. मोठ्या कष्टाने ते सगळे मला निरोप देतात. त्यानंतर मी गद आणि (बल) राम ह्यांना मिळालो.

ते मला उत्तेजन देत बोलतात, तुझी तपस्या वृद्धींगत हो आणि तिच्यात कोणती बाधा येणार नाही अशी प्रार्थना करतात. त्या सगळ्यांची परवानगी मिळाल्यानंतर मला गरुडाची आठवण झाली. त्याबरोबर तो हजर झाला. मला खांद्यावर घेऊन तो हिमालयकडे निघाला. त्याला मी रजा दिली. तो पहाड विलक्षण गोष्टींनी भरलेला होता. तपस्या करणार्यांसाठी तो उत्तम आहे. ती जागा व्याघ्रपादाच्या मुलाची उपमन्यूची होती. ते तीर्थक्षेत्र देवतांची आवडती जागा आहे. गंधर्वसुद्धा तेथे येत असतात. तेथे अध्यात्मिक शक्तीचा संचार मला जाणवत होता. तेथे विविध औषधी वनस्पति होत्या. धव, कुकुभ, कदंब, कुरुवक, केतकी, जंभूळ, वड, वरुनक, वत्सनाभ, विलास, बिल्व, सरस, कविठ, फ्यास, माड, ताड, सालसा, बोर, कुंद्ध , पुंगव, अशोक, आंबा, कोविद, चंपक, फणस, असे कित्येक, तेथे फळां फुलांनी डवरलेले होते. तेथे उंच वाढणारी गवतसुद्धा होती. तेथे विविध प्रकारच्या पक्षांसाठी खाण्यासारखी कित्येक फळं होती. तपस्व्यांना बसण्यासाठी राख पसरलेली होती. तेथे रुरू (एक प्रकारची मेंढी), वानर, वाघ, सिंह, चित्ता, मांजरी, हरणं, विविध प्रकारचे मोर, त्याशिवाय सर्व सुद्धा तेथे वावरत होते. त्याशिवाय मोठे गवा, अस्वलं दिसत होते, वारा मधूर नांद करत वहात होता. जणु काय अप्सरा वावरत आहेत. दर्या खोर्यातून निर्मळ पाण्याचे झरे होते. त्यांचा झरझराट ऐकू येत होता. हत्तींचे खिंकाळणे व किन्नरांचे गाणं हे सुद्धा कानावर पडत होते. त्यात भर होती वेदांचे घोष, साम गानं, त्याना साथ देणारे वाद्यवृंद अशामुळे ती जागा अतिप्रसन्न झाली होती. कोणी कल्पनासुद्धा करू शकणार नाही अशी अप्रतिम ती जागा होती. तेथे जोग्यांसाठी रहाण्यासाठी प्रशस्थ वाडे होते सगळ्या सोईनिशी सज्ज ते होते. तेथे पवित्र अग्नी ठेवण्याची व्यवस्था होती. सर्वत्र फुलांनी डवरलेल्या वेली होत्या. तेथून गंगा वहात होती. ती जन्हूची कन्या आहे. तिच्या तटावर असंख्य ऋषी तपस्या करत होते. त्यातील कांहीं फक्त हवा खाऊन रहात होते. कांहीं फक्त पाणी पित होते. त्यातील कांहीं जपयज्ञ करण्यात मग्न होते. कांहीं मंत्रजप करत होते. त्यातील कांहीं त्यांची आत्मशुद्धी करत होते विविध योग साधनांनी. त्यात कांही फक्त धुम्रपान करत होते. कांहीं दुध प्राशन करत होते व कांहीं अग्नी. असा विलक्षण तो प्रदेश

होता. कांहीं गवत खात होते. कांहीं दाताने धान्य सोलत होते तर कांहीं दगडानी घासून धान्य भरडत होते. कांहीं सूर्याचे आणि चंद्राचे किरण शोषून त्यावर जगत होते. कांही औदुंबराची फळ खात होते. कांही पाण्यात रहात असतात. कांहीं चिंध्या परिधान करून होते तर कांही वल्कल नेसलेले होते व कांहीं चामड्याची वस्त्र नेसलेले होते. त्यातील कित्येक कठोर साधना करत होते. ते सगळे पहात पहात मी एका आश्रमात प्रवेश केला. तेथे कित्येक देवता त्यांच्या नित्याच्या साधना करत बसलेल्या होत्या. तेथे असलेल्या देवतांवर शिवाची कृपा होती. तेथे मंगुस सांपाबरोबर खेळत होते. वाघ आणि हरण एकत्र बागडत होते. ते होत होते कारण तेथे तपस्या करणार्या साधकांच्या पुण्याईमुळे तो परिसर पापशून्य झाला होता. तेथे हिंसा होऊ शकत नव्हती. मी तेथे प्रवेश केल्यावर जे प्रथम पाहिले तो एक जटाधारी जोगी होता. त्यांच्या अंगावर चिंध्या होत्या. तो सूर्यासारखा तेजस्वी होता. त्यांच्या भोवती त्यांचे शिष्यगण होते. ते ब्राह्मण आधुनिक विचारसरणीचे होते. त्या जटाधारी जोग्याचे नांव होते उपमन्यू.

उपमन्यू माझ्याकडे पहात माझे स्वागत करतो. तो पुढे मला बोलतो कीं, माझ्या येण्याने त्याच्या आश्रमाची शान द्विगुणित झाली आहे. पुढे तो मला बोलतो कीं, मी पुज्य आहे. परंतु, तुला माझ्याशी काय काम आहे ते सांग. मी नमस्कार करत त्याला बोललो, त्यात नेहमीचे रिवाजाचे बोलणे होते. तेथील प्राणिमात्रांची चौकशी केली. तेथील अध्यात्मिक कार्यक्रमाची चौकशी केली. त्यानंतर उपमन्यू गोड वाणीत बोलला, "अरे कृष्णा, तुला इच्छित पुत्र निश्चितपणे होणार आहे. ईशानची कृपा प्राप्त करण्यासाठी तुला घोर तप करावे लागेल. तो जगाचा स्वामी त्याच्या अर्धांगासह येथे वावरत असतो नेहमी. अरे जनार्दना, येथेच अनेक देवता त्याची कृपा प्राप्त करू राहिल्या आहेत. ईश अध्यात्मिक शक्तीचा भांडार आहे. ज्याला कांहीं कमी नसते त्याला भक्ताची साधना जी ब्रह्मचर्याने तेजस्वी झाली आहे फार प्रिय असते तो त्या भक्तीचा भुकेला असतो कारण तेवढी एक गोष्ट त्याच्याकडे नसते. तो महान दानव हिरण्यकश्यपू ज्याचे सामर्थ्य असे होते कीं, तो पर्वत मेरू हलवू शकत होता. त्याने महादेवाची कृपा मिळवून दहा लक्ष वर्षे त्याचा उपभोग घेतला. त्याचा मुलगा मंदार शीवाच्या कृपेने शक्राशी एक लक्ष वर्षे लढत होता. त्याच्या पुढे विष्णूचे चक्र आणि इंद्राचे

वज्र निकामी ठरले होते. तुला आठवते कां? तुझ्याकडे जे चक्र आहे ते महादेवांनी दिले होते. ते तेव्हां झाले होते जेव्हां महादेवानी एका दैत्याचा वध केला जो पाण्यात रहात असे. ते चक्र महादेवाने तयार केले आहे. त्यानंतर ते त्यानी तुला दिले आहे. एक पिनाक धारी फक्त ते वापरू शकत होता. त्याचे तेज इतके होते कीं, कोणी त्याकडे पाहू शकत नव्हते. म्हणून त्याचे नांव सुदर्शन चक्र असें त्यांनी ठेवले आहे. तसे शक्तीमान सुदर्शन चक्र मात्र हिरण्यकश्यपूच्या मुलावर, मदारवर कांहीं परिणाम करू शकले नव्हते. शेकडो सुदर्शन चक्र आणि हजारो वज्र त्याला थांबवू शकत नव्हती. असा महादेवाच्या कृपेचा प्रभाव आहे.
आणखीन एका दानवावर महादेवाची कृपा झाली होती त्याचे नांव होते विद्युतप्रभा. त्याला महादेवांनी सगळ्या तिनही जगाची मालकी बहाल केली होती. तो एक लक्ष वर्षे सगळ्या जगावर राज्य करत होता. त्याला महादेव एकदा बोलले, "अरे मंदार, तू माझा सेवक होणार आहेस. त्यानंतर महादेवानी त्याला लक्षावधी पुत्र होण्याचा आशिर्वाद दिला. तो स्वयंभू त्याला कुसद्विप बहाल करतो. आणखीन एका असुराची कथा सांगतो, त्याचे नांव होते शतमुख. त्याला उत्पन्न केले होते ब्रह्माने. तो एक हजार वर्षे महादेवासाठी यज्ञात अर्घ्य देत होता. त्यात त्याने स्वताचें मांस आहुतीत दिले होते. अशा अघोरी तपस्येने त्याने शीवाला प्रसन्न केले होते. महादेव त्याला सांगतात, मी तुला काय द्यावे ते बोल. शतमुख बोलतो, "आपण महान अहात, मला ती सिद्धी द्या ज्याच्या मदतीने मी नवीन प्राणी माझ्या कल्पनेचे उत्पन्न करू शकेन. त्याशिवाय देवांच्या सिद्धी मला प्राप्त झाल्या पाहिजेत". महादेव त्याला ते देतात.
स्वयंभू ब्रह्मा त्याचे एकचित्त करून योगसाधना करत होते तिनशे वर्षे तसे होते. कारण त्याना मुलगा हवा होता. महादेव त्याला एक हजार मुलगे देतात. त्यांची ताकद यज्ञाच्या योग्यतेची होती. असे आहेत योगेश्वर महादेव. त्यामुळे सगळ्या देवता त्यांची आराधना करत असतात. जो महादेवाला भक्ती देतो त्याला महादेव जे मांगेल ते देतो इतका महादेवाला भक्तीचा शोक आहे. तिच गोष्ट ब्रह्मदेवाची असते. त्याचा फायदा असुर, राक्षस, दैत्य, दानव घेत आले आहेत. उपमन्यू पुढे सांगतो, एक ऋषी होऊन गेले, त्यांचे नांव होते याज्ञवलक्य. त्यांने महादेवाची भक्ती केली. तो

ख्यातनाम झाला कारण त्याने नवीन वेद दिला (शुक्ल यजूर्वेद) पुरोहित ब्राह्मणांच्या भल्यासाठी.

तो पराशराचा मुलगा होता. त्याचे नांव कृष्ण द्वैपायन होते, त्याच्या सामर्थ्याचे कारण त्याची महादेव भक्ती होती. वालखिल्य त्याच्या छोट्या आकारामुळें इंद्राने त्यांची मस्करी केली त्यामुळे ते फार रागावले होते. त्यांनी रुद्राकडे त्या विरुद्ध तक्रार केली तेव्हां एक पक्षी महादेवांनी त्यांना दिला जो प्रति इंद्र होता. तो पक्षी इंद्राचे अमृत पळवतो. इंद्राची मस्ती संपते. एकदा शंकराच्या क्रोधामुळे धरतीवरील सगळे पाणी नाहीसे होते. देवता त्याला प्रसन्न करण्यासाठी एक यज्ञ करतात, त्या यज्ञाचे नांव सप्तकपल असें होते. त्यामुळें इतर स्त्रोताचे पाणी नद्यांत येते. त्यानंतर त्रिनेत्र शांत होतात व पुन्हा पाणी उपलब्ध होते. अत्री ऋषींची पत्नी जी वेदशास्त्र संपन्न होती, एकदा रुसून तिच्या पतिचा त्याग करते. ती त्यावेळी रागांत बोलते कीं, ती त्यानंतर तिच्या बैरागी पतीबरोबर रहाणार नाही. त्यानंतर ती महादेवाच्या संरक्षणात जाते. कारण तिला तिच्या पतिची भिती वाटत असते. तशी तिनशे वर्षे जातात. ती सगळ्या खाण्यांचा त्याग करते. एका लाकडाच्या फळीवर ती रहात असते व त्याप्रकारे तपस्या करत असते. तसे व्रत ती करत असते भवाला प्रसन्न करण्यासाठी. त्या तपाच्या अखेरीस महादेव तिच्या स्वप्नात येतात, ते स्मित करत होते, बोलतात, तुला जसा हवा तसा पुत्र होईल. त्यासाठी तुला कोणत्याही पुरूषाची आवश्यकता नसेल. रुद्राच्या कृपेने तो मायावी पुत्र जन्म घेईल. तो तुझे नांव अजरामर करील. ख्यातनाम विकर्ण महादेवाच्या भक्तीने सुखी जीवन जगत होता. सकल्य त्याच्या इंद्रियसंयमनाने भवाला संतुष्ट करत होता. त्याला यश प्राप्त होते. त्याचे तप नऊ वर्षे तो करत होता. नऊ वर्षाच्या तपस्येनंतर रुद्र त्याला वर देतात कीं तो एक नामचंद लेखक होईल. तिनही जगात तुझे नांव होईल. तुझा वंश कधी संपणार नाही. त्या वंशात श्रेष्ठ योगी जन्म घेतील. तुझ्या घराण्यात जन्मणारा तुझ्या लिखाणाची सुत्र तयार करील.

कृतयुगात एक प्रसिद्ध ऋषी झाला होता त्याचे नांव शवर्ण होते. तो त्याच्या आश्रमात सहा हजार वर्षे तपस्या करत होता. रुद्र त्याला आशिर्वाद देतो कीं, तू कधी वृद्धत्वाने अपंग होणार नाहीस आणि तुझे लिखाण सगळ्यांना मार्गदर्शक होईल. इंद्र दिगंबर

महादेवाची आराधना करतो वाराणशीमध्ये. त्या महादेवाच्या अंगाला स्मशानाची राख फासलेली होती. त्यानंतर तो देवांचा राजा होतो.

नारदसुद्धा भवाच्या आराधनेने सिद्ध झाला होता. त्यानंतर तो जगाचा गुरू झाला. महादेव त्याला आशिर्वाद देतात कीं, त्याच्या इतका मोठा तपस्वी होणार नाही. पुढे ते त्याला सांगतात कीं, तो महादेवाच्या स्तुतीची गाणी, भजन गाऊन लोकांचे प्रबोधन करील. तुझे एक वाद्य असेल (वीणा) जे तुझ्या करता प्रसिद्ध असेल. अरे माधवा, आणखीन सांगतो भक्तीच्या बदल्यात महादेवाच्या कृपेचे किस्से. प्राचीन काळी मला महादेवाचे दर्शन कसे झाले ते सांगतो. मी इंद्रियसंयमनाने, मनाच्या एकाग्रतेने ते साध्य केले होते. ते कृतयुगात झाले. एक थोर ऋषी होऊन गेला ज्याचे नांव होते व्याघ्रपाद. त्याच्या वेदाच्या व्यासंगाची मोठी किर्ती होती. मी त्याचा मुलगा म्हणून जन्मलो होतो. धौम्य ऋषी माझा धाकटा भाऊ होता. एकदा धौम्याबरोबर आम्ही एका आश्रमात गेलो होतो. तेथे मी पाहिले कीं कोणी एका गाईची धार काढत होते. ते दूध मला अमृतासारखे वाटले. त्यानंतर आम्ही घरी गेलो. घरी गेल्यावर लहान मुलाप्रमाणे मी माझ्या आईला बोललो, मला दुधाबरोबर कांहीं खाण्यासाठी दे. परंतु, त्यावेळी घरात दूध नव्हते. माझ्या आईला फार दुःख झाले कीं, ती मला तसे देऊ शकत नव्हती. ती भाताचे पिंड पाण्यात कालवून शिजवून ते पांढरे दिसणारे भाताचे पाणी (पेज) माझ्यापुढे ठेवले. मला ते पिण्यास सांगितले. मी त्या आधी दूध प्यालो होतो व मला दूधाची रुची माहीत होती. कारण माझ्या पित्याने मला एका राजाकडे झालेल्या यज्ञात नेले होते. तेथे मी त्या गाईचे दूध प्यालो होतो. आईने दिलेल्या पाण्याची चव मी चटकन समजलो. मी लहान मुलासारखा तिला बोललो कीं, ते दूध नाही. ते ऐकून कष्टी मनाने ती मला जवळ घेऊन व माझ्या माथ्याला हुंगून साश्रू बोलते कीं, "माझ्या मुला, आपण बैरागी आहोत आपल्याकडे गाय कोठून असणार? आपण वनात रहातो आपल्याकडे पशुधन नसते. त्यामुळें दूध नसते. आपण कंदमुळं, फळं आणि पानं खाऊन रहातो. आपण नदीच्या किनारी वालखिल्यांच्या बरोबर रहात आहोत. आपली वस्ती डोंगरावर आणि वनात असते तेथे वन्य पशू असतात त्यामुळे गाई सांभाळणे शक्य नसते. कधी आपले लोक निव्वळ हवा नाहीतर पाण्यावर रहात असतात त्यामुळें

आपल्या कडे दूध नसते. आपण सामान्य लोकांचे खाद्य खात नाही. त्यात भोग असतो ते आपल्याला अखाद्य असते. आपण केवळ वनात मिळणारे खाद्य उपजिवीकेसाठी घेत असतो त्यात दूध नसते. वनात सुरभी (दूध देणारी गाय) नसते त्यामुळे तिचे दूध मिळत नाही. आपला सगळा काळ ध्यान साधनेत असतो कोणतेही सुखोपभोग आपल्याला वर्ज असतात ज्यामध्ये दूध आहे. आपला सगळा काळ मंत्र साधना, शीवाची उपासना, तेंच आपले जीवन असते. त्यासाठी आपल्यासारख्यांना दूध मिळण्यासाठी स्थानूच्या आशिर्वादाची आवश्यकता असते. म्हणून तू शंकराची आराधना करत राहिलास तर तुला नेहमी दूध मिळत असेल. कोणाकडे मांगावे लागणार नाही. तुझ्या भोगेच्छा तोंच पूर्ण करू शकतो. कारण महादेव भक्तीचा भुकेला असतो".

ते ऐकल्यानंतर मी तिला वंदन केले दोनही हात जोडून. मी तिला विचारले हे शंकर कोण आहेत? माझा तो बालिश प्रश्न ऐकून ती हसूं लागली. मी विचारले त्यांना प्रसन्न करण्यासाठी मी काय केलं पाहिजे ते सांग. तो देव कोठे रहातो मी आणखीन एक बालिश प्रश्न विचारला. मी त्याना कसा भेटू शकेन? त्याना प्रसन्न मी कसे करावे? सर्वाचे रुप कसे आहे? ते मला दिसतील कां? मला ते कोठे आहेत ते दाखव". असे प्रश्न मी विचारत होतो व ती खिन्नपणे हसत होती. मला प्रेमाने थोपटून मला सांगते, "अरे पापात रमणार्यांना ते दिसत नाहीत. किंवा मदत करत नाहीत. त्याची सतत आठवण सुद्धा अशा अस्वस्थ मनाच्या लोकांना करता येत नाही. जे शुद्ध मनाचे आहेत ज्याच्या मनात कोणाचं वाईट करण्याचे विचार कधी येत नाहीत अशांना तो दिसत असतो. मी आणखीन एक बालिश प्रश्न विचारला, "आई तो भव कां सर्व माझ्याशी खेळेल कां"? तो प्रश्न ऐकून माझ्या आईच्या डोळ्यातून अश्रूच्या धारा वाहू लागतात. पण मला ते समजत नाही कारण, अहो माधवा, मी खूप लहान होतो तेव्हां. माझ्या कोवळ्या मनात ते समजण्यासारखे नव्हते. पाप वगैरे मला कांहीं समजत नव्हते. ती मला सांगते कीं, शंकर सगळ्यांच्या आत सदैव असतोच त्याला भेटण्यासाठी त्याचे सतत स्मरण करत रहावयाचे असते. ईशान खूप प्रेमळ आहे व भक्ताच्या खर्या याचना तो पूर्ण करतो. असें ऋषी सांगत असतात ते मला आईने सांगितले. देव सांगतात कीं, त्यासाठी महादेव विविध रुप घेऊन त्याच्या प्रामाणिक याचकांची मदत करत असतो असे

फार प्राचीन काळा पासून होत आहे असें तिने मला सांगितले. फक्त तुझी भक्ती केवळ कांहीं मिळवण्यासाठी नसावी. त्यात खरी निरपेक्ष भक्ती असली पाहिजे. अशारितीने मला पहिला धडा अध्यात्मविद्येचा आईने दिला. ती सांगत होती कीं, जर भव तुला स्वीकारतील तर ते तुला दर्शन देतील आणि तुझ्याशी खेळतील सुद्धा असे सांगून तिने माझे समाधान केले. महादेवाने जी विविध रुप घेतली त्याबद्दल तू मला विचारत होतास ते सांगतो. माझी आई पुढे मला सांगते, भव विष्णू आणि ब्रह्माची विविध रुप घेत असतात. कारण ते त्याचेच रुप असते. त्यात रुद्र, आदित्य, आश्विन, विश्वदेव, प्रेत आणि पिशाच्चांचे आणि किराटांचे तसेंच श्रवर, विविध जलप्राणी, मांसे, कवचधारी अशी कित्येक रुप त्यांनी घेतली आहेत त्याच्या भक्तांचे इप्सित पूर्ण करण्यासाठी. महादेव यक्ष, राक्षस, सर्प, दैत्य आणि दानव ह्यांच्या रुपानेसुद्धा भेटत असतात. त्याच प्रमाणे बिळात रहाणारे, चिखलात रहाणारे, वनात रहाणारे, उडणारे अशा सगळ्या योनीतील जीवांच्या रुपात ते प्रकट होत असतात कारण मुलतः ती सगळी रुप त्याचीच आहेत. असें मला माझी आई सांगत होती. सजीव आणि निर्जीव अशा दोनही प्रकारच्या गोष्टीत ते असतात म्हणून त्यांचे दर्शन त्यांच्या खर्या भक्तीने त्यांतून होत असते. त्यानंतर मला माझी आई सांगते कीं, महादेव अनेक मुखाच्या रुपात सुद्धा दिसतात. त्यात सहा मुख, दहामुख ही विशेष आहेत.

महादेवाच्या भोवती भूत, पिशाच्च असतात. त्यांची रुपं आणखीन विलक्षण असतात जे तुला सांगता येणार नाही. महादेव कधी ऋषी तर कधी गंधर्व तर कधी सिद्ध, चरण अशा रुपात वावरत असतात. त्यांना अनेक हात, अनेक पाय अशी रुप सुद्धा घेतलेले अनेकांनी पाहिलेले आहेत. त्याची आराधना अनेक प्रकारच्या मंत्रानी, आवाजांनी, वाद्यांनी, ज्याला जशी करावयाची आहे तशी परंतु, प्रामाणिक करण्याची मुभा असते. अप्रामाणिक भक्ती करणारे अगतिक होऊन बद्ध होतात त्यांना गती नसते. महादेवाची प्रमुख वाणी आहे परा वाणी. तो त्या वाणीने सगळ्या चराचरांशी संपर्क करत असतो. महादेव प्रत्येकाच्या अंतर्यामी असतो म्हणून त्याला अंतरात्मा असेसुद्धा सांगतात. ते तुझ्यात आणि माझ्यात सुद्धा असतात. फक्त आपण त्यांना विसरलो म्हणून सगळे प्रश्न आपल्याला सतावत असतात. महादेव कोठे बाहेर जे शोधतात त्यांना तो कधीच मिळत

नाही त्याला शोधावयाचे तर ते अंतर्यामी पहावे लागते म्हणून अरे माझ्या बाळा, तू त्यांचे ध्यान करण्याची सवय कर मग तुला दूधच काय जे पाहिजे ते सगळे मिळत राहिल. माझी आई माझे समाधान करण्यासाठी सांगत होती. कधी रुद्र रुपात रागावतात तर कधी महादेव म्हणून आनंद दाखवतात. त्यांचे तीन डोळे जगाचे निरिक्षण करत असतात. दोन डोळे पहाण्यासाठी व तिसरा डोळा शिक्षा करण्यासाठी (शिस्त लावण्यासाठी) असतो. त्यांची शस्त्र आहेत, त्रिशूळ, पिनाक, सुदर्शन चक्र, गदा, समशेर, परशू आणि सोटे अशी विविध आहेत. त्याच्या अंगावर सर्प असता. गळ्यात कमरेला, जान्हवे म्हणून असे सगळे साप त्याच्या अंगावर असतात. पृथ्वीला आधार देणारा शेष सुद्धा त्याचेच रुप आहे. त्यांचे वस्त्र हत्तीच्या कातड्याचे असतात तर कधी ते विवस्त्र असतात. कधी ते हसतात तर कधी गाणी गातात. कधी नृत्य करतात. नृत्याचा शोध महादेवानी लावला जेव्हां त्यांनी सृष्टी उत्पन्न केली. त्याचा वास बहुधा स्मशानात असतो जेथे प्रेते जाळली जातात. कधी ते चिरकाळ निद्रा घेतात तर कधी पूर्ण जागृतीत असतात. कधी भयंकर असतात तर कधी प्रेमाचा साक्षात्कार असतात. महादेवाच्या वागण्यातून नवरस व्यक्त होत असतात. गाण्यातून सप्तस्वर उमटतात. ते नेहमीच ध्यानस्थ असतात. ते यज्ञात दिसतात. कधी स्वतः आहुति होतात व कधी आहुति घेतात. महादेव लहान मुल तर कधी युवक तर कधी वृद्ध अशी प्रत्येक वयाची रुप घेतांना साधकाला दिसतात. कोणाला गौरंगी तर कोणाला कृष्णांगी तर कोणाला निलवर्णी तर कोणाला हिंगुळासारखे (लाल) दिसतात. सूज्ञ सांगतात कीं, खरेतर त्यांना त्यांचा असा रंग रुप आकार असें कांहींही नाही ते भक्ताच्या कल्पनेनुसार त्याला भासत असतात. कारण महादेव खरेतर निर्गुणी आहेत. ते गुणांच्या पलिकडले आहेत. भक्ताच्या समाधानासाठी ते त्याला हव्या त्या रुपात दिसत असतात. जर त्यांचे खरे रुप पहाण्याचा प्रयत्न केला तर कांहींच दिसणार नाही. भक्ताच्या अज्ञानाप्रमाणे त्यांचे रुप त्याला भासते व तो त्याचे वर्णन करत असतो. कोणाला तो हिरण्यगर्भ वाटतो तर कोणाला अनादीअनंत वाटतो. महादेवाचे ज्ञान होण्यासाठी आत्म्याशी संपर्क असावा लागेल केवळ जीवाच्या कल्पनानी तो समजणार नाही. तो शरीरात आहे, शरीराच्या जीवात आहे आणि शरीराच्या आत्म्यात आहे. असा तो शरीराच्या तीन अंगात असतो

परंतु, लिंगदेहात नसतो जे शरीराचे चौथे अंग आहे. कारण लिंगदेह त्या आत्म्याच्या जीवाच्या कर्मविपाकाचा लेखाजोखा असतो, त्यात माणसाच्या पापाचा हिशोब असतो म्हणून त्यात तो नसतो.

आईने जे मला सांगितले त्यानंतर माझी महादेवाची भक्ती जी सुरू झाली ती आतजागायत चालू आहे. मला दुसरे कांहीं नको असे झाले. मी एक हजार वर्षे त्याच्यावर ध्यान करत राहिलो. त्यानंतर एक हजार वर्षे मी एका पायावर उभा राहून तप केले, त्यानंतर एक हजार वर्षे मी फक्त पाण्यावर नंतरची हजार वर्षे फक्त फळांवर त्यानंतरची सातशे वर्षे फक्त हवेवर राहून मी महादेवाचे ध्यान करत होतो. केवळ महादेवांची कृपा व्हावी एवढ्यासाठी मी ते करत होतो. अखेरीस माझी प्रार्थना त्यांच्यापर्यंत पोहोचली. ते माझ्यावर प्रसन्न झाले. माझी ती परिक्षा होती कीं मी खरोखरच त्यांचा भक्त आहे कां इतर देवांचे सुद्धा मला आकर्षण आहे. ते इंद्राच्या रुपा आले त्यांच्या बरोबर अनेक देवता आणि अप्सरा असा मोठा परिवार होता. ते ऐरावता वर आरुढ होऊन आले होते. त्याचे चार सुळे मला भिववण्याचा प्रयत्न करत आहेत असे मला वाटले. मी जेथे होतो तेथे तो इंद्र येतो. ते मला बोलतात कीं, मी देवांचा राजा स्वर्गाधिपती इंद्र तुझ्यावर प्रसन्न झालो आहे, बोल तुला काय पाहिजे. ते इंद्राचे ऐकून मला आनंद अजिबात झाला नाही. मी दुःखी झालो होतो. कारण मी त्याची याचना कधी केलीच नव्हती. मी त्याला सांगितले कीं, मी तुझी तपस्या केलेली नाही व म्हणून मला तुझ्याकडून कांहींही नको. त्यापुढे मी बोललो कीं, मी महादेवाची साधना करत आहे आपण चुकून आला अहात माझ्याकडे. मला केवळ महादेवाची कृपा पाहिजे बाकी कांहीं नको.

ते ऐकून तो इंद्र बोलतो, "तुला जे पाहिजे ते द्यायला मी आलो आहे मग महादेवाचाच आग्रह धरण्याचे कारण काय? तुला जे हवे ते मी देतो तेव्हां महादेवाचा नाद का तू सोडत नाहीस"?

उपमन्यू त्याला सांगतो, "मी माझ्या आराध्य देवतेकडून जे घ्यायचे किंवा नाही घ्यायचे ते ठरवीन आपण कां उगाचच तसदी घेता"?

"अहो मेघावत, मी तुमच्या येण्याचे स्वागत करतो पण मी तुमचा चाहता नाही तरी आपण आपल्या भक्तांकडे जाणे उचित होईल. तसे पहाता, माझी इच्छा महादेवाचे सत्य दर्शन घेण्याची आहे दुसरे कांहीं नको म्हणून, आपण माझे समाधान करू शकणार नाही. ज्याने हे विश्व साकारले, ज्याने पंचमहाभूत घडवले आणि ज्यांनी तुलासुद्धा उत्पन्न केले अशा महादेवाच्या सत्य दर्शनासाठी मी अनेक वर्षे तपस्या करत आहे दुसरी कोणतीही इच्छा मला नाही. ते लक्षात घेऊन कृपया आपण माझी रजा घ्याल तर मोठे उपकार होतील माझ्यावर. मी महादेवा व्यतिरिक्त कोणाचाही चाहता नाही. आपला तर अजिबात नाही तेव्हां आपण निघून जाऊन मला माझी तपस्या करण्यात व्यत्यय करण्याचे थांबवाल तर बरे होईल. देव आणि दानव ह्यांचे संतुलन तो करू शकतो जे आपल्याला कदापिही शक्य नाही हा एक प्रमुख भेद आपल्यात आणि भवात आहे. आपण त्याची जागा घेण्याचा प्रयत्न करणे अमर्यादा ठरेल म्हणून तसे करू नका. दिशा, सूर्य, चंद्र, काळ, सगळे ग्रह, वारा, पाणी, आकाश, तारे, नक्षत्र, पृथ्वी असे जे सृष्टी चालवत आहेत त्यांचे नियंत्रण फक्त महादेव करत असतात जे तुझ्या आवाक्या बाहेरचे आहे म्हणून तू त्या विश्वनियंताशी तुलना करणे बंद केले तर बरे होईल. मला त्या परमेश्वराचे दर्शन पाहिजे ज्यांने तुला उत्पन्न केले आहे म्हणून तू येथून निघून जा. ज्याची आराधना सिद्ध करतात, ऋषी करतात त्या पिनाकधारीचे दर्शन हा माझ्या तपस्येचा उद्देश आहे त्यात येऊन व्यर्थ उपद्व्याप करणे बंद करावे आणि येथून निघून जावे. ज्याला भूः, भव, स्वाहा, महत अशी संबोधन आहेत त्या महेश्वराचे दर्शन हा माझ्या तपस्येचा उद्देश आहे तरी ते समजून आपण माझी रजा घ्याल तर बरे होईल. असा कोण आहे ज्याला देव, दानव, राक्षस, दैत्य आणि असुर असे सगळे भजतात त्या महादेवाचे मला सत्य दर्शन पाहिजे आहे मला तुझ्या, मेघावताच्या कृपेची कधीच अपेक्षा नव्हती. ते सगळे एकमेकांचे शत्रू आहेत परंतु, आराधना महादेवाचीच करतात त्या परमेश्वराची जागा घेण्याचा आगाऊपणा करणे तुला शोभत नाही. मला सांग शक्रा, तू कोणाकडे हात पसरतोस जेव्हां तू असुरांच्या हल्ल्याने बेजार होतोस ते मला सांग"?

"ते मुळबीज ज्यातून ब्रह्माचे अंड उपजले व त्यातून ही सृष्टी तयार झाली ते ज्या महादेवाचे आहे त्या महादेवाची मी प्रार्थना करत असतो. कोण आहे जो दिगंबर म्हणून

ओळखला जातो? असा कोण आहे ज्याचे अर्धांग पार्वती आहे त्याची आराधना मी करतो व त्याच्या दर्शनासाठी मी उत्सुक असतो तो तू नाहीस. कामदेवाला कोण दाबून टाकतो त्या महेश्वराची प्रार्थना मी करत असतो. तू कामदेवाचा मित्र आहेस त्यामुळे तुझी आणि महादेवाची बरोबरी करणे मूर्खपणा ठरेल. कोण स्मशानात रहातो त्याची आराधना मी करत असतो तो तू नाहीस. तो कोण आहे ज्याच्या आज्ञेत सगळी भूतं, पिशाच्च, वेताळ त्यांची कामं करत असतात त्या भूतनाथाची मी आराधना करत असतो तो तू नाहीस. महादेव निर्गुणी आहे तसा तू नाहीस. तुला तुझ्या कर्माची बाधा होते तशी महादेवाला होत नाही. म्हणून तू आता जा आणि मला माझी तपश्चर्या करू दे. महादेव भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य ठरवत असतो तसे तू करू शकत नाही. त्याची बरोबरी करण्याबद्दल तुला प्रायश्चित्त करावे लागेल. माझ्या आईने मला फार पूर्वी सांगितले होते, महादेव जगाच्या निर्मितीस कारणीभूत आहे. तसा कोणी नाही. ब्रह्मदेव, तू इंद्र स्वतः, विष्णू, हुताशनि (अग्नी), असे निरहंकाराची प्रतिकं त्यांच्या बरोबर सगळे दैत्य आणि असुरादि अहंकाराची प्रतिकं फक्त महादेवाची पुजा करतात. मोक्ष प्राप्तीसाठी महादेव मदत करतो तशी तू करू शकत नाही. मग मला काय विचारत आहेस, कीं, मला काय पाहिजे? सगळ्या देवता फक्त महादेवाची पुजा करतात तुझी कोणीही करत नाही. कारण तू फक्त देवांचा कालबद्ध राजा आहेस स्वर्गाचा स्वामी आहेस. मला तुझ्याशा कांहीं कर्तव्य नाही. मला महादेवाकडून घ्यावयाचे आहे ते तू कधीही देऊ शकणार नाहीस. मी फक्त महादेवाची प्रार्थना करत आलो आहे माझ्या प्रामाणिकपणाबद्दल कोणी शंका घेऊ नये, अगदी महादेवांनीसुद्धा. त्या संभाषणानंतर ते घडले. कारण मला फार दुःख झाले होते कारण महादेव अजून माझ्यावर प्रसन्न झालेले नाहीत ही गोष्ट मला असहय्य झाली होती. त्याच वेळी ते मला दिसू लागले, तो इंद्राचा ऐरावत नंदीत रुपांतरीत होत होता. तो शुभ्र रंगाचा होता. त्याचे शरीर फार मोठे होते. त्याच्या शेपटाचे केस काळे होते. त्याचे डोळे मधासारखे तपकिरी रंगाचे होते. त्याची शिंग मोठी आणि टणक वाटत होती. शिंगांचा रंग सोनेरी होता. तो फारच देखणा होता. त्याची मान फार जाड होती. त्याचे वशिंड चांगलेच मोठे होते. त्याच्या पाठीवर महादेव बसलेले मला दिसले. त्यांच्या बरोबर त्यांचे अर्धांग होते, उमामाता.

त्यांचे तेज अवर्णनीय होते. त्यांचे तेज हजार सूर्यासारखे तीव्र असूनही त्यात उष्णता नव्हती. ते तेज आनंद देणारे होते. मी ते माझ्या डोळ्याने पहात होतो. त्या प्रकाशाने सगळा आसमंत असा भरला होता कीं, मी दुसरे कांहीं पाहू शकत नव्हतो. परंतु, थोड्याच वेळात सगळे सामान्य झाले. ते प्रकाश मायावी होते ते मी समजलो. त्यानंतर मी स्थानू आणि त्याचे वाहन नंदी व्यवस्थित पाहू शकत होतो. त्यांची प्रसन्न मुद्रा पाहून मला समजेना हे काय होत आहे. माझी हजारो वर्षाची तपस्या फळाला आली होती त्यावर मी विश्वास कसा ठेवू. मला तपस्या करण्याची इतकी सवय लागली होती कीं, ते काम झाले ही कल्पनाच मला अशक्य वाटत होती. मला एक प्रकारचा सुखद धक्का बसला होता. स्थानू बरोबर पार्वती बसलेली होती. स्थानूचा निळा कंठ मला स्पष्ट दिसत होता. त्याच्या गळ्यात पांढर्या रंगाच्या फुलांच्या माळा होत्या व अंगाला राख फासलेली होती. त्याच्याकडे ध्वज होता त्याचा रंग शुभ्र होता. त्याच्या गळ्यात सफेद रंगाचे जान्हवे होते. त्याच्या भोवती त्याचे गण उभे होते. त्यात भूत, पिशाच्च आणि देवगण होते ते त्यांच्या प्रकारची नृत्य करत होती. ते सगळे बिभत्स वाटत होते. त्याचा तिसरा डोळा भितीदायक असा चमकत होता. त्याच्या गळ्यातील सफेद कमळाची माळा त्याला शोभत होती. त्याच्या हातात तिरकमटा होता त्याचा रंग इंद्रधनुष्याचा होता. त्याच्या भातातील बाण युगांताच्या वेळेच्या अग्नीसारखे चमकत होते. ते बाण पशुपत होते. पापातम्यांना भिववणारे ते बाण होते. त्यांचे बाण इतर देवांच्या अस्त्रापेक्षा कितीतरी जास्त तेजस्वी होते. त्यात इंद्राचे वज्र, ऐंद्र, अग्नेय, वरुणाची अस्त्र ते त्या बाणांपुढे निष्प्रभ वाटत होते. त्या बाणांच्या योजनेने त्यांने ती तीन असुरांची नगरं भस्मसात केली होती. त्या बाणानी महादेव सगळे जग क्षणात भस्मसात करू शकत होते. ते पशुपत बाण होते. त्याहीपेक्षा जबरदस्त आणि रहस्यमय असे त्रिशूळ त्याच्या हातात होते. शिवाचे त्रिशूळ अतुलनीय अस्त्र आहे. ते फक्त महादेवच वापरू शकतात. अरे गोविदा, प्राचीन काळी युवनस्वाचा मुलगा मंधत्री ज्याने सगळे जग जिंकले होते, त्याने मर्यादा ओलांडल्यावर महादेवाने त्याच त्रिशूळांनी त्याचे सगळे सैन्य क्षणार्धात भस्म केले होते. रावण नावाच्या राक्षसाने शिवाचे त्रिशूळ मिळवून त्याने इंद्राचा पराभव केला होता. ते त्रिशूळ मी त्याच्या हातात पाहिले, अरे माधवा. मी शिवाच्या कपाळावरील

तीन आठ्यासुद्धा पाहू शकलो. त्याचे आणखीन एक शस्त्र मी पाहिले ते परशू. त्याच्या मदतीने जमदाग्नीच्या रामाने माजलेल्या भ्रष्ट क्षत्रियांचा सर्वनाश केला एकविस वेळा, हे तू जाणतोसच ते मी ह्या डोळ्यांनी पाहिले आहे. तो देवाच्या खांद्यावर ठेवलेला होता त्याला सापाने बांधून ठेवले होते. अशी कित्येक अस्त्र आणि शस्त्र मी देवाच्या अंगावर पाहिली आहेत. मी फक्त कांहींची माहीती सांगत आहे. त्याशिवाय त्याच्या डावीकडे ब्रह्मदेव दिसत होते. त्यांच्या रथात होते जो हंसपक्षी नेत असतात. त्याच बाजूला नारायण होते ते गरूडावर होते. नारायणाच्या हातात चक्र होते जे त्यांचे शस्त्र आहे. त्याशिवाय त्यांच्या हातात गदा होती. पार्वतीच्या जवळ स्कंद होता. तो त्याच्या मोरावर बसलेला होता. त्यांच्या हातात शूळ होते जे फेकून तो त्याच्या शत्रूंचा नाश करत असतो. त्यांच्या पुढे नंदी त्यांचे वाहन मानवरुपात दिसत होता त्याच्या हातातसुद्धा शूळ होते. त्यांच्या मागे अनेक मुनी, ऋषी उभे होते. ते सगळे माझ्याकडे पहात होते. त्यांच्या बाजूला दैवीमाता होत्या ज्या देवतांना जन्म देतात. त्या महादेवाच्या स्तुतीची कवनं गात होत्या. ब्रह्मदेव रथन्तर गात होते, नारायण ज्येष्ठ सांम गात होते. ती सगळी शंकराच्या स्तुतीची आहेत. इंद्र वेदातील मंत्रानी शिवाची स्तुती करत होता, ते शतरुद्रं होते. ते पाहिल्यानंतर मी महादेवाची स्तुती करू लागलो. कारण मला समजले कीं, हे खरोखरच भव अवतरले आहेत मला भेटावयाला तो भ्रम नव्हता.

उपमन्यू पुढे बोलतो, "अरे केशवा, मी महादेवाला नमन केले, त्यात त्याचे एक भक्त म्हणून मी मला जमेल तेवढे कौतुक केले. त्यांने मला आराम वाटला. त्याबरोबर मी विष्णू, इंद्र आणि ब्रह्माची सुद्धा स्तुती केली. महादेव मला दिसत होते ते मी वर्णन करून सांगितले. त्यामध्ये त्याचे अर्धनारीनटेश्वर हे रुप मला विशेष भावत होते म्हणून मी त्याचा उल्लेख करागौरी म्हणून केला. त्यानंतर त्याच्या गणांची मी स्तुती केली. महादेवाच्या मायावी सामर्थ्याचे मी कौतुक करत होतो कारण ते मला विशेष भावत होते. त्याचे अहंकार आणि निरहंकार अशा दोनही वृत्तींबद्दलचे निःपक्षपाती वागणे मला आवडत होते त्याचे मी कौतुक करत होतो. महादेवाच्या विविध अभिव्यक्तीचे मी कौतुक करत होतो. त्याची न्याय देण्याची पद्धत, त्याची शिक्षा करण्याची पद्धत, त्याची प्रेम करण्याची पद्धत, त्याची कृपा करण्याची पद्धत, त्याची क्रोध करण्याची पद्धत अशा

त्याच्या विविध अभिव्यक्ती मला भावत होत्या त्यांचे मी कौतुक करत होतो. देव आणि असुर दोघांना तो कसे सांभाळून घेत असतो ते मला आवडत होते त्याचे कौतुक करत होतो. दोघांना ते कसे त्यांच्या मर्यादा दाखवत असतात ते मला आवडत होते, त्याचे कौतुक मी करत होतो माझ्या स्तुतीसुमनांतून. कामदेव जो इंद्राला मदत करत असतो त्याच्या आगाऊगिरीचे कसा तो नियंत्रण करत असतो ते मला आवडत होते त्याचे मी कौतुक करत होतो. त्याची विविध संबोधने विशाख, भव, सर्व, ईशान जी मला आवडत त्यांचे कौतुक करत होतो. भगाचा वध करणारा, अंधकाचा वध करणारा, विश्वनाथ अशी त्याची मी स्तुती करत होतो. त्याच्या रुद्ररुपाचे मी कौतुक करत होतो कारण ते रुप मला फार प्रिय आहे. त्यांचे विविध रंग निळा, लाल आणि शुभ्र त्याचे वर्णन मी करत होतो. सांख्य विचाराप्रमाणे त्याचे पुरूष हे रुप मी माझ्या स्तुतीत घेतले होते. त्याचे ऋषभ हे रुप मी सांगितले त्यामध्ये. तोंच यक्षांचा कुबेर आहे ते मी सांगितले. त्याचा यज्ञातील वाटा मोठा असतो ते मी आवर्जून सांगितले माझ्या स्तुतीमध्ये. गृहस्थाना तो कसा मदत करतो, वानप्रस्थाश्रमीना कसा मदत करतो, संन्याशाना कसा मदत करत ते मला आवडते म्हणून त्याचे कौतुक करत होतो. त्याना मी म्हणत होतो कीं, तू यज्ञातील विष्णू आहेस, तू पर्वतात मेरू आहेस, तू चंद्र आहेस आकाशातील ग्रहांमध्ये, तू ऋषींमध्ये वसिष्ठ आहेस, तू आहेस सूर्य तारकांमध्ये, तू आहेस सिंह प्राण्यांमध्ये, पाळीव प्राण्यात तू वृषभ आहेस. आदित्यांत तू आहेस उपेंद्र, वसूमध्ये तू आहेस पावक, पक्षात आहेस गरूड, सर्पांत आहेस अनंत शेष, वेदात तू आहेस सांमवेद, यजूमध्ये शतरुद्रियम, योग्यात तू आहेस सनतकुमार, सांख्यात तू आहेस कपिलमुनी, मरुतात तू शक्र आहेस, पितरांत तू आहेस देवव्रत, रहाण्याच्या जागात तू आहेस ब्रह्मलोक, सगळ्या अंतांत तू आहेस मोक्ष. तू विचारसागर आहेस ज्यातून सगळे विचार उत्पन्न होतात. पहाडांत तू हिमालय आहेस, मनुष्याच्या वर्णात तू आहेस ब्राह्मण, ब्राह्मणांत तू आहेस दिक्षीत, तू विनाशकांत आहेस काळ, तू ह्या विश्वाची प्रेरणा आणि कार्यकारी उर्जा आहेस, तू अध्यात्मिक शक्तीचे स्रोत आहेस. अशारितीने मी त्याचे कौतुक करत स्तुतीसुमनं गात होतो. त्यामुळें मला अपरिमित संतोष मिळत होता. तुझ्या भक्तांचा तू त्राता आहेस, तू

त्यांना कधीच अंतर देत नाहीस. माझे तुला वंदन आहे, तुझ्यामुळें दुरितांचे तिमिर संपते, माझ्या चुकांबद्दल अरे माझ्या देवा मला माफ कर. माझ्यावर कृपा कर. अरे माझ्या देवा, मी तुला अर्घ्य दिले नाही तुझे पाय धुण्यासाठी त्याबद्दल मला क्षमा कर. अशी प्रार्थना मी त्याच्यापुढे केली. त्यानंतर मी त्याचे पाय धुण्यासाठी पाणी दिले त्याचे पाय मी माझ्या हातांने धुतले. त्यानंतर त्याच्या आज्ञेची मी प्रतिक्षा करत तेथे उभा राहिलो. त्यावेळी स्वर्गीय सुगंधी फुलांचा वर्षाव माझ्यावर झाला. स्वर्गीय वाद्यवृंद वाजू लागले. विविध वाद्ये सुमधूर धून काढू लागल्या. महादेव आणि त्याचे अर्धांग उमा माझ्यावर प्रसन्न झाले होते. त्यावेळी मला जो आनंद झाला त्याचे वर्णन करता येणार नाही. महादेव त्यानंतर त्यांच्या बरोबर असलेल्या देवतांना उद्देशून बोलतात, "पहा माझा भक्त, त्याची उपासना मोठी झाली. त्याच्या भक्तीशी तुलना होणार नाही. त्याच्या सगळ्या कामना पूर्ण होतील. त्यावर सगळ्या देवता त्याला अनुमोदन करतात. त्यामध्ये ब्रह्मदेव सुद्धा होते. सर्व ज्याला ईशा आणि शंकर अशी नांव नेहमीची आहेत, माझ्याकडे पहात बोलले, "अरे उपमन्यू, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. माझी आज्ञा आहे कीं, हे सगळे देव तुझ्या इच्छा पूर्ण करण्यास बांधलेले आहेत". ते ऐकून माझ्या अंगावर कांटा उभा राहीला. डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. मी गुडघ्यावर बसून त्यांच्या पाया पडलो. मी देवाला बोललो, "मी आजवर एक मर्त्य इसम होतो ह्यापुढे मी खर्या अर्थाने अमर झालो आहे. त्याचे फळ मला मिळाले आहे. जो देव आणि असुरांचा तारणकर्ता आहे अशा माझ्या आराध्य देवतेचे मी माझ्या चर्मचक्षूनी दर्शन घेत आहे". त्याची आणखीन स्तुती करण्यासाठी मी म्हणालो, "ह्या सृष्टीच्या संरक्षणासाठी माझा (महा)देव विष्णू उत्पन्न करतो आणि कल्पांती ते संपवण्यासाठी तो रुद्र उत्पन्न करतो. तो रुद्र सगळे चराचर नष्ट करतो तेव्हां त्याला काळ म्हणतात. संवर्तक (पाण्याचा महासागर) आणि अग्नी ह्यांच्या लिलेने ती सृष्टी ब्रह्मात विलीन होते. रुद्राच्या रुपाने तू ते सगळे संपवतोस. तूंच उत्पन्न करतोस व नष्टसुद्धा तूंच करतोस. ते तुझ्यातून निघते व अखेरीस तुझ्यातच विलीन होते अशी तुझी लिला आहे. तू कोणाला कधी दिसत नाहीस, देवांनासुद्धा. अरे महादेवा, तू सांगतोस कीं, तू माझ्यावर प्रसन्न झाला आहेस तर मला कांहीं मांगता येईल कां, तुझ्या कडे? जर तू मला कांहीं देऊ

इच्छित असशिल तर असा आशिर्वाद मला दे ज्यामुळें मी भूत, वर्तमान आणि भविष्य असे सगळे विनासायास समजू शकेन. ज्या प्राथमिक इच्छेतून तुझी मी आराधना हजारो वर्षापुर्वी सुरू केली ती माझी इच्छा कीं, माझे सगळे आप्त, मित्र कधीही अन्नावाचून रहाणार नाहीत व त्यांना दूध खाण्यात मिळेल आणि आपण नेहमी माझ्या आश्रमात उपस्थित रहाल". ते ऐकून महादेव "तथास्तू", म्हणतात, त्यानंतर पुढे ते बोलतात, "त्याशिवाय तू सगळ्या आपत्तींपासून मुक्त असशिल, वृद्धत्व, अपंगत्व, आजार तुला कधी त्रास देणार नाहीत. तुझी किर्ती पसरेल. तुला अध्यात्मविद्या उपजत येईल. सगळ्या आगम विद्या तुला उपजतपणे ज्ञात होतील, त्यांचा अभ्यास करण्याशिवाय. माझ्या कृपेमुळें ऋषी तुला मान देतील. तू चिरतरूण रहाशिल. तुला कधी दूधाची कमी होणार नाही. तुझ्या आश्रमात खाण्यापिण्याची कधी कमी होणार नाही. तुझ्या दूधभाताच्या जेवणात अमृत मिसळत राहील. ह्या कल्पाच्या अखेरीस तू माझा साथी बनून माझ्याबरोबर नित्य रहाशिल मार्कंडेयांसारखा. तुझी माझ्यावरील भक्ती नित्य अशीच राहील. मी तुझ्या आश्रमात नित्य असेन. तुला जे हवे ते माझ्या कृपेने प्राप्त होत असेल. तू जेव्हां इच्छा करशिल, मी तुला दिसेन". असें सांगितल्यानंतर व मला जे हवे ते देऊन तो विश्वनाथ अदृष्य झाला त्याच्या सगळ्या परिवारासह. उपमन्यू कृष्णाला ते सांगत होता. "अशारितीने मी मोठी तपस्या करून महादेवाला प्राप्त केले आहे. महादेवाच्या कृपेमुळे मला पूर्ण प्रज्ञा प्राप्त झाली आहे. असे कांहीं नाही जे मला समजत नाही. त्याशिवाय ऋषी, विद्याधर, यक्ष, गंधर्व, अप्सरा असे सगळे स्वर्गीय लोक येथे ह्या आश्रमात माझ्याबरोबर असतात. येथे असलेल्या सगळ्या वनस्पति फळत फुलत असतात नित्य. त्यांच्या फुलांचा परिमळ सदैव हा प्रदेश प्रसन्न ठेवत असतात. देवादिदेवाचे येथे वास्तव असल्याने येथे पुण्यप्रभाव मोठा असतो. म्हणून येथे अनेक तपस्वी साधना करण्यासाठी रहात असतात".

वासुदेव पुढे सांगत होते, उपमन्यूची कहाणी ऐकल्यावर आणि जे दिसत होते ते पाहून मला नवल वाटत होते. त्यानंतर मी उपमन्यूला बोललो, "तू धन्य झालास, तू सर्वश्रेष्ठ ब्राह्मण झाला आहेस, ज्याला प्रत्यक्ष परब्रह्म भेटावयाला येतात. तुम्हाला काय वाटते ते महादेव मलासुद्धा प्रसन्न होतील कां"?

उपमन्यू बोलतो, "मला त्याबद्दल शंका नाही. लवकरच तुम्हाला भवाचे दर्शन होणार आहे. मला त्यांचे दर्शन व्हावयाला बराच अवधी लागला. परंतु, तुला फक्त सहा महिने लागतील हे मी माझ्या दिव्यदृष्टीने पहात आहे. तुला ते उभयता भेटतील. किंबहूना ते तुला भेटण्यासाठी उत्सुक आहेत. अनेक वर तुला देतील. हराची कृपा असंख्य ऋषींना लाभली आहे. मग तुला कां नाही ते आशिर्वाद देणार नाहीत? तुला पाहिजे असेल तर मी तुला मंत्र देतो त्यामुळें तुझी प्रार्थना लवकर फळेल. असें म्हणून उपमन्यू मला मंत्र देतो, "ॐ नमोः शिवाय", तो मंत्र अव्यावहपणे जपत रहा. जपयज्ञ फार प्रभावी असल्यामुळे त्यांची कृपा तुझ्यावर निश्चित होईल. तो विष्णूचा अवतार पुढे सांगतो, त्या उपमन्यूच्या कृपेत आठ दिवस असे गेले जणूकाय एक तास. अशारितीने आम्ही महादेवाच्या गोष्टी करत होतो. आठव्या दिवशी मी साधनेसाठी लागते ती दिक्षा घेतली. मला ब्राह्मणाची कांठी मिळाली. माझे केस काढले गेले, माझ्या हातात कुस गवत घेऊन, माझ्या अंगावर चिंध्यांचे वस्त्र होते, मी तुपाने माझे शरीर घासून काढले, त्यानंतर मुंजा गवताचे जान्हवे मी घातले, एक महिना मी फळांवर राहीलो. मी एका पायावर उभा राहून उपमन्यूनी दिलेला मत्र मनातल्या मनात जपत होतो. दुसरा महिना मी पाणी पिऊन रहात होतो. तिसरा आणि चौथा, पांचवा मी हवेवर होतो. मी माझे दोनही हात वर करून तपस्या करत होतो. त्या काळात मी झोपलो नाही. सदैव जागृत होतो. एके दिवशी मला आकाशात तेजस्वी ढगं दिसू लागली. त्यांतून अनेक इंद्रधनुष्य दिसत होती. वीजा चमकाव्या तसे वाटत होते. त्या ढगांतून महादेव त्याच्या अर्धांगासह मला दिसू लागले. ते तेज विलक्षण होते. ते पाहून माझ्या अंगावर कांटा उभा राहीला. ते दृष्य मी कधीच विसरणार नाही. त्यांच्या माथ्यावर रत्नजडीत मुकूट होता. हातात त्रिशूळ होते. त्यांच्या अंगावर व्याघ्रचर्म होते. त्यांचे दात टोकेरी होते जसे सुळे असावेत. त्यांच्या अंगावर सापाचे जान्हवे होते. त्याच्या अंगावर गळ्यात लाल फुलाच्या माळा होत्या. त्या माळा त्याच्या पायापर्यंत लांब होत्या. त्यांच्या भोवती अनेक गण, भूत, पिशाच्च मला दिसत होते. अकराशे रुद्र त्याच्या भोवती पहारा करत होते. ते सगळे शंकराची स्तुती करत होते. आदित्य, वसू, साध्य, विश्वदेव, अश्विनी त्याची स्तुती करत होते वेदातील कवनं गाऊन. इंद्र,

त्याचा भाऊ उपेन्द्र (विष्णू), ब्रह्मदेव सगळे भवाची स्तुती करत होते. रथंतर साम ते गात होते. हे विश्व चालवणार्या असंख्य देवता तेथे उपस्थित होत्या. सगळ्या विज्ञानाच्या शास्त्राच्या तंत्राच्या अशा विविध कार्यकारी देवता सुद्धा मला दिसत होत्या. त्यात सनतकुमार, वेदाच्या देवता, ऋषी मरिची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रातू, सात मनू, सोम, अथर्व, बृहस्पति, भृगू, दक्ष, काश्यप, वसिष्ठ, कस्य, स्कंद, दिशा देवता, यज्ञ देवता, अग्नीदेवता, यज्ञाच्या देवता मला दिसत होत्या. त्या सगळ्या मनुष्य रुपात होत्या. असंख्य योगी असे सगळे मला दिसत होते महादेवाला लवून नमस्कार करत होते. त्याशिवाय विद्याधर, गुह्यक, दानव, राक्षस असें तेथे मला दिसत होते. तो ईशान देव त्याच्या सगळ्या वैभवात मला दिसत होता. ते सगळे माझ्याकडे पहात होते. मीसुद्धा त्यांच्याकडे पहात होतो पण अरे युधिष्ठीरा, मला महादेवाकडे पहाण्याची हिम्मत होत नव्हती. त्यावेळी महादेव मला बोलले कीं, अरे कृष्णा, माझ्याकडे पहा. तू माझा सर्वात जास्त प्रिय भक्त आहेस. ह्या आधी सुद्धा हजारो वेळा निरनिराळ्या कल्पांत तू माझी आराधना केली आहेस. त्यानंतर मला धीर आला व मी त्याला वंदन केले तेव्हां उमा माझ्यावर विशेष संतुष्ट झाली. त्यानंतर मी महादेवाची स्तुती करू लागलो, मी बोललो, महादेवा मी तुला वंदन करतो, तू सगळ्या जगाचा स्वामी आहेस. तू वेदाची देवता आहेस, चांगुलपणा तुझ्या पुजेचा मार्ग आहे. तूंच ब्रह्म आहेस, सगळ्या चराचरांचा कर्ता आहेस, तू सगळ्या देवांच्यापेक्षा श्रेष्ठ आहेस, नम्रपणा, समृद्धी, किर्ती, समाधान, तेज, यश हे सगळे तुझ्यामध्ये आहेत. म्हणून तू सर्वश्रेष्ठ आहेस. वासना, क्रोध, भय, मोह, लोभ, गर्व, नीचपणा, वेदना, आजार आणि भ्रम हे दोष तुझ्यात अजिबात नाहीत म्हणून तू सर्वश्रेष्ठ आहेस. तू महत आहेस, तूच पुरूष आहेस, तूंच अमरत्व आहेस, तू अव्यक्त असून व्यक्त सृष्टी घडवत आहेस, तू कल्पनातीत आहेस, तू चित् आणि त्याचे मन आहेस, तू प्रज्ञा आहेस. तुझ्या ध्यानाने ब्राह्मण त्या अज्ञानातून मुक्त होतात ज्यामुळें जन्म मरणाच्या भोवर्यात मनुष्य अडकलेला असतो. तू त्या ज्ञानाचे मूळ आहेस. तू क्षेत्रज्ञ आहेस आणि क्षेत्रसुद्धा तूंच आहेस. योगिक गुण जसे स्थैर्य, पूर्णता, श्रेष्ठता, सुक्ष्मता, तेजस्वीता आणि नित्यता तुझ्यातून व्यक्त होत असतात. म्हणून तू

अद्वितीय आहेस. ज्ञान, बुद्धी आणि विचार हे तुझ्या गुणांचे विशेष आहेत. त्यांच्या मदतीने हे जग चालते. योगी तुझ्या कृपेची अपेक्षा करतात. ध्यान धारणा हा तुझ्याकडे जाण्याचा मार्ग आहे. तू सत्य आहेस ज्यातून अविद्या तयार झाली व हे जग कार्यरत झाले आहे. जे हे समजले ते तुला समजू शकतात. तुझे गुण जसे सर्वज्ञता, सर्वव्यापक, सर्वसमाधानी, सर्वसामर्थ्य, सर्वकाली आणि संपूर्ण ज्याला समजले तो तुला समजू शकतो ते केवळ योगाने साध्य होते. माझे असें बोलणे ऐकल्यावर अरे पार्था, तो भव मोठ्याने गर्जना करतो. त्याला मी केलेले त्याचे वर्णन फार आवडले होते. तेथे असलेले ऋषी, गण, देव, देवता, असुर, राक्षस, ब्राह्मण, पिशाच्च, पितर इतर चराचर देवता त्याला व मला लवून नमस्कार करतात. माझ्यावर स्वर्गातून फुलांचा पाऊस झाला. सुगंधी वारे वाहू लागले.

महादेव उमाकडे पहात मला बोलतो, "आम्ही दोघे जाणतो कीं, तू आमचा मोठा चाहता आहेस. आम्ही तुझ्यासाठी जे भले ते करणार आहोत. आम्हाला तू अतिप्रिय आहेस. तुला काय पाहिजे ते सांग. ते तुला मी देणार आहे. अरे यादवांच्या राजा, जी इच्छा करशिल ती मी तुला देणार आहे. संकोच करू नकोस".

अनुशासन पर्व भाग चौदावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पंधरावा

कृष्ण त्यावर मान खाली घालून परंतु, मोठ्या आनंदाने महादेवाला बोलतो, "मला शेकडो पुत्रांचा आशिर्वाद पाहिजे. जे गुणी, तेजस्वी, कर्तृत्ववान असतील".
महादेव बोलतात, "तथास्तू".
त्यानंतर उमा, विश्वमाता बोलते, "श्रीमान महादेवांनी तुला एकच पुत्र दिला आहे. त्याचे नांव असेल सम्व. मीसुद्धा तुला आठ आशिर्वाद देणार आहे. ते सगळे मी तुझ्या इच्छेचे देणार आहे".
ते ऐकल्यावर मी खालच्या मानेने तिला बोललो, मला शंभर पुत्र असे द्या किं, जे ब्राह्मणांचा अपमान करणार नाहीत, घराण्याची इज्जत सांभाळतील, त्यांच्या जीवनात सुखाचे प्रसंग भरपूर असावेत, ते व्यवहार चतूर असावेत, माझ्या आईचा आदर करणारे, अध्यात्मिक उच्चता राखणारे आणि बुद्धीमान असावेत.
उमा त्यावर बोलते, "तुझ्या मनाप्रमाणे ते असतील. तू देवांसारखा अध्यात्मिक दृष्ट्या उच्च दर्जाचा आहेस, तुला सोळा हजार भार्या असतील. तुझे त्यांच्यावरील आणि त्यांचे तुझ्यावरील प्रेम अतूट असेल. तुला एक देखणे शरीर मिळेल, तुझ्या घरात दररोज सात हजार अतिथी जेवतील".
वासुदेव पुढे बोलतो, "अशारितीने मला त्या दोघांनी आशिर्वाद दिले. त्यानंतर ते त्यांच्या सगळ्या परिवारासह अंतर्धान पावले". "अरे युधिष्ठीरा, मी तुला खरे ते सांगितले आहे. मी ते त्या श्रेष्ठ ब्राह्मणाला, उपमन्यूला ते सांगितले, ज्याने मला दिक्षा दिली होती".
उपमन्यू कृष्णाला बोलला, "सर्व सारखी दुसरी देवता नाही. त्यांच्या इतके वर दुसरा कोणी देव देऊ शकत नाही. त्यांची अध्यात्मिक क्षमता अपरंपार आहे".
अनुशासन पर्व भाग पंधरावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग सोळावा

उपमन्यू पुढे बोलतो, "कृत युगात एक प्रसिद्ध ऋषी होऊन गेला होता त्याचे नांव होते तंडी. मोठ्या श्रद्धेने तो परमेश्वराचे ध्यान करत होता दहा हजार वर्षे. त्याच्या त्या तपश्चर्येचे फळ काय त्याला मिळाले ते सांगतो ते ऐक. त्याला महादेवाचे दर्शन झाले. त्याने महादेवाची स्तुती करण्यास सुरूवात केली. तो महादेवाला बोलतो कीं, त्याला त्या देवाकडून संरक्षणाची हमी पाहिजे ज्याचा उल्लेख सांख्य आणि योगी अंतिम देव म्हणून करत असतात, ज्यामुळे त्याचे जीवन सुखरुप होईल. ज्याची आराधना असुर आणि मुनी करतात. जो सगळ्या गोष्टींचा स्वामी आहे. जो पापहीन आहे, जो तेजस्वी आहे, ज्याच्यापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही अशा शब्दात तो महादेवाची स्तुती करतो. तो समजतो कीं, महादेव स्वतः मोठी तपस्या करत आहे. ज्यामुळें तो महादेव ठरला आहे. जीवन मुक्ती अथवा निर्वाण मिळवण्यासाठी महादेवाची मदत घ्यावी लागते म्हणून त्याची भक्ती करणे हेंच अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे ऋषीचे असे तंडी समजतो. जन्म मृत्यूच्या फेर्यातून मुक्त होण्यासाठी महादेवाची कृपा व्हावी लागते. सृष्टीच्या रचनेत जे स्थान पुरूषाला आहे ते महादेवाचे आहे. त्याच्या प्रमाणे उमा ही प्रकृती आहे. असें तंडी समजतो. तंडी महादेवाला आदिपुरूष असें संबोधन वापरतो. त्याशिवाय अध्यात्माचे मूळ सुद्धा तोंच आहेस ते सुद्धा तंडीला समजते. विश्व चालण्यासाठी जे आधिभूत, आधिदैवत, आधि लोक, आधिविज्ञान आणि आधियज्ञ लागतात ते सगळे महादेवातून येतात म्हणजे महादेव हेंच अंतिम सत्य आहे त्याची जाणीव तंडीला होते. जो महादेवाला समजला व त्याप्रमाणे जो त्याचे जीवन जगतो तो जन्म मृत्यूच्या फेर्यातून मुक्त होतो हे तंडी समजतो. त्यालाच मोक्ष असें तंडी समजतो. महादेवाला प्रसन्न करण्यासाठी सहा गोष्टींचे पालन करावयाचे असते त्यांची माहिती तंडीला होते. तो सांगतो, चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा, नम्रपणा आणि कृतज्ञता अशा त्या असतात. कारण ह्या सहांचे पालन करण्यामुळे योग्याची अध्यात्मिक शक्ती

वृद्धींगत होत असते. त्यासाठी योगी गृहस्थाश्रमात त्यांचे पालन चांगले करू शकतो म्हणून तंडी ओळखतो कीं, चार आश्रमात गृहस्थाश्रम जास्त चांगला असतो. त्याला हे सुद्धा समजते कीं, अध्यात्मिक शक्तीच्या कमी जास्त होण्यामुळे सत्त्व, रज आणि तम अशा तीन ठोस अवस्था तयार होतात. त्या तिनही अवस्थांचे नियंत्रण महादेव त्याच्या विविध देवतांच्या मदतीने करत असतो. त्या साधारणपणे सहा आहेत त्यांना लोकपाल देवता असें तंडीने सांगितले. इंद्र, वरूण, अग्नी, वायू, विनायक आणि यम अशा त्या आहेत ह्याचे ज्ञान तंडीला झाले. त्यातील इंद्र, विनायक आणि यम बाहेरून व वरूण, अग्नी आणि वायू शरीरातून माणसावर लक्ष देऊन असतात. त्या सहा देवतांचे नियंत्रण ब्रह्मदेव करत असतो असे तंडीला समजले होते. त्यात ब्रह्माला मदत करण्यासाठी विष्णू असतो. जो सगळ्या सुख आणि दुःखाचा नियंत्रक आहे. त्याशिवाय इतर अनेक देवता जसे स्कंद, सवितृ, धात्री, विधात्री, सोम, कुबेर वगैरे कितीतरी त्या कामात व्यस्त असतात. अशारितीने माणसाच्या व इतर सगळ्या चराचरांच्या जीवनांवर महादेव लक्ष देऊन असतो.

अध्यात्मिक उर्जेच्या कमी जास्त होण्यामुळे जे तीन गुण उत्पन्न होतात त्यातून अनेक प्रकारच्या इतर गुणांची निर्मिती होत असते. त्या सगळ्यांवर महादेव लोकपाल देवतांच्या योजनेने नियंत्रण ठेवतो हेसुद्धा तंडी समजतो. महाददेवाच्या विलक्षण कर्तृत्वाचे तंडी कौतुक करत रहातो. सत्य, असत्य, चांगले, वाईट, अशा सगळ्या टोकाच्या (सुख-दुःख, आनंद-निराशा, प्रेम-द्वेष, मोह-औदासिन्य, पाहिजे-नको, क्रोध-समाधान, स्तुती-टीका, मान-अपमान, आदर-तिरस्कार, परकेपणा-आपुलकी, सुवर्ण-पाषाण, थंड-गरम, चांगले-वाईट, मान्य-अमान्य, जीवन-मृत्यू, आकर्षण-विरोध इत्यादि) भूमिका महादेव नियंत्रित करत असतो. त्यातून ज्या प्रतिक्रीया मनुष्य देतो ज्यामुळें तो पाप करत असतो त्या प्रतिक्रीया प्रेम, तिरस्कार, क्रोध, दुःख, निराशा, आनंद, द्वेष, भिती, घमेंड अशा अनेक असतात त्यांचे प्रमाण सत्त्व, रज आणि तमोगुणांच्या तीव्रतेनुसार कमी जास्त होऊन मनुष्य पापात अडकतो. त्याची नोंद लोकपाल देवता त्या माणसाच्या लिंगदेहातच करत असतात. जी पुढे त्याच्या नंतरच्या जीवनात कार्यरत होते ज्याला कर्मविपाक असें नांव तंडीने

दिले. सृष्टीची ही काम करण्याची पद्धती जशी जास्त तंडी समजतो तसे त्याची महादेवावरची भक्ती अधिकाधिक तीव्र होत असते. महादेवाच्या काम करण्याच्या पद्धतीने तंडी विलक्षण प्रभावित झाला होता. ज्या शिस्तीत तो देवाधिदेव हे जग चालवत होता त्याचे कौतुक करण्यासाठी तंडी सांगतो त्याच्याकडे शब्द नाहीत. तंडी त्याच्यामध्ये ते सहा गुण (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा, नम्रता आणि कृतज्ञता) कसे आहेत ते तपासू लागतो. त्याला समजते कीं त्याने त्यांचे योग्य पालन केले आहे. माणसाला त्याची अध्यात्मसाधना करणे किती सोपे आहे ते त्याच्या लक्षात येते. मला माझे अज्ञान किती होते ते समजले असे तंडी उपमन्यूला सांगतो. तंडी पुढे समजतो कीं, त्या सहा नियमाचे ज्ञान आणि त्याच्या पालनाचे फायदे ज्याला संस्काराने मिळाले त्याला तपस्या करणे सोपे असते. त्यासाठी सत्त्वगुणात रहाण्याचे फायदे तंडी समजतो व त्याबद्दल महादेवाचे आभार मानतो कीं त्यांच्या कृपेमुळे त्याला ते जीवनातील रहस्य समजले. ते रहस्य समजून जो योगी साधना करतो तो त्याच्या साधनेत निश्चितपणे यशस्वी होईल हे जे महादेव त्याला सांगतो ते तंडी पुढे त्याच्या चाहत्यांना सांगण्याचे वचन तो देवाला देतो. सगळे ऋषी, चरण, साध्य असे सगळे ह्या सहा नियमांच्या वर्तनाने महादेवापर्यंत पोहोचले आहेत हे तंडी समजतो. तंडी हेसुद्धा समजतो कीं, त्या सहा लोकपाल देवतांच्या रुपाने महादेव प्रत्येक चराचरात बसलेला असतो म्हणून त्याला शोधण्यासाठी इतरत्र कोठे जावयाचे नसते, तू आमच्यातच सदैव असतोस हे मोठे सत्य तंडी समजतो. तंडीला महादेवाकडून जाणीव मिळते कीं, त्याची भक्ती करणे म्हणजे दुसरे कांहीं नाही तर ह्या सहा नियमांनुसार जीवन जगणे. ते न करता केवळ महादेवाच्या नांवाचा जप करून तो प्रसन्न होत नाही. किंबहुना ज्याने त्या सहा नियमांनुसार वर्तन ठेवले तरी देवांची कृपा त्याच्यावर त्याच्या लोकपाल देवतांच्या माध्यमातून होऊ लागते हे वैश्विक सत्य तंडीला समजते. ह्या सहा नियमांचे पालन करणे हांच खरा (हिंदू)धर्म आहे. तंडी पुढे सांगतो उपमन्यूला कीं, त्याला एक प्रश्न आहे कीं, भव असुराना, दैत्यांना कसे प्रसन्न होतात जरी ते त्या सहा नियमांचे पालन करत नाहीत. त्याला महादेवांकडून उत्तर मिळते कीं, असुर, दैत्य, राक्षस, दानव त्या नियमांचे पालन करत असतात परंतु, त्यांचा अहंकार त्यांना प्रसंगी चुकीच्या दिशेने जाण्यास प्रवृत्त

करतो. ते कधी सत्याचा त्याग करत नसतात जोवर ते तपस्या करत असतात त्यामुळे, त्यांना ब्रह्माची कृपा होत असते परंतु, एकदा आशिर्वाद मिळवल्यानंतर ते बहकतात. त्या त्यांच्या धूर्ततेची शिक्षा त्याना यथावकाश होत असते. केवळ पांच (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता) नियमांच्या प्रमाणे जगण्याने अध्यात्मिक सामर्थ्य वाढते पण त्याचा अहंकार मात्र तसांच असेल तर त्याची मोक्षाकडे जाण्याची गति थंडावते. त्यासाठी अनन्यभावे भक्ती महादेवाची करावी लागते त्या भक्तीमुळे अहंकार संपतो. तंडी तशा भक्तिमुळेंच महादेवाचे दर्शन प्राप्त करत असतो. जे त्यातील फक्त पांच नियमांचे अनुचरण करतात पण भक्ती करत नाहीत त्यांना मृत्यूनंतर पितृयान मार्गाने स्वर्गात जागा मिळते पण ते निवृत्ती प्राप्त करत नाहीत. परंतु, जे पांच नियमांचे अनुचरण करत भक्तीसुद्धा (जपयज्ञ) करतात त्यांचा निवृत्तीचा मार्ग ज्याला देवयान म्हणतात तो मोकळा होतो. तुला पहाण्यासाठी मला माझ्या सगळ्या वासना सोडाव्या लागल्या. सगळ्या ऐहिक सुखांचा त्याग करावा लागला, त्या वासनांतील व्यर्थता मला समजून घ्यावी लागली, त्यांचा क्षणभंगूरपणा मला समजून आला होता, त्यामुळे मी ते सगळे सोडून तुझ्या कडे आकर्षित झालो. असें तंडी महादेवाला सांगत होता. जोवर ते होत नाही तोवर कोणी महादेवाकडे जाऊ शकत नाही. तंडी महादेवाची साधना कां करत होता ते सांगत असतो उपमन्यूला.

उपमन्यू पुढे सांगत असतो. ते ऐकल्यावर महादेव त्याच्या अर्धांगासह बोलतात, "माझ्या पवित्र भक्ता, तू ह्यापुढे नित्य, अजरामर, सर्व भूमिकांपासून (सुख, दुःख इत्यादि) मुक्त असा माझ्या बरोबर रहाशिल. तुझ्या सगळ्या इच्छा मी पूर्ण करणार आहे. कारण तुला कांहीं तुझ्या अशा इच्छा राहीलेल्या नाहीत. तरी मुला मला सांग, तू काय माझ्याकडून अपेक्षित आहेस? जरी नाही सांगितलेस तरी त्या पूर्ण होतील". ते ऐकल्यावर तंडी हात जोडून विनंति करतो महादेवाकडे कीं, त्याची एकच इच्छा आहे कीं, त्याची भक्ती कायम राहो.

उपमन्यू पुढे कृष्णाला सांगतो, "त्यानंतर महादेव त्याच्या परिवारासह अंतर्धान पावतो. त्यानंतर तंडी माझ्या आश्रमात येतो. मला जे घडले ते सांगतो. तेथे तंडी मला महादेवाची सगळी हजारो नावं सुद्धा सांगतो. ती सगळी नांव कोणी आठवू शकत

नाहीत. वेदांतसुद्धा ती नाहीत. फक्त एकदा ब्रह्मदेव महादेवाची पुजा करतांना ती सगळी संबोधनं उच्चारत होते. ती तंडी मला सांगत होता.

अनुशासन पर्व भाग सोळावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सतरावा

वासुदेव सांगतो, मन एकाग्र करून उपमन्यू त्याचे हात जोडून आदरपूर्वकपणे महादेवाची नावं घेऊ लागला. त्या आधी तो महादेवाचे कौतुक करतो कारण त्याशिवाय त्यांचे नांव घेणे अयोग्य ठरले असते. प्रथम तो महादेवाची नेहमीची उपयोगात असलेली नांव घेण्यास सुरूवात करतो. त्यातील कांहीं ब्रह्माने घेतली होती व कांहीं ऋषी घेतात. कांहीं वेदात आणि वेदांगांत वापरलेली आहेत. ती नांव ऋषीमुनीनी मोठ्या भक्तीभावाने दिलेली आहेत. त्यांतून महादेवाच्या विविध कर्तव्यांचा उल्लेख होत असतो. महादेवाच्या अनेक गुणांचे कांहींत वर्णन आहे. त्या नांवांच्या जपामुळें भक्त महादेवाला हांक मारत आहे असें होत असते. ती वेदात वापरलेली आहेत. कांहीं नावांतून महादेवाची कृपावृत्ती दाखवलेली आहे. ती बहुतेक ब्रह्मदेवानी महादेवाची स्तुती करण्यासाठी वेळोवेळी वापरली आहेत. कित्येक नांव विशेषणात्मक आहेत. त्याचे श्रेष्ठत्व दाखवणारी नाव आहेत. महादेव मोठे तपस्वी आहेत त्या त्यांच्या गुणाचा कांहीं नावांत उल्लेख होत असतो. कांहींतून त्यांचे योगिक सामर्थ्य व्यक्त होते. कांहींतून त्यांची प्रज्ञा व्यक्त होते, कांहींतून त्यांचे पावित्र्य व्यक्त होत असते. महादेवाची भक्ती करण्यासाठी तो सात्विक असला पाहिजे. रजोगुणी आणि तमोगुणी त्याची भक्ती करतील तर ती महादेव ऐकत नाहीत. म्हणून ज्याला महादेवाची भक्ती करावयाची आहे तो मनाने शुद्ध (सात्त्विक) असला पाहिजे. माझे म्हणशिल तर जोवर मी सात्विक झालो नव्हतो माझी प्रार्थना महादेवापर्यंत पोहोचत नव्हती. उपमन्यू कृष्णाला सांगत होता. ब्रह्मदेवांनी जी दहा हजार नाव सांगितली त्यातील कांहीं मी महादेवाचा जप करतांना वापरत होतो. जप करणे म्हणजे त्या देवाला हांका मारणे असे असते. हांक जितकी मनातल्या मनात तितकी ती जास्त प्रभावी असते कारण अरे कृष्णा, तुला माहीत आहे कीं, महादेव आपल्यामध्ये व आपल्या भोवती (प्रभावळीच्या रुपात) सदैव असतात. म्हणून महादेवाचा जप सुक्ष्म करावा हे मी त्यावेळी समजलो. महादेवाला आपण हांकां मारत आहोत हे कोणालाही समजणार नाही असे ते गुप्त असले पाहिजे. महादेवाच्या नावांचा

जप करणे योग साधनेचा भाग आहे हे मला नंतर समजले उपमन्यू कृष्णाला सांगतो. सर्व जपयज्ञात महादेवाच्या नांवाचा जप हा श्रेष्ठ आहे. इतर देवतांच्या जपयज्ञापेक्षा त्याचे परिणाम अधिक प्रभावी असतात. असे ऋषी सांगतात कीं, मरणसमई जर कोणी तो जप करत असेल तर त्याची मृत्यू घडी दूर जाऊ शकते. किंवा जर तो त्याचा अंतिम मृत्यू असेल तर मरण शांतपणे येते. महादेवाचा जप मनाला शांती देतो. तसा इतर देवांचा देऊ शकत नाही. ते जप ब्रह्मदेवांनी फार प्राचीन काळी रचलेले आहेत. त्यांचे स्थान सगळ्या वेदांतील कवनांत सर्वश्रेष्ठ आहे. जपयज्ञाप्रमाणे जपश्रवण यज्ञ सुद्धा मोठा प्रभावी आहे. तंडी सांगतो कीं, शिवाचा जप एकचित्ताने ऐकण्यानेसुद्धा तितकाच फायदा होतो. सगळ्या देवता ते मंत्र जपत असतात महादेवाची अध्यात्मिक उर्जा त्यामुळें त्यांना प्राप्त होत असते. तंडीला ते ब्रह्माकडून मिळालेले आहेत. म्हणून त्यांना तंडीची कवनं असें सांगितले जाते मानवांसाठी. त्याच्या जपाने जपकर त्याच्या सगळ्या पापबुद्धीतून मुक्त होऊ शकतो जर तशी त्याची इच्छा असेल. तंडीनंतर झालेल्या अनेक असुरांनी त्या जपाच्या मदतीने महादेवाला प्रसन्न करून त्यांचे आशिर्वाद मिळवले आहेत. त्या जपाचा अर्थ काय तो मी सांगतो तो असा,

"अहो जगनियंता, आपण अचर आणि चर असे दोनही अहात. आपण वैभवसंपन्न अहात, आपण भयंकर अहात, आपण अग्रणी अहात, आपण वरदाते अहात, आपण सगळ्या सृष्टीचा आत्मा अहात, आपण सर्वस्तुत्य अहात, आपण सर्वार्थ अहात, आपल्या जटा दिव्य आहेत, आपले चर्मवस्त्र आणि आपल्या माथ्यावरील मोराच्या पिसाचा तुरा तुमचे वैशिष्ट्य आहेत. सगळ्या जगात आपण पसरलेले अहात. आपण सगळे अध्यात्मघातक जे आहे व जे उत्पन्न होते त्याचा नाश करता म्हणून आपल्याला हर असें म्हणतात आपले भक्त. आल्यातून सगळे उत्पन्न होते तसेंच आत्मसात सुद्धा होते. आपण सगळ्या भोगांचे भोग घेता. आपण प्रवृत्ती अहात. ज्याच्यातून सगळ्या कृती सुरू होतात. आपण निवृत्ती सुद्धा अहात जेथे सगळे संपते. आपल्यातून विविध व्रत वैकल्ये सुरू झाली आहेत. आपण अव्यक्त आणि व्यक्त असें दोनही आहात. आपण नित्य आणि चिरंतन अहात. आपले स्थान आहे स्मशानभूमी, आपल्यातून ते सहा गुण (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा, कृतज्ञता आणि श्रद्धा) तयार

झाले ज्याच्या आचरण्याने मनुष्य आपल्यात मिळून जातो. आपणच शरीराच्या सर्व भोगांचे कारण अहात. आपण पापाचा नाश करणारे अहात. आपण पुज्य आहात. आपल्या लिलांना अंत नाही. आपले स्वरुप तपस्येने बनलेले आहे. आपण परब्रह्म अहात. आपण परमेश्वर अहात. आपल्या छायेखाली सगळे लोक सुखाने रहात असतात. जे आपल्या छायेचा सन्मान करत नाहीत ते प्रकृतीच्या रगाड्यात चिरडून जातात. आपण अहंकारहीन असला तरी आपल्यातूनच अहंकार उत्पन्न झाला आहे प्रकृतीच्या योजनेसाठी कारण प्रकृती अहंकाराशिवाय कार्यरत होत नाही. आपण चिरानंद अहात. आपण सगळ्या कला विद्यांचे उगमस्थान अहात. आपण स्वयंभू अहात. आपण हिरण्यगर्भ अहात. आपण विचारसागर (सगळ्या प्रकारचे विचार ज्यातून उत्पन्न होतात तो) अहात. आपल्याला हजार डोळे असतात. हजार कान असतात, हजार हात असतात, हजार पाय असतात. त्यांच्यामुळे आपण ह्या सृष्टीचा कारभार पहात अहात. आपण सोम अहात. आपण चंद्रमा अहात, आपण सूर्य अहात. आपण सगळ्या ग्रहांच्या रुपाने ह्या जगावर नजर ठेवून अहात. आपण तपस्या अहात. आपण निष्पाप अहात. आपण आपल्या भक्तांचे भक्त अहात. आपण काळ अहात. आपण मंत्रशक्ती अहात. आपण प्रणव अहात. आपण वेदाचे स्वामी अहात. आपण योगशास्त्र अहात. आपण सांख्य अहात. आपण विश्वाचे मूलबीज अहात त्या बिजातून इच्छा आणि कर्म उत्पन्न झाले. त्यातून प्रकृती (माया) कार्यरत झाली. आपण नीलकंठ अहात. आपल्या अर्धांगालाच उमा म्हणतात. आपण जड मात्रा अहात आणि चलमात्रासुद्धा. आपण सगळ्या तत्त्वांचे मूळ अहात. आपण गणाचे धनी अहात जे हे विश्व चालवतात. आपणच काम (इच्छादेव) अहात. ज्यातून कर्म तयार होते. आपणच तो महामंत्र अहात, ज्यामुळें आत्मा आणि निरात्मा हे भेद पुढे आले. आपल्या अनेक हातात एक एक गोष्ट असतात जशा कलश, धनुष्य, माणसाचे मुंडके, त्रिशूळ, परशू, तलवार, विद्युत असे आपले ध्यान विलोभनीय असते. कधी आपल्या डोक्यावर मुकूट असतो तर कधी फेटा तर कधी चंद्र असे विविध शिरपेंच आपल्याला शोभतात. कधी आपण जटाधारी असता तर कधी वपन केलेले असता. आपण महागुरू अहात. आपण अंतिम ब्राह्मण अहात, आपण अंतिम क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र

सुद्धा अहात. आपण गंगा प्यालात म्हणून आपल्यास कपर्दिक असे नांव मिळाले. त्यानंतर आपण तिला पृथ्वीवर सोडलेत. आपण ब्रह्मचारी अहात. आपण पहिले संन्यासी अहात. आपण रुद्र अहात जेव्हां आपण सजा करता. आपण सदैव भ्रमती करत असता. आपण सर्वगुणसंपन्न अहात. आपण ॐ कार अहात. आपण भूतनाथ अहात. आपण महत अहात, आपण पंचमहाभूतांचे मूळ अहात. आपण अज्ञान (तमोगुण) ज्ञान (सत्त्वगुण) आणि अंदाज (रजोगुण) अहात. आपण मोक्षाचे द्वार अहात. आपण कर्म करण्यास भाग पाडणारी शक्ती अहात. आपण शांतता अहात. आपण भ्रम अहात आणि निर्भ्रमसुद्धा अहात. आपण अविनाशी अहात. आपण कैलासावर रहाता. आपण यश अहात. आपण गौरी अहात. आपण ध्यान साधना अहात. आपण दुसर्याचे पुण्य काढून घेऊ शकता तसेंच देऊ सुद्धा शकता. आपण अनेक असुरांवर कृपा केली व जेव्हा ते मर्यादा ओलांडतात त्याना संपवलेस. तू न्यायदेवता आहेस, तू मृत्यू देवता आहेस. तू धनदेवता आहेस. आपले सामर्थ्य कोणी मोजू शकणार नाही. आपण अनेक रुप घेता जसे हर, हरी, गणेश, अर्क (स्कंध), अग्नी, वायू आणखीन कितीतरी. आपण प्रेम आणि भयानक असें दोनही असता. आपण आत्मानंद (सगळ्या आत्म्यांचे मित्र) अहात. आपण गृहस्थ असता त्याचवेळी बैरागीसुद्धा असता. आपण अनादी अनंत अहात. आपण विविध वाद्ये वाजवता जेव्हां विश्व घडवत असता. त्यात बासुरी, तंबोरा, ताली, डमरू असतात. आपण काळवेळाची दिशा ठरवणारे ज्योतिषी अहात. आपण अविद्या आणि विद्या सांभाळता. आपण रचना परिमाणाचे कारण अहात. आपण विचार अहात. ज्यातून बुद्धी निपजली. आपण सर्वसाक्षी अहात. आपण शाळिग्राम अहात. म्हणून आपल्या पुजेसाठी शाळिग्रामाची मंजुळेत स्थापना करतात. त्यालाच तुझे चिन्ह (लिंग) समजतात. आपण गुह्यांचे अधिपति अहात. सगळ्या जीवांच्या तीन अवस्था जन्म, जीवन आणि मृत्यू तुमच्या प्रेरणेने तयार झाल्या आहेत. आपण ब्रह्माचे निर्माते अहात. आपण सगळ्या देवांचे कर्ते अहात. आपल्या प्रेरणेने सगळे देव त्यांची कामं करतात. आपल्याला अंसू म्हणतात. आपण आदित्यसुद्धा अहात. अज्ञानाने सुद्धा जे लोक करतात त्याचे आपण चाहते असता. आपण तो देव अहात जो भक्ताची प्रज्ञा विकसित

करतो. आपल्याला मान आणि अपमान सारखेच असतात. आपण त्या साठ तत्त्वांचे (सांख्य विचारानुसार) जाणते अहात. आपण वज्रधारी अहात. आपणच सत्य (परमेश्वर) अहात. आपण कर्मविपाक सिद्धांतानुसार जीवांना न्याय देता. आपण हनुमान अहात ज्याने रावणाचे पारिपत्य केले. आपण आनंददाई अहात आपल्या भक्तांसाठी. आपण मृत्यू अहात आणि आपणच जन्मदाते अहात. आपल्या शाळीग्राम चिन्हाचे पुजन देव, दानव, मानव, राक्षस आणि दैत्य असें सगळे करतात. आपण योगेश्वर अहात. आपण सगळ्या युगांचे नियमन करणारे अहात. आपण वेदांताचे कर्ते अहात. आपण सगळी शास्त्र, विज्ञानं ह्यांचे कारण अहात. आपल्याला समजण्याने सगळी विज्ञानं समजली जातात. आपण सगळ्या जीवांचे ज्यात ब्रह्मापासून सुक्ष्म जीवापर्यंत निर्माते आणि संरक्षक अहात. आपल्याला कशाचा आनंद आणि दुःख होत नाही कारण आपण निर्गुणी अहात. आपण अठरा विश्व उत्पन्न केलीत आपल्या विचार शक्तीच्या जोरावर. आपण स्वतः आनंदमय असता. आपण नश्वर नाही म्हणून नित्य अहात. आपली शक्ती आहे चैतन्यमय अध्यात्मिक ज्यातून सगळे घडत असते. ज्यातून विचारसागर तयार झाला आहे. आपण चैतन्य अहात ज्यातून जड उर्जा (उष्णता, ध्वनी, प्रकाश, गुरूत्व, विद्युत, गति, जोर) उत्पन्न होतात. आपण ते देव अहात जो त्याचा यज्ञाचा हिस्सा त्याच्या गणांना वाटून देतो, स्वतः कांहीं घेत नाही. आपण कृष्ण अहात. सम्वाच्या रुपात आपण गोरे सुद्धा अहात. आपण अजिंक्य अहात. आपण सगळ्या देवांचे देव अहात. अथर्व आपले डोके आहे, साम आपले तोंड आहे, यजू आपले हात पाय आहेत. आपल्यातून उपनिषदं तयार झाली. आपण कर्मकांडाचे कारण अहात. आगम शस्त्रांचे कारण अहात. आपण सुंदर आणि कुरुप सुद्धा अहात. आपण सुडौल आणि बेढप सुद्धा अहात. अंतरात्मा आणि ब्रह्म ह्याच्या मिलनाचे आपण कारण अहात. त्यासाठी जो योग असतो तो तूं आहेस. आपल्या भक्तांना आपण तुमच्या गणात समाविष्ट करता व त्यांचे कल्याण करता. आपणच मोक्ष अहात. आपण पुण्य अहात. आपण विश्वकर्मा अहात. आपण त्वश्त्री अहात. आपण प्राचीन अहात. आपण तर्क्ष्य अहात. आपण मित्र अहात चांगल्यांचे आणि अमित्र अहात वाईटांचे. आपण वीणाधारी अहात. आपण भ्रमसिद्धी अहात.

आपल्याला ज्ञानेंद्रियानी समजता येत नाही परंतु, मनाने समजता येते. आपण अजैकपाद रुद्र अहात. आपण सत्त्व, रज आणि तम ह्यांचे नियमन करता. त्याप्रमाणे जगाचे व्यवस्थापन करता. आपण धन्वंतरी अहात. आपणच स्कंध अहात, जो देवांचा सरसेनापती आहे. आपणच कुबेर अहात. आपणच शक्र अहात. आपणच धात्री अहात. आपण प्रभाव अहात वसू मध्ये. आपणच आर्यमन अहात. आपणच उशंगू अहात. आपणच मंधत्री अहात. आपणच चिरशांतता अहात. आपणच समाधीतील सुशुप्ती अहात. आपण प्राण अहात. आपण सत आणि असत दोनही असता, परिस्थितीनुसार बदलत असता. आपण सदैव भटकत असता. आपण भय अहात. आपणच वैष्य अहात आणि शुद्रसुद्धा. आपणच नंदी अहात आणि पार्वती सुद्धा. अपण चराचर अहात. आपणच ध्यान धारणा आणि समाधी ह्यांची बीज अहात. आपणच उच्चैश्रैवस अहात. आपणच सगळे उत्तम गुण (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा, कृतज्ञता, नम्रपणा, श्रद्धा, धैर्य, शहाणपणा, विश्वास इत्यादी) अहात. आपण पापनाशक अहात. आपणच पाप पुण्याचा हिशोब करणारे अहात. आपला एक हात सोन्याचा आहे. आपण स्वरातील गांधार अहात. आपण अथांग अहात. आपल्याला अनुभवाने (प्रचीतीने) ओळखता येते परंतु, ते दुसर्याला शिकवता येत नाही. आपण हजार अवधानी अहात, म्हणजे एकाचवेळी हजार गोष्टींचे आकलन करता येते. आपण स्वावलंबी आणि स्वयंभू अहात. आपल्या प्रेरणेने अंतरात्मे जन्म मरणाच्या फेर्यातून जात असतात. आपण असे भगवान अहात कीं, ब्रह्माला व विष्णूला शिक्षा करु शकता. आपल्याला कोणी शिक्षा करू शकत नाही. आपण सगळ्या चराचरांशी जोडलेले अहात. आपण प्रणव अहात. आपण सगळ्या मंत्रांची देवता अहात. आपण असे अहात कीं आपल्याला असंख्य अभिव्यक्ती आहेत. म्हणून आपण अनेक अवतार एकाच वेळी घेत असता. आपणच अमृत अहात. आपण कारण आणि परिणाम असें दोनही एकाच वेळी असता. आपण बैराग्य देवता अहात आणि तरी आपण गृहस्थांची आराध्य देवतासुद्धा असता. आपल्यातून काळ आणि त्यातून कल्प आणि युग तयार होत असतात. कारण आपण त्यांच्या पलिकडले अहात. आपण निराकार अहात, तरी आपल्यामध्ये सगळे आकार असतात. आपण रचना

परिमाण अहात ज्याचे मोजमाप करता येत नाही. आपण विचार परिमाण अहात ज्याचे कांहीं परिमाण नसते. आपण हे विश्व रचना आणि विचार ह्या दोन परिमाणाने तयार केले आहे. इतर परिमाणं (वेळ, भार आणि दिशा; परमेश्वराचा काळ आणि प्रकृतीतील वेळ हे वेगळे आहेत, वेळ मोजली जाते काळ मोजला जात नाही) त्यानंतर प्रकृतीत तयार झाली तुझ्या मायेने. हे युग पुण्य आणि पाप ह्यांच्या मिश्रणातून घडत असते. त्याचे एकंदर कर्मविपाक (त्या युगाचे) पुढच्या युगाच्या रचनेत कार्यरत होत असतात. म्हणून तू देव आणि असुर ह्यांच्या मिश्रभावाचा (निरहंकारी आणि अहंकारी भाव) स्वामी असतोस. ज्याच्या त्याच्या कर्माची फळं तू त्यांना देत असतोस त्यांच्या पुढच्या जन्मी म्हणून तो लेखाजोखा त्याच प्रमाणे पुढच्या युगात चालू असतो. अशारितीने एक युग त्याच्या नंतरच्या युगाला कर्मविपाकानें जोडलेले असते. आपले कार्म ज्ञानेंद्रियांच्या आवाक्या बाहेरचे असते. सगळा व्यवहार अध्यात्मिक उर्जेच्या कमी जास्त होण्याशी निगडीत असतो. कमी जास्त उर्जेमुळे सत्त्व, रज आणि तम गुणांचा अनुभव येतो तुझ्या किमयेने. आपण सुक्ष्म अहात. म्हणून तुम्हाला समजणे सोपे नसते. युद्धाची सगळी शस्त्र आणि अस्त्र आपल्या कृपेने तयार होतात. आपण संयम अहात. आपण पूर्ण अहात. आपण गंगाधर अहात. आपले अर्धांग आहे उमा. आपण अनेक अवतार घेऊन पृथ्वीचे कल्याण करत असता. आपणच घोड्याच्या मुखातून वेद वदवले होते. आपण अंतिम शासक अहात. निरपेक्ष बुद्धीने तपस्या करणार्यांना आपण मोक्ष देता. आपण व्यास अहात ज्याने वेद आणि पुराणं लिहीली. आपण हरगौरी अहात. आपण तो परमात्मा अहात ज्यावर विश्वाचा वृक्ष वाढत असतो. आपण महत तत्व अहात. आपण स्वयंप्रकाशमान अहात. सगळ्या स्वयंप्रेरित देवतांचे उगमस्थान अहात. आपण मूळ चिन्हा (लिंग ह्या शब्दाचा मूळ अर्थ चिन्ह असा आहे. महादेव फक्त चिंन्हाने दर्शवतात त्याची मूर्ती करणे शास्त्रसंमत नाही. मूर्तीने ती देवता अमर्यादीत नाही असें दाखवले जाते, महादेव अमर्यादीत आहेत.) अहात. आपण साक्षात प्रज्ञा अहात. आपण गुह (स्कंध) अहात जो देवांचा सरसेनापति आहे. आपण व्रत वैकल्याचे कारण अहात. आपण असें देव अहात ज्याची पुजा सगळे ऋषी करतात. अशाप्रकारे मी महादेवाची स्तुती करत होतो. महादेवाच्या परवानगीने मी ते स्तुतीगान करत होतो.

त्या देवाच्या नांवांची कवन गाऊन अनेक  निवृत्तीप्रत गेले आहेत.  महादेव खर्या भक्तांचे संरक्षण करतात.  ईशाची भक्ती त्याच्या अनेक नांवांच्या स्मरणाने होत असते.  पुण्यकर्म करण्याने भगवान ईशानची पुजा होत असते.  निष्पाप बुद्धीने काम करण्याने ईशानची पुजा होत असते.  तंडी सांगतो,  जो त्याच्या तपस्येने महादेवापर्यंत पोहोचतो त्याची तपस्या भ्रष्ट करण्याचा कित्येक कर्मकांडात अडकणार्या देवता आणि असुर प्रयास करत असतात तरी न डगमगता जो त्याचे व्रत चलू ठेवतो त्याला महादेवांची कृपा मिळते. अशाप्रकारे तंडी महादेवाची स्तुती करत असतो.
जो भक्तीभावाने ही स्तुती नित्यनेमाने दररोज गाईल त्याच्यावर महादेवाची कृपा होईल, त्याचे सर्व प्रश्न सुटतील.  त्याच्यावर इतर देवतांची सुद्धा कृपा होईल.  सगळे रुद्र, मरुत,  मृत्यूदेव त्याच्यावर कृपा करतील.  हे स्तुती सुमनं रुद्राने दिले ब्रह्माला.  ब्रह्माने इंद्राला दिले.  इंद्राने मृत्यूदेवाला दिले,  त्याने तंडीला दिले.  त्याच्याकडून गौतमाला मिळाले.  त्याने विवस्वात मनुला दिले,  त्याने नारायणाला सांगितले.  त्याच्याकडून अनेक ऋषी ते शिकले.  त्यांच्या कडून नचिकेता ते समजला.  नचिकेता मार्कंडेयांना ते सांगतो.  अरे जनार्दना,  मी ते आता तुला सांगत आहे.  हे स्तुतीसुमन वेदाइतके प्रभावी आहे.  ब्रह्मचर्य पाळून जो एक वर्षभर त्याचे गायन करतो त्याला एक अश्वयज्ञ केल्याचे पुण्य लाभते.  अशा माणसाला दानव,  राक्षस,  यक्ष,  गुह्यक,  पिशाच्च, नाग,  असें कित्येक कोणत्याही प्रकारे त्रास देऊ शकत नाहीत.

अनुशासन पर्व भाग सतरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग अठरावा

वैशंपायन पुढे सांगतात, "वासुदेवाचे ते कथन संपल्यावर व्यास युधिष्ठीराला बोलतात, "माझ्या मुला, ती एकहजार आठ नांव जर तू गाऊन महादेवाची स्तुती करशिल तर त्यांची कृपा तुला प्राप्त होईल. प्राचीन काळी, मी कठोर तप करत होतो. ते मेरुच्या शिखरावर मी करत होतो. तेथे ही शिवाची स्तुती मी गाईली व महादेव माझ्यावर प्रसन्न झाले होते. माझ्या सगळ्या इच्छा त्यांनी पूर्ण केल्या होत्या. अरे पंडूपुत्रा, तू सुद्धा ते गात जा, तुला सुद्धा महादेव प्रसन्न होतील. त्याने उदाहरण सांगितले कीं, कपिल मुनी ज्यांनी सांख्य विचारधारा पुढे आणली ते महादेवाचे मोठे फक्त होते. ते सांगत असत कीं, महादेवाच्या कृपेमुळे त्यांना सांख्य विचार सुचले. दुसरे ऋषी चारूशिरस जे इंद्राचे मित्र होते, ज्यांना अलमवनचा मुलगा म्हणूनसुद्धा लोक ओळखतात, ते सांगत किं, ते एकदा गोकर्ण क्षेत्री गेले होते, तेथे तपस्या करत होते, शेकडो वर्षे ते तप करत होते. अखेरीस शिवाच्या ह्या स्तुतीचे गायन मी जेव्हां सुरू केले तेव्हां कोठे महादेव साक्षात दर्शन देऊन गेले. ते सांगतात त्याला शंभर पुत्र झाले स्त्रीच्या शिवाय इच्छेने केवळ महादेवाच्या कृपेने. वाल्मिकींचे उदाहरण सांगतो, एकदा अनेक ऋषी तत्त्वचर्चा करत होते, तेव्हां कांहीं त्यांच्यावर आरोप करतात कीं, त्यानी ब्रह्महत्या केली आहे. तेव्हां माझे शुद्धीकरण करण्यासाठी मी (वाल्मिकी) तपस्या करत होतो त्यावेळी मी महादेवाची स्तुती करत होतो त्यातून माझे शुद्धीकरण झाले होते. त्यावेळी महादेव वाल्मिकीला आशिर्वाद देतात कीं, त्याचे रामायण जगप्रसिद्ध होईल व ते अजरामर होतील. परशुराम सांगतात कीं, त्याने महादेवाची स्तुती केली म्हणून ते त्यांनी केलेल्या पापातून (क्षत्रियांच्या संहाराचे पाप) मुक्त झाले होते. महादेवांनी भार्गवाला त्यांचे परशू आणि अनेक आयुध लढण्याच्या कामाची दिली होती. विश्वामित्र सांगतात कीं, महादेवाच्या कृपेमुळे त्याचा क्षत्रिय वर्णातून ब्राह्मण वर्णात उद्धार झाला. जे एरवी अशक्य होते. आणखीन उदाहरण सांगतो असित देवलांचे, प्राचीन काळी शक्राच्या शापामुळे त्यांचे सगळे पुण्य काढून घेतले गेले होते, परंतु, ते महादेवाचे सतत स्तुतीगान करत

होते त्यामुळे त्याला त्याचे पुण्य पुन्हा मिळाले व इंद्राला चाप लागला. ऋषी ग्रीत्समद इंद्राचे मित्र होते, एकदा इंद्र एकहजार वर्षे चालणारा यज्ञ आरंभ करतो, त्यावेळी इंद्र त्याना (ग्रीत्समद) साम गायन करण्यास सांगतात, ते होत असतांना वसिष्ठ ऋषी जे ब्रह्माच्या डोळ्यांतून आले आहेत, ग्रीत्समदाला बोलले, कीं, तो रथंतर योग्य प्रकारे उच्चारत नाही. अशारितीने ते गाण्याने तुमचे श्रेय काढून घेतले जाईल. असा चुकीच्या रितीने गाण्याने यज्ञाचे श्रेयसुद्धा नष्ट होईल. ते बोलल्या नंतर रागीट वसिष्ठ त्याला पुन्हा म्हणतात, तू एक जनावर होशील जर अशाप्रकारे चुकीचे रथंतर गात राहीलास तर. अशा वनात जाशिल जेथे कोणी दुसरा रहात नाही, वारा, पाणी सुद्धा नाही, अशा वनात तुला दहा हजार वर्षे रहावे लागेल. त्या वनात हिंस्र श्वापदं असतील, तेथे एका हरणासारखा तू रहाशिल. वसिष्ठ अशा रितीने ग्रीत्समदावर हाय खातात त्याच वेळी ग्रीत्समद एका हरणात रुपांतरीत होतात. त्यावेळी तो महादेवाला हांका मारतो ह्या स्तुती सुमनांच्या गाण्याने, महेश्वर मला (ग्रीत्समदाला) बोलतात, तू त्या शापातून मुक्त आहेस. ते पुढे दुवा देतात कीं हा यज्ञ असांच पुढे चालू ठेवा. त्यामुळें रथंतर गाण्याची आणखीन एक ग्रीत्समद पद्धत प्रचारात आली.

अशा अनेक उदाहरणाने दाखवता येते कीं, महादेव त्यांच्या भक्तांना सगळ्या प्रकारच्या कठीणात कठीण त्रासातून लिलया मोकळे करत असतात. महादेव त्याच्या भक्तांच्या सुखात आणि दुःखात सदैव हजर असतात. तरी जे पाप त्यांने आधी केले आहे ते त्याला भोगावे लागते. त्यानंतर वासुदेव बोलतात, सोन्याचा हात असलेले महादेव त्याच्यावर प्रसन्न झाले होते. महादेव कृष्णाला सांगतात कीं, मनुष्य प्राणी त्याच्यावर बेहद्द प्रेम करतील. तू सदैव अजिंक्य रहाशिल सगळ्या युद्धांत.

कृष्ण पुढे सांगतो, "गेल्या कल्पात माझ्या अवतारात मी मनिमंथ पर्वतावर महादेवाची घोर साधना केली होती. एक लक्ष वर्ष ती करत होतो. त्यानंतर महादेव माझ्यावर प्रसन्न झाले होते. ते मला बोलतात कीं, मला जे पाहिजे ते मिळेल. तो आशिर्वाद ऐकल्यावर मी खाली वाकून त्या परमेश्वराला विनंति केली कीं, माझी त्याच्यावरील भक्ती अशीच कायम राहो. ते त्याने मान्य केले आणि ते अंतर्धान पावले.

कृष्ण पुढे बोलतो, "जैगीश्वराचे सांगतो, वाराणशी नगरात जैगीश्वराला शोधून काढत त्याला महादेव आठ अधिकार देतात".

गर्गाचे उदाहरण पहा युधिष्ठीरा, गर्गाने मनातल्या मनात जपयज्ञ केला होता महादेवाला प्रसन्न करण्यासाठी ते सरस्वती नदीच्या तटावर त्यांने केले होते. त्यामुळे त्याला चौसष्ट कला ज्ञात झाल्या. त्याशिवाय त्याला एक हजार मुलगे दिले जे सगळे वेदशास्त्र संपन्न होते. महादेवाची कृपा झाल्यानंतर कांहीं कमी रहात नाही. त्यासाठी पंचव्रत मात्र कशोसीने करावे लागते (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा, कृतज्ञता). जो त्या व्रतात राहून महादेवाची भक्ती ह्या स्तुती सुमनाने करतो त्याचे नित्य भले होत असते.

पराशरांचे उदाहरण पहा, त्याने महादेवाला प्रसन्न केले होते पण कांहीं मांगितले नव्हते. एकदा त्याला वाटले कीं, त्याला मुलगा असावा. जो लोकोत्तर असला पाहिजे. जो लोकांना नितीशस्त्र, अध्यात्मविद्या ह्याचे ज्ञान देईल. जो वेदाची पुनर्रचना करील. जो पुराणं पुन्हा लिहील. महादेव त्याला आशिर्वाद देतात कीं, त्याला कृष्ण नांवाचा मुलगा होईल. त्याला सगळे सवर्णी मनू म्हणून ओळखतील. तो सप्तर्षींच्या तोडीचा असेल. तो वेदांची पुन्हा रचना करील आणि तो कुरु घराण्याचा मूळ पुरूष असेल. तो इतिहास आणि पुराणं लिहून काढील व त्यांना पुनर्जिवीत करील. महादेव पराशराला बोलतात कीं, त्याचा तो मुलगा इंद्राचा मित्र असेल आणि अमर राहिल. असे बोलून तो जगदिश्वर नाहीसा होतो.

ऋषी मांडव्यांचे उदाहरण पाहू, मांडव्यावर त्याच्या राजाने अज्ञानामुळे चोरीचा आरोप टाकला होता. ते त्या शिक्षेच्या काळात महादेवाची याचना ह्या स्तुतीसुमनाने करत होते. महादेव त्याला राजाचा गैरसमज दूर करून मुक्त करतात आणि दहालक्ष वर्षाचे आयुष्य बहाल करतात. महादेव त्याला सांगतात कीं, पूर्वकृत्यामुळे तो आरोप झाला त्यातून तो मुक्त होईल आणि त्याच्या जीवनमुक्तीनंतर ब्रह्मलोकात तो सुखाने राहील. असें सांगून महादेव अदृष्य झाले.

गलवा सांगतो, मी माझे गुरू विश्वामित्र ह्यांच्या आश्रमात शिकत होतो. ते पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या घरी निघालो. घरी गेल्यावर मी माझ्या पित्याचा शोध घेण्याचे

ठरवले, त्यावेळी माझ्या आईला फार दुःख झाले होते. ती मला सांगते, त्याचा पिता त्याला वेदविद्याविभूषित झालेला पाहू शकत नाही. माझ्या आईचे ते ऐकून मी फार खिन्न झालो. मी समजलो कीं माझे पिता मृत्यू पावले आहेत. मी महेश्वराची प्रार्थना करू लागलो ह्या स्तुतीसुमनांच्या गायनाने. महादेव त्यावर प्रसन्न होतात व सांगतात कीं, तू आणि तुझे मातापिता असे तिघे मृत्यू पासून मुक्त रहातील. त्यानंतर मी घरी गेलो व मला माझे पिता तेथे दिसले. ते नुकतेच पुजा करून आणि जेवण करून उठलेले होते. मी त्याच्या पाया पडलो. आमचा आनंद गगनात मावत नव्हता. माझे पिता मला बोलतात कीं, मी माझा अभ्यास करून गुरूगृहातून आलो आहे, ते पाहून त्यांना आनंद झाला आहे.

वैशंपायन पुढे सांगतात, अशी कित्येक उदाहरणं महादेवाच्या स्तुतीसुमनांच्या गायनाची युधिष्ठीर ऐकत होता. पांडव ते ऐकून नवल करत होते.

त्यानंतर कृष्ण युधिष्ठीराला सांगतो, उपमन्यू त्याच्या तेजाने चमकत होता, कृष्णाला सांगतो, पापकर्मात बुडलेले कधीच महादेवाची कृपा संपन्न करू शकत नाहीत. ते रजोगुणी आणि तमोगुणी असतात त्यांना महादेवाची भक्तीसुद्धा करून कांहीं उपयोग होत नाही कारण अशी भक्ती एक मिथ्याचार (स्वताची फसवणूक करण्यासारखे असते) ठरतो. केवळ सत्त्वगुणी लोक महादेवाची स्तुती करतील तर त्यांना फायदा होत असतो. जे प्रामाणिकपणे त्या पंचव्रताच्या नियमांचे पालन करतात ते परिणाम स्वरुप सात्त्विक होतात व त्यानंतर त्यांना महादेवाची भक्ती करणे शक्य होते. महादेवाची कृपा झाली कीं, तू इंद्र, ब्रह्म किंवा केशव असा कोणताही दर्जा प्राप्त करू शकतोस. त्यासाठी ईशानचे अनन्यश्चिंतन करावे लागते. दुसरी कोणतीही इच्छा त्याला नसेल.

त्यानंतर भगवान विष्णू युधिष्ठीराला सांगतो, अरे पांडवा, सगळे यच्चयावत सुक्ष्म आणि स्थूल चराचर कितीही मोठे अथवा लहान असोत महादेवाच्या इच्छेने उत्पन्न झाले आहेत. मग ते देव असतील, दैत्य, दानव, यक्ष, राक्षस, मनुष्य, मंत्रदेवता, यज्ञदेवता, ऋषी, पंचमहाभूत असें सगळे महादेवाच्या कृपेनेच त्यांचे अस्तित्व टिकवत असतात. म्हणून त्या सगळ्यांना ही स्तुतीसुमनं त्यांचे कल्याण करण्यासाठी उपयोगाची आहेत. मी स्वतः त्या महादेवाची पुजा अनन्यभावे करत असतो. नित्य ते करणार्याला

त्याच्या आधी केलेल्या पापांपासून सुद्धा सुटका मिळत असते. माणसात चारही वर्णाच्या लोकांना त्यांच्या कर्तव्यात यश मिळते. जे गाऊ शकत नाहीत त्याने त्याचे मनोभावे श्रवण करावयाचे असते. ऐहीक जीवनात सुख मिळाल्यानंतर ते नंतरच्या जीवनातसुद्धा सुखी रहातात.

अनुशासन पर्व भाग अठरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहो भरत कुळाचे श्रेष्ठ मला सांगा, विवाह प्रसंगी पति कोणत्या कर्तव्याच्या आणाभाका घेत असतो आणि त्याचा काय उपयोग असतो? प्राचीन ऋषींनी घालून दिलेल्या प्रथा त्या विवाहाद्वारा पाळण्याचे बंधन त्यांच्यावर असते. परंतु, जर त्यातील एक गेला तर त्या दोघाच्या एकत्र धार्मिक कार्य करण्यात काय अर्थ उरतो"? मृत्यूनंतर ते विभक्त होतात आणि आपापल्या कर्मविपाकानुसार त्यांच्या त्यांच्या गतिने निरनिराळ्या ठिकाणी जाणार मग एकत्र धार्मिक कार्य करण्यात कांहींच अर्थ उरत नाही. म्हणून मला वाटते कीं, त्यात कांहीं तथ्य नाही. माझ्यामते विवाह हा प्रामुख्याने लैंगिक सुखासाठीच्या सुरक्षिततेचा मार्ग आहे. कारण असे कोणते धार्मिक कार्य आहे कीं, ते दोघांनी एकत्रितपणे करण्यात कांहीं खास अर्थ असतो"? "दुसरे असें कीं, एकादा पुरूष अनेक बायका करत असतो त्या परिस्थितीत त्यांचे मृत्यूनंतरचे काय संबंध रहातीत त्यावरसुद्धा श्रृती कांहीं सांगत नाही. प्रत्येक वेळा फक्त पुरूषाचाच विचार श्रृती करते हेसुद्धा मला योग्य वाटत नाही".

पुढे युधिष्ठीर विचारतो कीं, त्याला ऋषींच्या उद्देशात कांहीं तथ्य दिसत नाही. केवळ लैंगिक सुखाच्या सुरक्षिततेसाठी विवाह योजले जातात हेंच मला योग्य वाटते. विवाह झालेल्यातील कोणी एकच मरतो त्यामुळे दुसरा उरतो त्याने काय करावे त्यासाठी कोणतेही मार्गदर्शन दिलेले नसते. विशेष करून पत्नी एकटी काय करणार पतिच्या निधनानंतर त्याची कांहीं तजविज नाही. ते सांगतात कीं, एकत्रितपणे धार्मिक विधी केल्याने त्यांना स्वर्ग प्राप्ती होते पण एक मेला तर त्याला स्वर्ग मिळण्याची सोय नाही. म्हणून पति मेला कीं पत्नीने स्वताला जाळून घ्यावयाचे कां? जेणे करून ते एकाच वेळी मेले असे होईल, परंतु, त्याने प्रश्न सुटत नाही. कारण जर पत्नी मेली तर पतिस जाळत नाहीत उलट त्याचा दुसरा विवाह योजण्याची धडपड सुरू होते. मग एकट्या मेलेल्या पत्नीच्या स्वर्गात जाण्याचे काय? पतिने दुसरा विवाह केला तर आधीच्या पत्नीबरोबर जे धार्मिक विधी केले त्याचे काय होते"? कांहीं पुरूष अनेक विवाह करतात

मग त्यात धार्मिक विधीचे काय, कसे करावयाचे, त्यासाठी श्रृतीमध्ये मला कोठेच मार्गदर्शन दिसत नाही. पुरूषांच्या कर्माप्रमाणे त्याला स्वर्ग अथवा नरक मिळत असतो त्यात त्याच्या पत्नीला कां खेचावे हे मला समजत नाही. ऋषी बाईला नेहमी भ्रष्ट कां समजतात ते मला समजत नाही. मी कित्येक महिला पहात आहे त्यात माझी आई, माझी पत्नी अशा अनेक पाहिल्या आहेत, माझी काकी गांधारी पाहिली आहे. त्यांत कोणीही मला भ्रष्ट आढळलेले नाहीत. तशाच इतर सगळ्या बायका मला दिसत आहेत. एक नेहमी भ्रष्ट व दुसरा नेहमी शुद्ध असे जे ऋषी सांगतात ते मला अजिबात पटत नाही. ऋषी कोणत्या बायकांबद्दल बोलत असतात ते माझ्या समजण्या पलिकडले आहे. वेदात सुद्धा स्त्रीला भ्रष्ट कोणत्या आधारावर मानले आहे ते मला समजत नाही. वेदात सांगितलेली कर्तव्ये नित्य कर्माची असल्यामुळे त्यात पाप, पुण्य ह्यांचा संबंध असत नाही. ती कर्तव्ये केल्याने अध्यात्मिक दर्जात कांहीं फरक पडत नसतो. मला त्या सगळ्या गोष्टी निरर्थक वाटतात. माझ्यामते विवाह हे बंधन केवळ दोघांची लैंगिक गरज पूर्तीसाठीची योजना असून त्यांचे एकत्र धार्मिक विधी करणे हे केवळ निमित्तमात्र आहे. त्या धार्मिक विधींतसुद्धा मला तथ्य दिसत नाही. मी त्यावर सतत चिंतन करत असतो. परंतु, मला पटेल असे स्पष्टीकरण मिळत नाही. म्हणून मी आपल्याला अहो पितामहा, श्रृतीच्या आधारे काय स्पष्टीकरण आहे ते विचारत आहे".

भिष्म सांगतात, तुझ्या प्रश्नाचे संबंध आहे असे एक संभाषण पूर्वी झाले आहे अष्टवक्र ऋषी आणि दिशा नांवाच्या बाईमध्ये ते मी तुला सांगतो, वस्तुतः दिशा हि उत्तर दिशेची प्रधान देवता आहे. फार प्राचीन काळी अष्टवक्र जो घोर तपस्या करत होता त्याला लग्न करावे असें वाटू लागले. तो ऋषी वदन्य ह्याची मुलगी त्यासाठी मागतो. तिचे नांव होते सुप्रभा. ती फार सुंदर होती. वागण्या बोलण्यात, चाल चुणूक, सगळ्या इतर मुलीत अव्वल होती. तिला पाहून अष्टवक्र फिदा झाला होता. तिचा पिता त्याला सांगतो कीं, तो त्याची कन्या त्याला दान करण्यास तयार आहे परंतु, त्याआधी तो उत्तरेकडे तीर्थयात्रा करून येईल जेथे त्याला बर्याच इतर गोष्टी पहावयाला मिळतील. अष्टवक्र वदन्याला विचारतो कीं, तेथे असे काय आहे कीं, ते मी पहावे असे त्याला वाटते? तो पुढे म्हणतो कीं, तो त्याप्रमाणे जाण्यास तयार आहे. वदन्य ऋषी त्याला कसे जावयाचे

ते सांगतात. वैश्रावणाच्या राज्यातून गेल्यावर तो रूद्राच्या प्रदेशात जाईल. तेथे सिद्ध आणि चरण रहातात. तेथे महादेवाचे अनेक गण तुला भेटतील. ते विविध रुपात असतात व सदैव नृत्य करत असतात. तेथे अनेक पिशाच्च तुला दिसतील. तेसुद्धा त्यांची विविध वाद्ये घेऊन नाचत गात असतात. तेथे महादेव रहातात. असें सांगतात कीं, माता उमाने तेथेच घोर तप केले होते महादेवाला प्रसन्न करण्यासाठी. ते ओलांडून तू पुढे जाशिल. तेथे तुला एक अरण्य लागेल. तेथे एक सुंदर स्त्री साक्षात श्री तुला भेटेल. ती पुज्य आहे. ती दिशा आहे. तिचे दर्शन झाले तर तू तिची पुजा करशिल मनोभावे. दिशा तुला मार्गदर्शन करील. ते केल्यानंतर तू परत ये आणि माझ्या मुलीचा हात घे. वदन्य त्याला बोलतो कीं, जर त्याला ते मान्य असेल तर तो प्रवासास निघेल. अष्टवक्र त्याला आश्वासन देतो कीं तो त्या दिशाचे दर्शन घेण्यास जाणार आहे. त्याप्रमाणे तो निघतो.

भिष्म पुढे सांगतो, अष्टवक्र हिमालयात जातो. तो त्या ठिकाणी असलेले सगळे पहातो ज्यांचे वर्णन वदन्याने केले होते. त्यानंतर तो पवित्र नदी वहूदा पहातो. त्यात तो स्नान करतो. तेथे तो देवतांची पुजा करतो त्यांचे आशिर्वाद मिळावे म्हणून. त्यानंतर तो विश्रांती घेण्यासाठी थोडे गवत पसरून त्या बिछाईवर निजतो. दुसर्या दिवशी तो उठतो. तेथे स्नान करून त्याचे धार्मिक विधी करतो. त्याच्याकडे असलेल्या पवित्र अग्नीच्या मदतीने होम करतो व त्यात वेदमंत्राने पुजा करतो. तेथे तो रूद्र आणि उमा पार्वती ह्यांची पुजा करतो. त्यानंतर तो पुन्हा थोडा वेळ आराम करतो. त्यानंतर तो कैलासाकडे निघतो. तेथे त्याला एक सोन्याचा दरवाजा दिसतो त्याच्या तेजाने तो दिपून जातो. तो तेथे मंदाकीनीचे दर्शन घेतो जी पुढे भागिरथी होते. तेथे असलेल्या तलवाच्या संरक्षणासाठी असलेले राक्षस व त्यांचा मुख्य मणिभद्र अष्टवक्रच्या स्वागतासाठी पुढे होतात. ते अष्टवक्राला सांगतात कीं, त्याचा धनी ऋषीस भेटण्यासाठी येत आहे. कुबेराला त्याच्या येण्याचे कारण माहीत होते. कुबेर त्याची क्षेमकुशल चौकशी करतात. कुबेर त्याला सांगतो कीं, त्याला जे पाहिजे ते त्याला तो देण्यास तयार आहे. त्याचे फार चांगले स्वागत त्याच्या वाड्यात होते. कुबेराबरोबर त्याचे राक्षस अधिकारी आणि

मणिभद्र तेथे त्याच्याबरोबर बसतात. त्याच्या स्वागतासाठी अप्सरा नाच गाणे करू लागतात.

अष्टवक्र बोलतो, त्या अप्सरांचे नृत्य चालू द्या. त्यानंतर उर्वशी, मिश्रकेशी, रंभा, अलम्वुषा, घृताची, चित्रा, चित्रगंधा, ऋचा, मनोहरा, सुकेषी, सुमुखा, हसिनी, प्रभा, विद्युता, प्रसन्ना, दत्ती, रति, विद्येती, अशा अनेक तेथे ऋषीच्या मनोरंजनासाठी नाचू लागतात. गंधर्व विविध वाद्ये वाजवत होते. त्या परिस्थितीत तो ऋषी तशात एक वर्ष वैश्रावणाच्या घरात काढतो. कुबेर त्याला सांगतो कीं, पुरे एक वर्ष तो ते नांचगाणे ऐकत आहे. जर त्याला पाहिजे तर ते तसेंच चालू राहिल.

अष्टवक्र म्हणतो कीं, त्याना त्यांचा पाहूणचार घेतला असून तो फार संतुष्ट आहे. तरी आता तो त्याच्या पुढच्या प्रवासाला जाण्याच्या विचारात आहे.

भिष्म पुढे सांगतो, तेथून निघालेला अष्टवक्र नंतर दिशाला भेटतो. तेथे त्यांच्यात जे संभाषण होते ते सांगतो. तो सांगतो कीं, त्याला लग्न करण्याची इच्छा झाली ते लैंगिक सुख प्राप्त करण्यासाठी नसून त्याला संतति देण्याचे बंधन आहे ते पूर्ण करण्यासाठी आहे. त्यानंतर तो त्याच्या पुढच्या अध्यात्मिक साधनेसाठी जाणार आहे. लैंगिक सुख हा माझा उद्देश कधीच नव्हता. ते ऐकून दिशा त्याला बोलते, वायू, अग्नी, पाणी अशा कितीतरी देवता स्त्रीबरोबर जमवून घेऊ शकत नाहीत जसा कामदेव करू शकतो. बायका लैंगिक सुखाच्या फार शौकीन असतात. त्या सुखासाठी त्या इतर कोणत्याही पुरूषाशी नाते जोडण्यास तयार असतात. तेवढ्या सुखासाठी त्या त्यांच्या वाङदत्त पुरूषाशी बेइमान होण्यास तयार असतात. एकादीच लाखात असते कीं, ती तिच्या पुरूषाशी इमानदारी राखते. त्यांचा त्यांच्या इच्छेवर ताबा नसतो आणि ती विधात्याची रचना आहे म्हणून त्याबद्दल बायकांना दोष देता येत नाही. तशी रचना करण्याचा विधात्याचा (निसर्गाचा) उद्देश प्रजातीच्या वंशाचे प्रजनन सातत्याने होत रहाणे हा आहे. स्त्री त्या प्रजननाचा एकमेव आधार असतो. म्हणून त्या त्यांच्या प्रवृत्तीबद्दल त्यांना दोष लागत नाही. तरी वासनेच्या भरात त्या त्यांच्या कुळाचा सुद्धा विचार करत नाहीत म्हणून त्यांच्यावर विश्वास न ठेवण्याची प्रथा श्रृतीने रूढ केली आहे.

भिष्म पुढे सांगतात, तरी अष्टवक्र ते मानत नाही आणि त्याचे त्या स्पष्टीकरणाने समाधान होत नाही. ती बाई त्याला विचारते, आता मी आणखीन काय करावे तुझ्यासाठी ते बोल. थोड्या समयासाठी तू येथे थांब. त्यावर तो ऋषी ठरवतो कीं, त्याची खात्री होईस्तोवर तो तेथे रहावयाचे. तो त्या बाईला पहातो. ती वृद्धत्वामुळें विकलांग झालेली होती. तो त्या सगळ्या विषयाचा सविस्तर विचार करू लागतो. त्या विचारांनी तो त्रस्त झाला होता. वदन्याने सांगितले होते कीं, ती रुपसुंदर आहे परंतु, तो पहातो कीं, ती बाई एक विकलांग आणि वृद्ध स्त्री आहे. त्याचा एकच गोंधळ उडालेला होता. तसेंच स्त्रीच्या लैंगिक गरजांशी त्याला कांही देणे घेणे नव्हते. कारण त्याचा लग्न करण्याचा उद्देश वासनापूर्ती कधीच नव्हता, त्याला फक्त त्याचे बीज मनुष्य वंशात रुजवावयाचे होते त्यामुळे त्याच्या तपाचा फायदा त्यानंतरच्या मनुष्य जातीला व्हावा. त्यात स्त्रीच्या इमानदारीचा अथवा बेइमानदारीचा काय संबंध? असा प्रश्न त्याला भेडसावत असतो. दिशाने मांडलेले ते मुद्दे त्याला निरर्थक वाटत होते. तशी प्राचीन परंपरा होती कीं, ऋषी त्यांच्या बीजाला अमर करण्यासाठी त्यांची संतति निर्माण करत असतं. प्रत्येक ऋषीला तसे करावे लागते अध्यात्मसाधना त्यामुळें ह्या जगात चालू राहते. तशा विचारात तो त्या बाईच्या शरीराकडे पहात असतो. ते शरीर त्याला फारच कुरुप असल्याचे समजते. ती त्या जागेची देवता होती. अष्टवक्र आठवतो कीं, वदन्य ऋषीने सांगितले होते कीं, ती दिशा श्री सारखी सुंदर आहे परंतु, तो पहातो ती बाई तशी नव्हती. तो कल्पना करतो कीं, कोण्या शापामुळे ती कुरुप झाली असावी. म्हणून अशा बाबत घाईने कांहीं समज करून घेणे योग्य नाही असे तो ठरवतो. तशा मनस्थितीत तो तेथे दिवस काढतो. ती बाई त्याला विचारते कीं, ती त्याच्यासाठी काय सेवा करू शकते? तो ऋषी सांगतो कीं संध्याकाळ झाली आहे तेव्हां प्रार्थना करण्या आधी त्याला आंचमन करण्यासाठी व हातपाय धुण्यासाठी पाणी पाहिजे. त्यानंतर तो त्याच्या नेहमीच्या ध्यानासाठी बसणार असतो.

अनुशासन पर्व भाग एकोणीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग विसावा

भिष्म पुढे सांगतात, त्या प्रमाणे ती दिशा त्याला लावण्यासाठी तेल आणते व त्याचे अंग चांगले मालिश करून रगडून काढते. तिच्या नाजूक हातीने ती त्याचे सगळे अंग चांगले चोळून काढते त्यामुळें ऋषीला फार बरे वाटते. त्यानंतर तो एका निराळ्या खोलीत जातो त्याची संध्याकाळची प्रार्थना करण्यासाठी. तेथे तो बसल्यावर दिशा त्याला उनः पाण्याने स्नान घालू लागते. ते तिचे स्पर्श त्याला मोहक वाटतात. ते होत असतांना त्यात सगळी रात्र कशी गेली ते त्याला समजले नाही. त्या स्नानातून उठल्यावर तो पहातो ते सूर्य उगवत आहे. त्याला त्याचे आश्चर्य वाटते. सगळी रात्र तो त्या स्थितीत कसा राहीला त्याचे त्याला नवल वाटू लागले. त्यानंतर दिशा त्याच्या साठी चवदार नाश्ता आणते. तो त्याला अमृतासारखा वाटतो. तो जास्त खात नाही पण जे खातो ते त्याला फारच रुचकर वाटते. दिशा बोलत असते, "पुरूषाच्या सानिध्यासारखे सुखदाई स्त्रीसाठी दुसरे कांहीं नसते". दुसर्या लिंगाच्या व्यक्तीचा सहवास सगळ्यांना कां आनंद देतो ते त्या ऋषीला समजत नाही. ऋषीला त्यात कसलाच आनंद वाटत नसतो. दिशा पुढे बोलते, "असे समजले जाते की, परलिंगाच्या व्यक्तीशी जो संभोग होतो त्याची लज्जत अवर्णनीय असते. कामदेवाचा स्त्रीयांवर मोठा पगडा असतो. त्याच्या पकडीत सापडलेली बाई त्या वासनेच्या इच्छेसाठी कांहीं वाटेल ते करण्यास तयार असते असा एकंदर अनुभव आहे. ते सुख मिळवण्यासाठी बाई कोठल्या थराला जाईल ते सांगता येणार नाही". असे भिष्म युधिष्ठीराला बोलत होते.

त्या बाईला अष्टवक्र बोलतो, "आपण धन्य अहात. मी कधी परस्त्रीच्या स्पर्शाचा अनुभव घेतलेला नाही. असे करणे आम्हाला शास्त्राप्रमाणे वर्ज आहे. कारण असे संबंध अध्यात्मिक दृष्ट्या घातक असतात. त्यामुळे जे नुकसान होते ते भरून काढणे सोपे नसते. त्यात अशा सुखाशी माझा दुरान्वयानेसुद्धा कांहीं संबंध नव्हता. परंतु, मला माझी संतति असणे माझ्या पुढच्या अध्यात्मिक साधनेसाठी जरूरीचे झाले आहे. त्या

शिवाय मी पुढची प्रगति करू शकणार नाही ब्रह्माच्या नियमाप्रमाणे. बाकी आपण जे बाईच्या वर्तनाबद्दल सांगता त्यात मला कांहीं रस नाही".

माते समान असलेल्या दिशाबाई त्याला बोलतात, "असें सांगतात कीं, वायूदेव, अग्नीदेव, वरुण हे आणि असे इतर देव बाईमध्ये ध्यान देत नाहीत परंतु, कामदेव मात्र त्यांच्यात विशेष आसक्ती दाखवत असतो. बायकांना कामसुखाची फार आवड असते. त्या सुखासाठी ती स्त्री परपुरूषाला आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असतात. क्वचितच एकादी असेल जी ते करणार नाही. कामदेवाच्या कह्यात सापडलेली बाई (हे रजोगुणी आणि तमोगुणी महिलांना लागू असते, सात्त्विक स्त्रिया त्याला अपवाद असतात) आपल्या प्रियजनांचा सुद्धा त्याग करण्यास मागे पुढे पहात नाही. त्या त्यांच्या मोहामुळें त्या त्यांचे कुटूंब, इतर नाती सगळे उद्‌ध्वस्त करत असतात. जशा नद्या पुराच्या जोरात त्यांच्या बाजूचे तट फोडून टाकतात. म्हणून भिष्म बोलतात कीं, तो बायकांचा मोठा दोष आहे".

भिष्म पुढे सांगतात, ऋषीचे तेवढ्याने समाधान झाले नाही, तो आणखीन शोधण्यासाठी दिशाला बोलतो, "असे मला सांगू नका. कारण आकर्षण होण्यासाठी आवड प्रथम व्हावी लागते. मला हव्या असलेल्या स्त्रीच्या मनात माझ्याबद्दल आवड उत्पन्न होण्यासाठी मी काय केले पाहिजे"? तसेंच आपण जे सांगता कीं, स्त्री फक्त लैंगिक कामाच्या आधीन असते ते मात्र मला पटत नाही. कारण शास्त्र सांगते कीं, स्त्रीची पांच रुप असतात. ती अशी, माता, भगिनी, सहधर्मचारीणी, भोगीनी आणि कन्या. त्यातील माता, भगिनी, कन्या ही रुप सात्त्विक असतात त्यामुळे त्यात दोष नसतो. सहधर्मचारीणी ह्या रुपात ती कधी माता असते, कधी भगिनी असते तर कधी भोगीनी असते. आपण जे बाईबद्दल बोलत अहात ते भोगीनी ह्या रुपाबद्दल असावे परंतु इतर सात्त्विक रुपांची चर्चा श्रृतीत कां नाही ते मला समजत नाही. तसे पाहिले तर पुरूषात सुद्धा भोगी असतो. त्याच्या पापमय कृत्याची चर्चा श्रृतीमध्ये कां होत नाही? त्यांच्यामुळें बाईला जे दुःख भोगावे लागते त्याबद्दल श्रृती कां कांहीं कठोर प्रतिक्रीया देत नाही ह्याचे उत्तर आपल्याकडे आहे कां? त्या दृष्टीने पहाता श्रृती योग्य मार्गदर्शन करत

नाही असेंच समजावे लागेल". श्रृतीचे चिंतन एकतर्फी दिसते. म्हणून मला ते मान्य नाही. श्रृती बायकांना न्याय देत नाही हेंच खरे.
दिशा त्याच्या शंकांकडे दुर्लक्ष करत पुढे बोलते, "प्रथम पहा, काळ वेळ पाहून तुझ्यात तिला आवडेल असें कांहीं आहे कां? ते जर तुला साध्य झाले तर तुझे काम झाले". ते ऐकल्यावर अष्टवक्र ठरवतो कीं, त्याप्रमाणे तो प्रयत्न करणार आहे. तो तिला बोलतो, "मी तुझ्या बरोबर रहाण्याचा प्रयत्न करणार आहे जेवढे जमेल तेवढे मी पहाणार आहे". पुढे अष्टवक्र विचारतो दिशाला, "मुलगी पुरूषाच नेमके काय पहाते व पुरूषाला पसंत करते"?
दिशा बोलते कीं, "हांच मुद्दा आहे त्यासाठी मी इतका वेळ तुला सांगत आहे, अरे मुला, स्त्री प्रथम भोगीनी असते म्हणून पत्नी होते. त्यानंतर ती प्रथम माता आणि नंतर भगिनी होत सहधर्मचारीणी बनत असते. म्हणून श्रृतीमध्ये तिच्या भोगीनी रुपाबद्दल विशेष सांगितले जाते. जो पुरूष तिच्या भोगीनी रुपाला शांत करतो तोंच तिचा पति ठरत असतो. बाकीची रुप नंतर वाढत जातात, जसा गृहस्थाश्रम पोक्त होत असतो.
त्यानंतर त्या वृद्ध विकलांग बाईकडे पहात विचार करू लागतो, त्याला समजत नाही मी ह्या बाईत काय पहाणार जी वृद्ध आणि विकलांग आहे, त्याला त्याच्या कल्पनेची घाण वाटते. त्याला त्या दिशात असें कांहीं दिसत नव्हते कीं, तो तिच्याकडे आकर्षित होईल. त्याला उलट त्या विकलांग देहाबद्दल घृणा वाटू लागते. तो विचार करतो ही बाई ह्या जागेची देवता आहे ती अशी कुरुप कां झाला आहे? कांहीं शाप तिला मिळाला होता कां? तो विचार करत असतो, समजतो कीं घाईने कांहीं निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. ती कां कुरुप आहे ते त्याला शोधावयाचे, असें वाटू लागते. त्याचवेळी दिशा त्याला विचारते, "मी तुमच्यासाठी काय करावे"? ऋषी सांगतो, आचमनासाठी पाणी आणावे, मला संध्याकाळची प्रार्थना करून त्यानंतर ध्यान करावयाचे आहे.
अनुशासन पर्व भाग विसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकविसावा

भिष्म पुढे सांगतात, त्याबरोबर दिशा तसे करण्यास जाते. ती सुगंधी तेल आणते व अष्टवक्राचे अंग चोळण्यास सुरूवात करते. ते झाल्यानंतर ती त्याला बाजूच्या खोलीत जाण्यास सांगते जेथे त्याची आंघोळीची व्यवस्था होती. आधीच्या दिवसाप्रमाणेच ह्या दिवशीसुद्धा तसे सगळे होत असते. त्याला त्यानंतर रुचकर न्याहरी दिशा आणून वाढते. अशारितीने ती रात्रसुद्धा तशीच जाते. तो उठतो व पहातो कीं पहाट झाली आहे. ते सगळे अनुभव अष्टवक्रासाठी मोठे विलोभनीय होते. हे काय होत आहे ते त्याच्या लक्षात येत नव्हते कीं, दिशा तिच्या मायावी सिद्धीने ऋषीस आपलेसे करण्याचा प्रयास करत होती. त्यानंतर ऋषी सूर्याची प्रार्थना करतो. त्यानंतर दिशाला विचारतो कीं, ह्यानंतर काय करावयाचे. ऋषी तिच्यात मातृत्व पहात असतो व ती जी त्याची सेवा करत होती ती आई करत आहे अशा निष्पाप विचाराने तो तिच्याशी वागत असतो. तो दिवससुद्धा तसा गेला. अष्टवक्राचे अजून समाधान झाले नव्हते. त्याला अजून समजत नव्हते कां, बाईला महत्व नसावे असे श्रृती सांगते. त्यामागील ठोस कारण अजून त्याच्यासाठी एक प्रश्नच होता. त्या रात्री ते दोघे एकाच खोलीत परंतु, वेगळ्या परंतु, एकमेकाला लागून असलेल्या बिछान्यावर निजण्याची व्यवस्था होती. दिशाच्या मायावी सिद्धीने ते कसे होत होते त्याचे भान ऋषीला अजून झाले नव्हते. ते स्वादिष्ट भोजन कसे त्याला मिळत होते तेसुद्धा त्याच्या लक्षात येत नव्हते. दिशा ते जेवण कधी शिजवत होती तेसुद्धा त्याला समजत नव्हते.

अष्टवक्र दिशाला बोलतो कीं, तो परस्त्रीकडे वासनिक दृष्टीने पाहू शकणार नाही. रिवाजाप्रमाणे मी फक्त माझ्या वाङदत्त पत्नीचाच विचार त्या करता करणार आहे. इतर स्त्रिया माझ्यासाठी माता, भगिनी, कन्या समान आहेत. त्याकरता तो तिला सांगतो कीं, तिचा बिछाना दूर असला पाहिजे.

भिष्म पुढे सांगतात, तो तसा आग्रहाने दिशाला विरोध करत असतो. परंतु, तिचे आक्रमक धोरण ती चालूच ठेवत होती. दिशा त्याला सांगते कीं, ती स्वतंत्र बाण्याची

बाई आहे ती कोणाकडून आज्ञा घेत नसते. अष्टवक्र तिला सांगतो कीं, श्रृतीप्रमाणे बाई कधीच स्वतंत्र नसते. लहानपणी पित्याच्या आज्ञात ती असते, तरूणपणी पतीच्या आज्ञेत आणि वृद्ध असते ती मुलाच्या आज्ञेत असते असें आदेश श्रृतीमध्ये बायकांसाठी सांगितले आहेत.

ते ऐकून दिशा त्याला सांगते, "अहो ऋषी, तुम्ही श्रृतीला जरा जास्तच महत्व देत अहात. त्या बाहेरसुद्धा शहाणपण असते त्याचे भान ठेवावे आपण". ती पुढे सांगते, "श्रृतीतील विधानं सापेक्ष असतात. ती निरपेक्ष समजून त्यांचा अर्थ काढणे योग्य नसते. त्यामुळे अनेक गैरसमज पसरले आहेत श्रृतीबद्दल". दिशा पुढे बोलते, "मला तुझ्याबद्दल वासना झाली आहे. माझी वासनापूर्ती करून तू पुण्य मिळवू शकतोस. स्त्रीला नाकारण्याने पुरूषाला पाप लागते हेसुद्धा श्रृती सांगते, ह्याचा तुला विसर पडला आहे वाटते"?

अष्टवक्र बोलतो, "विविध आकर्षणं पुरूषाला खेचत असतात. परंतु, मी संयमी आहे, माझा माझ्या इच्छांवर आणि इंद्रियांवर पूर्ण संयम आहे. तरी कृपया तू वृद्धे, माझ्या बिछान्यापासून दूर हो".

दिशा त्याला विनवण्या करू लागते कीं, तिचा अव्हेर केला तर ती त्याच्यावर नाराज होईल. पुढे ती त्याच्या समोर त्याच्या बिछान्यावर झोपते आणि त्याला तिच्या मिठीत घेण्याचा प्रयत्न करू लागते. मी तुझी आहे असें समजून तू ते सगळे माझ्याशी करण्यास तयार हो. जर परस्त्रीशी संभोग करणे तुझ्या नैतिकतेत बसत नसेल तर आपण लग्न करू. त्यानंतर निदान तुला कांहीं आक्षेप रहाणार नाही. त्यामुळे माझ्याशी झोपण्याने तुला पाप सुद्धा लागणार नाही. मी माझी मुखत्यार आहे, माझा कोणी धनी किंवा जबाबदार नाही. मी स्वताच्या इच्छेने तुझ्याशी लग्न करू शकते. म्हणून मला स्वीकार आणि माझा हो".

अष्टवक्र बोलतो, "ते कसे शक्य होईल? तू मला माझ्या आईसारखी वाटते आहेस". ती सांगते मी माझ्या कौमार्यपणापासून ब्रह्मचर्य पालन केले आहे. त्याबद्दल शंका घेऊ नकोस मी अजून कुमारिकाच आहे. असे समजू नकोस की, माझी इच्छा मान्य करून तू ऋषी वदन्याला दिलेल्या वचनाचा भंग होईल. ह्यातच खरे रहस्य आहे".

असे बोलत असतांना त्या वृद्ध दिशाचे एका सुस्वरुप तरूण बाईत रुपांतर होऊ लागते. ते पाहून अष्टवक्र आणखीनच चकीत होतो. ती त्याला सांगते कीं, ती त्याच्याशी सदैव प्रामाणिक रहाणार आहे.

अनुशासन पर्व भाग एकविसावा संपला.

# अनुशासन पर्व

## भाग बाविसावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा, त्या दिशाला अष्टवक्राचे भय वाटले नाही? त्याच्या अध्यात्मिक सामर्थ्याने तो तिला रागाच्या भरात शाप देईल अशी तिला भिती कशी वाटली नाही? आणि मला सांगा, त्यातून तिच्या तावडीतून तो कसा निसटला आणि त्याच्या घरी पोहोचला ते मला समजून घेण्याची उत्सुकता आहे".

भिष्म पुढे बोलतात, "निष्पाप मनाचा अष्टवक्र त्याच्या प्रचंड अध्यात्मिक उर्जेचे भान नसल्याने विचार करत असतो कीं, ही बाई तिचे रुप अशाप्रकारे कसे बदलत आहे, तिचे खरे रुप कोणते आहे, ती चेटकीण आहे कां? असे प्रश्न त्याला पडत असतात. ती जे बोलते ते खरे आहे कां, ते सुद्धा मिथ्या आहे तिच्या रुपा प्रमाणे? वदन्य ऋषींनी ज्या दिशाचा उल्लेख केला ती हींच कां, आणखीन कोणी"? असे अनेक प्रश्न ऋषीला भेडसावत होते. तो दिशाला विचारतो कीं, ती अशारितीने तिचे रुप कसे बदलू शकते. तो तिला सांगतो कीं, ती त्याला सत्य सांगेल. त्याच्या भाबड्या वागण्याने ती दिशा त्याच्यावर प्रसन्न होते व त्याला सांगते कीं, ती कोणी स्त्री नाही. ती उत्तर दिशा आहे. ती जे रुपं दाखवत आहे ती सगळी मायावी आहेत. ती पुढे त्याला समजावते कीं, मनुष्य कोठेही राहो लैंगिक वासना माणसाला सोडत नाहीत. अगदी ऋषींनासुद्धा. हे तुला समजावण्यासाठी मी हे नाटक रचले आहे. तुझ्या वासनांची अवस्था तपासण्याचे काम मला वदन्य ऋषीनी दिले होते. त्यात तू योग्य ठरला आहेस. त्यांना त्यांच्या सुप्रभासाठी असांच पति हवा होता. स्त्रीचे वैषयिक आकर्षण तुला समजावे म्हणून मी ते नाटक केले होते. ती सांगते कीं, वृद्ध स्त्रीसुद्धा वासनिक पिडांनी छळली जात असते. तुझी भावी पत्नीसुद्धा प्रथम एक भोगीनी आहे, नंतर माता आणि भगिनी ठरणार आहे तुझ्यासाठी तिच्यातील भोगीनी ह्या रुपाचा तुला अंदाज यावा हा माझा उद्देश होता. एका चांगल्या पतिसारखा तू तिच्यातील भोगीनीचा सन्मान करण्याचे विसरू नकोस. त्यासाठी तुला ब्रह्मचर्याला मर्यादा घालावी लागेल. ती पुढे त्याला सांगते कीं, ब्रह्मदेव आणि इंद्र त्याच्यावर फार संतुष्ट आहेत. तुला ऋषी वदन्य ह्यानी पाठवले आहे. जे

तुझ्या भावी पत्नीचे पिता आहेत. त्यांच्या सांगण्यामुळेंच मी तुझी परीक्षा करत होते. आता तू परत जा आणि तुझ्या भावी सासर्याकडे त्यांच्या मुलीचा हात मांग. तुझा परतीचा प्रवास सुखकर व्हावा ह्याची व्यवस्था केलेली आहे. तुला सुप्रभाकडून एक पुत्र होणार आहे अशी सुखद वार्तासुद्धा दिशा त्याला सांगते.

पुढे ती विचारते त्या ऋषीला कीं, आणखीन काय त्याला पाहिजे ते त्यांने सांगावे. अष्टवक्र तिला विचारतो, "एक स्त्री कशा प्रकारच्या पुरूषाशी प्रामाणिक असते ते सांग". दिशा सांगते बाईला फक्त स्वतावर प्रेम असते हे लक्षात ठेव. म्हणून ज्या पुरूषाकडून तिला खरे संरक्षण मिळेल तो पुरूष तिला आवडतो व त्याच्याशी ती एकनिष्ठ रहाते. म्हणून तू असा नवरा होशिल कीं, तुझी पत्नी तुझ्यावर पूर्णतया विसंबून राहू शकेल. बाईला तीन प्रकारची संरक्षणं हवी असतात, शरीराचे, मनाचे आणि वैभवाचे. ती सगळी तू तुझ्या भावी पत्नीला देण्याचे वचन दे आणि ती वचनं पाळ, म्हणजे तू खर्या अर्थाने वैवाहीक जीवनात सुखी होशिल. जो पुरूष ती तीन संरक्षणं देत नाही त्याला स्त्रीचे खरे प्रेम कधीच मिळत नाही.

भिष्म पुढे सांगतात, दिशाचे ते बोल ऐकून अष्टवक्र तिला आदरपूर्वकपणे नमस्कार करतो. तिची परत जाण्यासाठी परवानगी मांगतो. त्यानंतर तो त्याच्या आश्रमात यथावकाश परत येतो. तेथे कांही काळ विश्रांति घेतो. त्यानंतर त्याच्या आप्तांची परवानगी घेतो लग्न करण्यासाठी. त्यानंतर तो वदंन्याकडे जातो आणि जे घडले ते सगळे सांगतो. त्याच्या त्या लांबच्या उत्तरदिशेच्या प्रवासाची माहिती सांगतो तेथे असलेल्या वदन्यांच्या आश्रमातील मंडळींना. तेथे उत्तरदिशेच्या देवतेची कशी भेट होते ते सांगतो. तिच्या मायावी कारवायां त्यांना सांगतो. ती त्याला काय सांगते तेसुद्धा तो निष्पाप ऋषी तेथे जमलेल्यांना सांगतो. ते सगळे सांगून झाल्यावर वदन्य ऋषी त्याला सांगतात कीं ते त्यांची सुप्रभा त्याला देणार आहेत. ते सांगतात कीं, दिशा जी सुप्रभाची माता आहे तिने अष्टवक्राला जावई म्हणून मान्य केले आहे. त्यांचा रिवाजानुसार यथासांग विवाह होतो. त्यानंतर तो त्याचे वैवाहीक जीवन श्रृतीत दिलेल्या नियमाप्रमाणे जगतो.

अनुशासन पर्व भाग बाविसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग तेविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "कोणत्या ब्राह्मणाला भेटी, दानं करणे योग्य असते? त्याकरता कांहीं चिन्ह असते कां"?

भिष्म सांगतात, जो ब्राह्मण त्याच्या वर्णाचे नियम पाळत आहे त्याल करणे श्रेयस्कर असते. तो ब्रह्मचारी आहे हे त्याचे चिन्ह ठरू शकते.

युधिष्ठीर बोलतो, "मोठ्या भक्तीभावाने जर दान केले अयोग्य ब्राह्मणाला केवळ अजाणता तर ते दान व्यर्थ गेले असे समजावयाचे कां"?

भिष्म सांगतो, दानाच्या भक्तीत फळ असते. कोणाला केले ते महत्वाचे नसते, दान करणायाची इच्छा महत्वाची असते. जर दान निरपेक्ष असेल तर ते फळते असें कांही ऋषी सांगतात.

युधिष्ठीर विचारतो, असें समजतात कीं, ज्या ब्राह्मणाची नेमणूक देवाच्या पुजेसाठी केली जाते त्याची परीक्षा घेऊ नये. परंतु, सूज्ञ सांगतात कीं, पितराच्या पुजा करणार्याची मात्र परिक्षा करण्यास हरकत नसावी.

भिष्म सांगतो, देवतेची पुजा करणार्याची परीक्षा यथावकाश देवता स्वतः करत असते म्हणून इतरानी ती करण्याची आवश्यकता नसते. तसे पितरांच्या बाबत नसते. म्हणून त्या पुरोहितांची तपासणी आवश्यक असते. त्याशिवाय ब्राह्मण ब्रह्माशी जोडलेले असतात. ऋषी मार्कंडेय असें प्राचीन काळी कृत युगातील ब्राह्मणांबद्दल बोलत होते. त्या नंतरच्या युगातील ब्राह्मणाचे सांगता येत नाही.

युधिष्ठीर विचारतो, पांच प्रकारचे पुरोहित आहेत त्यातील कोणता जास्त योग्य असतो पुजेसाठी ते सांगा, ते पांच प्रकार आहेत, त्रयस्थ, नातेवाईक, बैरागी, यज्ञविधीचे ज्ञान असणारा, चांगला जाणकार.

भिष्म सांगतात, त्रयस्थ, नातेवाईक, बैरागी ह्यांच्यामध्ये उच्च जन्म, धार्मिक विधींबद्दल आस्था, ज्ञानी, पंचव्रताचे पालन करणारा, नम्र, चोखंदळ असें गुण

असतील तर ते योग्य समजावेत. आणखीन सांगतो, ह्याबद्दल श्रेष्ठींचे काय मत आहे ते सांगतो, मी तुला त्या महत्वाच्या चार लोकांचे मत काय आहे ते सांगतो, ते आहेत पृथ्वी माता, काश्यप ऋषी, अग्नीदेवता आणि मार्कंडेय ऋषी.

माता पृथ्वी सांगते, जसा मातीचे ढेकूळ पाण्यात टाकले की, चटकन विरघळते तसे पाप कर्माचे परिणाम ब्रह्मचर्य पालन, सत्पात्र ज्ञान देणे आणि अडचणीत असणार्या सज्जन लोकांना मदत करण्याने विरून जाते.

काश्यप ऋषी सांगतात, जर ब्राह्मणानी पंचव्रत पाळले नाही तर त्याचा वेदाचा अभ्यास, सांख्य विचारांचा अभ्यास, पुराणांचा व इतिहासाचा अभ्यास व्यर्थ असतो.

अग्नी देव सांगतात, पंचव्रताचे पालन न करणारा ब्राह्मण कितीही थोर विद्वान असला तरी जर द्वेष, मत्सर, क्रोध अशा दोषाने बांधला गेला असेल तर तो सत्यापासून दूर गेला असे समजले जाते. दुसर्यांचे वाईट करण्याचे विचार करणारा उत्तम गति प्राप्त करू शकत नाही.

मार्कंडेय ऋषी सांगतात, एका बाजूला सत्य आणि दुसर्या बाजूला शंभर अश्वयज्ञाचे फळ असे तोलले तर सत्याच्या एक शतांश ते यज्ञाचे फळ ठरेल इतके सत्य थोर असते.

भिष्म पुढे सांगतात, असे सांगून ते चार निघून गेले.

युधिष्ठीर विचारतो, "ब्रह्मचर्याचे पालन करणारा ब्राह्मण त्याच्या पूर्वजांचे श्राद्ध करतो, ते श्राद्ध साध्य झाले असें समजता येईल कां"?

भिष्म सांगतात, ब्रह्मचर्याचे पालन बारा वर्षे करणारा ब्राह्मण त्याच्या पितरांसाठी श्राद्ध करतो व स्वतः ते पिंड खातो तर तो भ्रष्ट होतो पण त्याने केलेले श्राद्ध मात्र साध्य झाले असें समजले जाते.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "सूज्ञ सांगतात, पंचव्रत करणार्याच्या कडे पुण्याचे अनेक मार्ग असतात. तुमचे काय मत आहे"?

भिष्म सांगतात, पंचव्रता बरोबर क्षमाशिलता, संयम, परमेश्वरावरील श्रद्धा ह्या उच्च वर्तणूकींचे पालन न करता केवळ त्याच्या गोष्टी करतो त्या ब्राह्मणाला दिलेले दान व्यर्थ जाते. कारण असा ब्राह्मण पापी ठरतो, त्याचे अध्यात्मिक दृष्ट्या पतन होत असते.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा, ब्रह्मचर्या पेक्षा श्रेष्ठ काय आहे? शुद्ध जीवन म्हणजे काय"?

भिष्म सांगतात, त्यागाची भावना जी स्वार्थाच्या विरूद्ध असते ती श्रेष्ठ समजली जाते. ज्या त्यागामुळे चांगल्याचे भले होते तो त्याग श्रेष्ठ समजला जातो.

युधिष्ठीर विचारतो, "माणसाने पंचव्रत आयुष्यभर आचरावयाचे असते. त्यातून तो संपत्ती कमावतो, त्याचा अनुभव घेतो. ते योग्य आहे कां"?

भिष्म सांगतात, पंचव्रताचे (चांगूलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता) पालन करण्यात त्याने संपत्ती मिळवावी. तो ज्येष्ठांचा सन्मान करून त्याची कामं करेल. न्यायालयात खोटी साक्ष देणे, विश्वासघात करणे, गुरूशी बेईमानी करणे, हे ब्रह्महत्त्या करण्या सारखे असते. आपला अग्नी विझवू नये. वेदांचा अभ्यास कधी थांबवू नये.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "दुसर्यांच्या वागण्याचे मुल्यमापन कसे करावे"?

भिष्म सांगतात, "जे पंचव्रताचे पालन करतात ते उच्च समजावेत, ते सात्त्विक असतात. मग तो कोणत्याही वर्णाचा असेल. त्याला ब्राह्मणाचा दर्जा द्यावा. सत्पात्र दानं पुण्यकारक ठरते त्याउलट अपात्र दान पापकारक असते.

युधिष्ठीर विचारतो, "सत्पात्र आणि अपात्र कसे ठरते"?

भिष्म सांगतात, "जो पापाचरण करत नाही तो सत्पात्र आणि जो पापाचरणी आहे तो अपात्र ठरतो".

अनुशासन पर्व भाग तेविसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग चोविसावा

युधिष्ठीर बोलतो, "मला सांगा, श्राद्धाच्या समयी, देवता आणि पितर ह्याच्या कोणत्या प्रकारे पुजा कराव्यात असें शास्त्रात सांगितले आहे"?

भिष्म सांगतात, "श्राद्ध विधी करण्या आधी प्रथम स्वताला स्नानादि विधींनी शुद्ध करून इतर पवित्र विधी करावयाच्या असतात देवतांच्या आणि पितरांच्या शांतिसाठी. त्या सगळ्या देवतांच्या शांतिसाठी करावयाच्या विधी दुपारच्या आधी सावधगिरीने कराव्यात. पितरांच्या साठी ज्या असतात त्या दुपार नंतर कराव्यात. त्याच प्रमाणे श्राद्धाच्या निमित्ताने कोणालाही दान करावयाचे असेल तर ते दुपारच्या प्रहरी केले पाहिजे तसे नाही केले तर ते दान व्यर्थ जाते. त्याचे कारण त्या वेळेनंतर दिलेले दान राक्षस घेतात असे समजले जाते. दान स्वच्छ असले पाहिजे त्यात कोणत्याही प्रकारचा दोष नाही ह्याची खबरदारी दात्याने घ्यावयाची असते. सदोष दान व्यर्थ जाते. अशी सदोष दानं राक्षस खातात असे समजले जाते. ती पितरांना अथवा देवतांना पोहोचत नाहीत. श्राद्धाला जमलेल्या अतिथींना असें खाद्य पदार्थ दिले जातात ते जर श्राद्धाच्या पिंडदाना आधी दिले गेले तर तेसुद्धा राक्षसाना दिले असे समजले जाते. भिष्म पुढे सांगतात, कोणत्या प्रकारचा ब्राह्मण दानांसाठी लायक असतो ते ऐक. भ्रष्ट ब्राह्मण त्यांच्या गैर वागणूकीमुळें झाले आहेत ते (व्यसनी, वेदाचा अभ्यास न केलेले, खोटे बोलणारे, पापकर्मात रमणारे, दलालीचे काम करणारे, व्यभिचारी, बहिष्कार केलेले, असाध्य व्याधीने पिडीत, वेडा, भ्रमिष्ट, कुष्ट आलेले, अपंग, क्रोध, द्वेष, मत्सर अशा दोषांच्या आहारी गेलेले, दारू पिणारा, दारू विकणारा, खोडी साक्ष देणारा, वेश्यागमनी, वैद्यकी करणारा, खोटी शपथ घेणारा, पुजारी म्हणून पैसे घेऊन काम करणारा, देवळात पौरोहित्य करणारा, गाणी बजावणी करणारा, वेद पैसे घेऊन शिकवणारा, क्षत्रियाचे काम करणारा योद्धा, सावकारी करणारा, दुकानदार, इत्यादि) श्राद्धाच्या दानासाठी योग्य नसतात. अशा ब्राह्मणांना श्राद्धासाठी आमंत्रण देऊ

नये. ज्याचे कुळ, गोत्र ह्यांचा पत्ता नाही असे ब्राह्मण श्राद्धासाठी अयोग्य आमंत्रित असतात.

श्राद्धाचा शिधा घेण्याचे व देण्याचे फायदे कोणते ते सांगतो, वेदाचा व्यासंग करणार, वेदघोष करणारे, गायत्रीचा जपयज्ञ करणारे, शास्त्रात दिल्याप्रमाणे जगणारे, असे असतांना शेती करणारे असे ब्राह्मण शिधा घेण्यास योग्य असतात. पवित्र अग्नी सांभाळणारा, गृहस्थी जीवन जगणारा सपत्निक, सकाळी सावित्रीचा मंत्र जपणारा असे दरिद्री, भिक मागून जगणारा, यज्ञकार्य करणारा, श्राद्धासाठी आमंत्रण करण्यास योग्य असतात.

श्राद्धासाठी दही, तुप, हरण सांबर गाय ह्यांचे मांस, घ्यावयाचे असते. श्राद्ध झाल्यावर "स्वाद्ध", असे ब्राह्मणांनी बोलावयाचे असते. क्षत्रियांच्या पितरांसाठी केलेल्या श्राद्धात त्यांच्या शांतिचे आवाहन करावयाचे असते. वैश्याच्या श्राद्धात सर्व समृद्धीचे आवाहन करावयाचे असते. शुद्राच्या श्राद्धात स्वाती असें तीन वेळा बोलून त्याच्या पितरांची शांति करावयाची असते. ब्राह्मणाच्या श्राद्धात ॐ उच्चारावयाचा असतो. क्षत्रियांच्या मध्ये तसे करण्याची आवश्यकता नसते. वैश्य आणि शुद्रांच्या श्राद्धात देवतेचा घोष करावयाचा असतो. अशी सगळी जातकर्म म्हणून ओळखली जातात. श्राद्ध विधी द्विजांसाठी आवश्यक सांगितला आहे. श्राद्ध विधी करतांना कुशाच्या गवताचे यज्ञोपवित यजमानाने घालावयाचे असते. राजघराण्याच्या लोकांत धनुष्याची दोर त्यासाठी वापरावयाची असते.

आता सांगतो श्राद्ध विधीचे फायदे आणि तोटे. श्राद्ध योग्यरितीने न करण्याचे पाप ब्राह्मणाला लागते. ती चूक करण्याने क्षत्रियाला ब्राह्मणाच्या चौपट पाप लागते व वैश्याला क्षत्रियाच्या आठपट पाप सागते. त्याना यज्ञा व्यतिरिक्त प्राणी मारल्याचे पाप लागते. जर आंचमन न घेता तो श्राद्धाचे खात असेल तर त्याला पाप लागते.

युधिष्ठीर विचारतो, देवतेच्या नांवांने कोणाला दान केले तर जास्त फायदा होतो ते सांगा. ज्या ब्राह्मणाच्या बायका त्याचे उष्टे खातात त्यास देण्याने जास्त फायदा होतो. जे ब्राह्मण व्रतस्थ जीवन जगतात त्यांना देण्याने त्यापेक्षा जास्त होतो. त्याशिवाय जे लायक आहेत परंतु, ब्राह्मण नाहीत अशांना दान केल्याने जास्त फायदा होतो.

अनावस्थेत गेलेले, असहाय, दीन अशांना दान करणे ब्राह्मणांना करण्यापेक्षा जास्त श्रेयस्कर असते. तशांनी वेदाचा अभ्यास केला नसेल तरी चालते. जे त्यांच्या आप्तांच्या पितरांची श्राद्ध करत नाही ते नरकात जातात.

आता स्वर्गात कोण जातात ते सांगतो, जे पंचव्रताचे पालन करतात ते स्वर्गात जातात. जे सश्रद्ध आहेत ते स्वर्गात जातात. जे तपस्या करतात ते स्वर्गात जातात. इतरांचे भले करण्यासाठी जे धडपडतात ते स्वर्गात जातात.

भिष्म पुढे बोलतात कीं, त्यांनी श्राद्धा संदर्भात सगळी माहिती सांगितली आहे. त्यात काय करावयाचे आणि काय करू नये तसेंच कोणाला कसा फायदा होतो व काय केल्याने नुकसान होते तेसुद्धा सांगितले आहे.

आता आणखीन काय तुला पाहिजे ते सांग.

अनुशासन पर्व भाग चोविसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पंचविसावा

युधिष्ठीर बोलतात, "अहो भरतवंशाचे अग्रणी आपण माझ्या कांहीं शकांचे निरसन कराल अशी मी अपेक्षा करून कांहीं प्रश्न विचारत आहे. कृपया त्यांची समर्पक उत्तर द्या. अशा कोणत्या परिस्थिती असतात जेव्हां ब्रह्महत्त्या न करतासुद्धा ब्रह्महत्त्येचे पातक त्याला लागत असते"?

भिष्म सांगतात, "बर्याच वर्षापूर्वी मी व्यास महर्षींना नेमका हांच प्रश्न विचारला होता. तेव्हां ते काय सांगतात ते तुला आता मी सांगणार आहे. ते नीटपणे ऐक, मी त्याना बोललो कीं, अहो महर्षी आपण वसिष्ठांच्या वंशातील चौथे वंशज अहात. मला सांगा ब्राह्मणाची हत्त्या न करता सुद्धा एकाद्याला ब्रह्महत्तेचे पातक कसे लागू शकते"?

माझा तो प्रश्न पराशराचे पुत्र ऐकतात, त्यांचा नितीशास्त्राचा अभ्यास मोठा होता. त्यानी मला ताबडतोब उत्तर दिले. ते सांगतात कीं, ब्रह्महत्त्या कशाला म्हणतात ते प्रथम समजून घे. ब्रह्महत्त्येचा संबंध ब्राह्मणाशी नसतो तो ब्रह्मदेवशी असतो. जे केल्याने अथवा ज्या विचारांने ब्रह्मदेवाचा किंवा महादेवाचा उपमर्द होतो ती ब्रह्महत्त्या ठरते. जर एकादा मनुष्य ब्राह्मणाला घरी भीक देण्याच्या आमिषाने बोलावतो आणि तो ब्राह्मण आल्यावर तो त्याला भीक देत नाही. सबब सांगतो कीं, त्याच्याकडे देण्यासाठी कांहीं नाही. अशारितीने जो वागतो त्याने ब्रह्महत्त्या केल्याचे पातक त्या यजमानाला लागते. असे केल्याने त्या ब्राह्मणाचा अपमान व त्या बरोबर वेदांचा अपमान केल्याचे पातक त्यामध्ये असते. तहानलेल्या जनावराला पाणी न देणे हे सुद्धा ब्रह्महत्त्येत धरले जाते. जो श्रृतीचा अभ्यास न करता श्रृतीत दोष असल्याचे सांगतो तसेंच इतर शास्त्रांचासुद्धा अपमान करतो तो त्या पातकात धरला जातो. जो ब्राह्मणाच्या जिव्हारी लागेल असे अपमानास्पद बोलतो त्याला ब्रह्महत्त्येचे पातक लागते. विशेष म्हणजे जरी तो अपमान करणारा स्वतः जन्माने ब्राह्मण असला तरी त्याला ते पातक लागते. आंधळा, वृद्ध, बालक, स्त्री, भिकारी अशांचा गैरफायदा घेणे हे सुद्धा ब्रह्महत्त्याच समजली जाते.

थोडक्यात पंचव्रत न पाळण्याने ब्रह्महत्त्या होत असते. केवळ अपमान करून बोलण्यामुळे सुद्धा ब्रह्महत्त्या होत असते.

अनुशासन पर्व भाग पंचविसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग सव्विसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "असे सांगतात कीं, पवित्र नद्यांच्या तीरावर तीर्थयात्रा करण्यात मोठे पुण्य लाभते तसेंच त्यांची स्तुती करण्यात सुद्धा पुण्य लाभ असतो तरी आपण मला त्याबद्दल जे आपण जाणता ते सांगा.

भिष्म सांगतात, फार प्राचीन काळी अंगिरसानी पवित्र नद्यांची यादी तयार केली होती. ती तुला मी ऐकवतो त्यामुळें तुला मोठे पुण्य लाभणार आहे. एकेकाळी गौतम ऋषी अंगिरसांना विचारतो कीं, त्याला नद्यां आणि त्यांच्या कडे असलेल्या तीर्थांबद्दल व त्यांच्या श्रेयांबद्दल शंका आहेत. त्याबद्दल सांगा असे तो त्यांना बोलतो. मला सांगा, अशा नद्यात स्नान केल्याने पुढच्या जन्मी कोणते असे भले होते त्या तीर्थंकराचे ते मला सांगा. तुम्ही त्याबद्दल जाणकार अहात म्हणून तुम्हाला मी विचारत आहे. असे गौतम ऋषी त्याला विचारतात.

अंगिरस बोलतात, चंद्रभागा (आजची चिनाब) आणि वितस्ता (झेलम आजची) ह्या नद्यात लागोपाठोपाठ सात दिवस स्नान करणारा त्याबरोबर उपवास करणारा त्याची सगळी त्या वेळेपर्यंतची पाप धुतली जातात. त्याला वैराग्याचे श्रेय मिळते. अनेक नद्या आहेत ज्या काश्मिरातून वहातात, पुढे सिधूमध्ये मिळतात. त्या सगळ्या नद्यांत स्नान करणारा स्वर्गात जातो.

पुष्कर, प्रभास, नैमिषा, देविका, इंद्रमार्गा, स्वर्नविंदू ह्या नद्यात नेमाने स्नान करणारा खात्रीने स्वर्गात जातो. तेथे अप्सरांशी खेळू शकतो. हिरण्यबिंदू मध्ये पोहोणारा त्यानंतर जर कुससेया आणि देवेंन्द्र मध्ये आंघोळ करत असेल तर त्याची सगळी पाप धुतली जातात. गंधमादन पर्वताच्या जवळ असलेले इंद्रतोया आणि करतोया ज्या कुरुंग देशात आहेत, त्यात प्रथम तीन दिवस उपोषण करून नंतर स्नान करतो त्याला अश्वमेध यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. गंगाद्वार आणि कुशावर्त, बिल्वक जे निला पहाडात आहेत, तसेंच कंखल ह्या नद्यात स्नान करणारा शुद्ध होतो. त्याचा स्वर्गाचा मार्ग मोकळा होतो. ब्रह्मचर्य पालन करणारा आणि पंचव्रत आचरण्यात ठेवणारा

जलप्रदात स्नान करतो तर तो अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळवतो. जेथे गंगा उत्तरेकडे वाहू लागते तेथे एक महिनाभर उपोषण करत जो स्नान करतो त्याला महेश्वराची कृपा प्राप्त होते. आपल्या पितरांचे श्राद्ध जो सप्तगंगा, त्रिगंगा आणि इंद्रमार्गा मध्ये करतो तो अमृत प्राप्त करतो पवित्र मनाचा मनुष्य जर त्याचे अग्निहोत्र दररोज करत एक महिना अनशन करून महाश्रमा नदीत स्नान करत असतो त्याला त्याच्या कार्यात यश निश्चितपणे मिळते. भृगू कुंडात जो स्नान करतो त्याची सगळी पापं ब्रह्महत्त्या सुद्धा धुतली जातात . पंचव्रत पाळणारा जर कन्याकूप आणि वलक मध्ये स्नान करतो त्याला देवता प्रसन्न होतात. देविका आणि सुंदरीका ह्या तलावात स्नान करणारा जेथे अश्विनी तीर्थ आहे, त्याच्या पुढच्या जन्मी फार देखणा होतो. पंधरा दिवस अनशन करून महागंगेत आणि कृत्तिकांगरकात स्नान करणारा स्वर्गात जातो त्याच्या निधना नंतर. वैमिनीका आणि किंकीना नद्यांत स्नान करणारा योगी संचार सामर्थ्य प्राप्त करतो. तो स्वर्गातील अप्सरांच्या प्रदेशात जात असतो. आपल्या षडदोषांचे नियमन करून ब्रह्मचर्य पाळणारा विपाशा नदीच्या कलिका घाटावर स्नान करत असेल तर त्याचे पुढचे जन्म टाळून स्वर्गात राहू शकतो. अस्यलाम नदीत स्नान करून जो पितरांसाठी श्राद्ध करतो व मग महादेवाची आराधना करतो त्याचे अंतरात्मा शुद्ध होतो व तो स्वर्गात जातो त्याच्या निधनानंतर. महापुरा नदीत स्नान करणारा जर त्याचे मन आणि शरीर शुद्ध असेल तर कोणत्याही श्वापदापासून सुरक्षित असतो. विशेष करून माणसांपासून त्याला धोका नसतो. देवदारूच्या वनात असलेल्या झर्यात स्नान करणारा पितरांचे श्राद्ध करत असेल तर सात दिवसाचे आत्मशुद्धीचे व्रत केल्यावर त्याला देवतांची कृपा प्राप्त होत असते. शरस्तंम्वात असलेल्या धबधब्यात स्नान करून आणि कुस्तंभा आणि द्रोणसर्मपद अशा ठिकाणी असलेल्या धबधब्यात स्नान करणारा अप्सरांच्या लोकात जातो त्याच्या निधनानंतर. जनस्थान, चित्रकूट आणि मंदाकिनी येथे स्नान करणारा राजघराण्यात जन्म घेतो. सम्य तीर्थावर पंधरा दिवस राहून स्नान करून गंधर्वाची पुजा करतो तो अणिमा, गिरीमा ह्या सिद्धी प्राप्त करू शकतो. कौशिका तीर्थात राहून पूर्ण अनशन करणारा गंधर्व लोकात जातो मृत्यू नंतर.

गंधतर्क तीर्थात स्नान करणारा व एक महिना रहाणारा पूर्ण अनशन करत असेल तर अदृष्य होण्याची सिद्धी मिळवतो. त्यानंतर तो स्वर्गात जातो. मातंग सरोवरात स्नान कराणारा यशस्वी होतो. अलम्व अथवा अंधक तसेंच नैमिष आणि स्वर्ग ह्या तीर्थांवर स्नान करणारा तेथे पितरांचे श्राद्ध करतो तर त्याला मनुष्य बळीचे श्रेय मिळते.

गंगेत स्नान करून ज्या तीर्थाला उत्पलव म्हणतात तेथे पुजा करतो एक महीना, आणि गंगा व यमुनांच्या संगमावर स्नान करतो, तसेंच कलंजरा पहाडावर जाऊन पितरांची पुजा करतो असे एक महीना करतो, त्याला अश्वमेध यज्ञ केल्याचे श्रेय मिळते.

प्रयाग जेथे गंगा आणि यमुना ह्यांचा संगम आहे, तेथे माघ महिन्यात स्नान करणार्याला जर खरा पश्चात्ताप झाला असेल तर तो स्वर्गात जातो. शष्थी सरोवरात स्नान करणारा अन्न दानाचे श्रेय मिळवतो. मरुतांच्या पवित्र तीर्थक्षेत्री स्नान केल्याने पितरांची शांती होते. ब्रह्मसरस तीर्थ जे गंगेच्या तटावर आहे तेथे स्नान करणारा सोमलोकात जातो त्याच्या निधनानंतर.

उत्पटक आणि अश्रवर्क तीर्थी आंचमन घेऊन पितरांची पुजा करणारा अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळवतो. अष्मप्रिश्था आणि निरविंदा पहाडाच्या कडे असलेले क्रौंचपदी अशा तीन ठिकाणी स्नान करण्याने ब्रह्महत्त्येचे पाप क्षालन होते. प्रत्येक एका स्नाने एक एक ब्रह्महत्त्येचे क्षालन होत असते. कलविंद मध्ये स्नान करण्याने पुढच्या जन्मी पाण्याचा प्रश्न रहात नाही. पुनर्वर्तनंदा आणि महनंदा मध्ये स्नान करणारा मृत्यूनंतर इंद्राच्या बगीच्यात रहातो. तेथे त्याची सेवा अप्सरा करतात. विपाशा (आजची बियास) मध्ये स्नान करण्याने पुंड्रीक यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. शुर्पर्का तिर्थात स्नान करणारा पुढच्या जन्मी राजघराण्यात जन्म घेतो. कन्यहृद तर्थावर स्नान केल्याने त्याला यमाच्या घरात जावे लागत नाही. उज्जनक तीर्थ जे अर्ष्टसेनाच्या मुलाच्या नांवाने ख्यातनाम आहे जे पिंगा नदीच्या काठी आहे, तेथे स्नान केल्याने पापनाश होतो असे समजतात. तीन दिवस उपवास करून कुल्य तीर्थात स्नान केल्याने व अघमर्षण मंत्राचा जप केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. पिंडारक तीर्थी स्नान करून एक रात्र उपवास केल्याने त्या अग्निष्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. अघमर्षण ऋषींनी मंत्र शास्त्राची निर्मिती केली असे समजतात.

ब्रह्मसरस येथे धर्मारण्य आहे तेथे स्नान करणार्याला पुंडरीक यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. मैनका पहाडातील सरोवरात स्नान करुन मंत्रोच्चार करून जो एक महिना रहातो आणि दररोज सकाळची आणि संध्याकाळची प्रार्थना करतो तो सगळे यज्ञ केल्याचे श्रेय मिळवतो. कलोलक आणि नंदीकुंड तसेंच उत्तर मानसा येथे एक तीर्थ आहे तेथे गेल्याने भृणहत्त्येचे पाप क्षालन होते. सगळा हिमालय पवित्र आहे. ते महादेवाचे सासर आहे. तेथे इतके सिद्ध आहेत कीं, तेथे केवळ जाण्याने पुण्यप्राप्त होत असते.

अरे कुंतीपुत्रा, तेथे अनेक योगी जाऊन अन्नत्याग करून जीव सोडतात जे वेदात सांगितल्याप्रमाणे ते करत असतात, ते ब्रह्मपदी जातात. तेथील तीर्थात रहाणारे मोक्ष सहज प्राप्त करत असतात.

जी तीर्थक्षेत्रे फार दूर आहेत व जेथे कोणी जात नाही तेथे गेल्याने जास्त फायदा होतो कारण ज्या तीर्थ क्षेत्रांना खूप लोक जातात त्याची अध्यात्मिक क्षमता कमी झालेली असते. म्हणून त्याने कमी फायदा होत असतो. तसेंच ज्या तीर्थक्षेत्री कोणी रहात नाही अशा निर्जन क्षेत्री अध्यात्मिक बळ जास्त असते. जशी मनुष्य वस्ती वाढू लागते त्या तीर्थक्षेत्राचे पावित्र्य कमी होत असते. म्हणून तू अशा तीर्थक्षेत्रे जाशिल जेथे मनुष्य वस्ती नाही. जी निर्जन आहेत आणि जेथे निसर्ग परिपूर्ण आहे. नाही तर सगळी तीर्थक्षेत्रे सारखीच असतात. तीर्थक्षेत्री जाऊन कां एवढा फायदा होतो ते एक रहस्य आहे. कोणालाच ते माहित नाही.

अशारितीने अंगिरसाने गौतमाला तीर्थक्षेत्रांबद्दल सांगितले. अंगिरस सांगतात कीं, त्याना काश्यपाने ते सांगितले होते. अशाप्रकारे ते सगळ्यांना समजले व त्याप्रमाणे सश्रद्ध लोक त्या तीर्थक्षेत्री जाऊ लागले व ती एक परंपरा झाली. अंगिरस सांगतात कीं, कृतयुगात ती तीर्थक्षेत्रे जितकी प्रभावी होती तितकी त्रेतायुगात राहीली नाहीत, त्यापेक्षा द्वापारयुगात आणखीन कमी तेजस्वी आणि कलीयुगात कित्येक तीर्थक्षेत्रे नाममात्र होतील. भिष्म युधिष्ठीराला सांगतात.

अनुशासन पर्व भाग सव्विसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सत्ताविसावा

वैशंपायन पुढे सांगतात, बृहस्पतीच्या बरोबरीचे प्रज्ञावंत, साक्षात ब्रह्मदेव, क्षमाशिल, शक्रासारखे शूर, सूर्याची शक्ती असलेले, गंगापुत्र युद्धात अर्जुनाकडून मारले जातात, आणि ते त्यावेळी शरपंजरी उत्तरायणाची प्रतिक्षा करत पहूडलेले आहेत, तशावेळी युधिष्ठीर त्यांना विविध प्रश्न विचारत आहे इतर पांडवांच्या उपस्थितीत. त्यावेळी अनेक ऋषी सुद्धा त्यांना भेटण्यास येत होते. त्यात अत्री, वसिष्ठ, भृगू, पुलस्त्य, पुलह, क्रातू, अंगिरस, गोतम, अगस्त्य, सुंमत, विश्वामित्र, स्थुलाशिरस, सनवर्त, प्रमथी आणि दम असे कित्येक त्यात होते. त्यांत बृहस्पती, उशानस, व्यास, च्यवन, काश्यप, ध्रूव, दुर्वास, जमदग्नी, मार्कंडेय, गलव, भारद्वाज, रैभ्य, यवकृत, त्रिता, स्थुलकेष, सवलक्ष, कण्व, मेधातिथी, कृष आणि नारद पर्वती बरोबर होते, एकता, द्विता आणि सुधन्व, नितंभू, भूवन, धौम्य, शतनंद, अकृतावर्ण, परशूराम, कच असे बरेच त्यांचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी जमले होते. पांडव त्या ऋषींची रिवाजानुसार वास्तपुस्त करत होते. ते ऋषी भिष्माच्या भोवती बसलेले होते. त्यांच्यात विविध मुद्यांवर चर्चा होत होती. त्यांच्या संभाषणाचा संबंध भिष्मांशी होता. भिष्माला समजते कीं, ते सगळे त्याच्या बद्दल बोलत आहेत. ते समजल्यावर भिष्माला आनंद वाटतो. त्याला तो आधीच स्वर्गात गेला आहे असे वाटू लागते. त्यानंतर ते ऋषी भिष्माची आणि पांडवांची परवानगी घेऊन अंतर्धान पावतात. त्यांच्या जाण्यानंतर सुद्धा पांडव त्यांना वंदन करत असतात. जसे उगवत्या सूर्याकडे पाहून ब्राह्मण मंत्र बोलत पहात असतात त्याप्रमाणे पांडव भिष्माकडे पहात असतात. थोड्या वेळांनी पांडव त्यांच्या आजोबाशी त्या येऊन गेलेल्या ऋषींच्या बद्दल बोलू लागतात.

वैशंपायन पुढे सांगतात, तो भाग झाल्यावर युधिष्ठीर त्याच्या पितामहांच्या पायांना वंदन करून त्याचे प्रश्न विचारण्याची परवानगी मांगतो. त्यातून नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या

ह्या विषयांचा अभ्यास सुरू होतो. युधिष्ठीर विचारतो, अहो पितामहा, मला सांगा कोणते प्रदेश पावित्र्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे"?

भिष्म सांगतात, त्यासाठी मी तुला ते प्राचीन संभाषण सांगतो जे ब्राह्मणांत शील व उच्छ व्रतांबद्दल झाले होते. अरे युधिष्ठीरा, एक ऋषी त्याच्या तपस्येच्या दरम्यान सगळे जग भटकत होता. तो एका गृहस्थाश्रमी विद्वानाच्या घरी येतो जो शील व्रताचे पालन करत होता. तो गृहस्थ त्या ऋषीचे स्वागत करतो. त्या चांगल्या स्वागतामुळें संतुष्ट झालेला ऋषी तेथेच रहाण्याचे ठरवतो. दुसर्या दिवशी तो गृहस्थ त्याचे सगळे सकाळचे विधी उरकून ऋषीला भेटतो. त्यांच्यात वेद, उपनिषद अशा विषयांवर बातचीत सुरू होते. शील व्रताचे पालन करणारा ब्राह्मण ऋषीला बोलतो, त्यात तो हांच प्रश्न त्या भटकणार्या ऋषीला विचारतो जो तू मला विचारत आहेस. तू गरीब ब्राह्मण विचारतो, ऋषी सांगतो, ज्या प्रदेशातून गंगा भागिरथी वहात जाते तो प्रदेश पवित्र समजावा. तो सांगतो कीं असे समजतात कीं, केवळ त्या किनार्यांने रहाणारा मोठी तपस्या, ब्रह्मचर्य, त्याग, यज्ञ असें कांही न करता शुद्धी प्राप्त करत असतो. कारण तो त्या नदीच्या पाण्यात स्नान करतो व ते पाणी पित असतो. पापाचरणी मनुष्य त्या पाण्याच्या प्रभावाने पुण्यमार्गी होतो असे प्राचीन ऋषी समजतात. ज्या माणसाची हाडं त्याच्या मृत्यूनंतर गंगेत बुडवली जातात त्याला जोवर ती हाडं त्या पाण्यात आहेत तोवर तो स्वर्गात रहाता येते. एका पायावर उभे राहून तपस्या करणार्यापेक्षा गंगेचे पाणी पिणारा जास्त पवित्र समजला जातो. असें सांगतात कीं, गंगेच्या पाण्यात स्नान करण्याने त्या माणसाचे त्या दिवशीचे पाप धुतले जाते. अनेक पापी केवळ गंगेच्या पाण्यात स्नान करून स्वर्गात गेले आहेत. देवतांना अमृत त्याप्रमाणे पितरांना स्वाध, नांगाना शुधा तसे माणसासाठी गंगाजल आहे. स्नान करण्यासाठी गंगाजल श्रेष्ठ समजले जाते. गंगाजलाच्या शिंतोड्याने जेथे ते पडतात तो मनुष्य पुण्यवान होतो इतकी त्या पाण्यात शक्ती असते असे बरेच ऋषी सांगतात. स्वर्गातून गंगा खाली येतांना महेश्वराच्या माथ्यावर प्रथम पडते तींच गंगा नंतर पुढे वहात जाते. ती तिनही लोकांत वहात असते जसे, पृथ्वी, स्वर्ग आणि पाताळ. ते तिचे तीन प्रवाह आहेत. स्वर्गातील गंगेच्या पाण्यात ते तेज असते त्याच्यापेक्षा कमी पृथ्वीवर असते व पाताळात त्याहूनही कमी असते. गंगेच्या कृपेने

सागर राजाचे सगळे पुत्र पुन्हा जीवंत झाले होते इतके पावित्र्य त्या काळातील गंगेत होते, कालमानानुसार गंगेचे सामर्थ्य बदलत असते. कलीयुगात ते फार कमी असेल. परंतु कृतयुगात ते पूर्ण होते. पुढे त्रेता युगात ते अर्धे झाले त्यानंतर द्वापारात ते एकचतुर्थ्यांस आणि कलीयुगात त्याच्या पाव इतके कमी असे होत जाईल कारण त्या त्या युगातील अध्यात्मिक शक्ती कमी होत गेलेली असेल. कृतयुगात ते होते कीं, तिच्यात स्नान करणारा त्याचे पाप धुत असें पण ती ताकद कलियुगात रहाणार नाही. गंगेची जी स्तुती केली जाते ती कृतयुगातील आणि त्रेतायुगातील आहे. तो ऋषी त्या ब्राह्मणाला सांगत होता. गंगेचे पापनाशनाचे गुण कृतयुगात पूर्ण होते ते त्रेतायुगात त्याच्या अर्धे झाले आणि द्वापारात त्याहूनही खूप कमी होणार असें तो ऋषी त्या ब्राह्मणाला सांगत असतो. गंगेची जी स्तुती केली जाते ती कृतयुगातील गंगेची असते हे सुद्धा लक्षात घे. कृतयुगात गंगेची पुजा केली तरी ती प्रसन्न होत असें. परंतु, नंतरच्या युगात ते होणार नाही कारण जगात पापाचे साम्राज्य वाढलेले असेल. गंगेने गुहाचा (स्कंध) सांभाळ केला असें सांगतात इतकी ती श्रेष्ठ होती त्या अतिप्राचीन काळी. असे सांगतात की, पंचव्रत पाळणारे गंगेत स्नान करतील तर ते स्वर्गात जातील कलियुगातसुद्धा. आदि काळापासून गंगेच्या किनारी असंख्य तपस्व्यानी ध्यानसाधना केली असल्याने तिच्या भोवती अध्यात्मिकतेची प्रभावळ असते त्या प्रभावळीचा फायदा नंतरच्या तपस्व्यांना होत असतो. असें समजले जाते कीं, गंगेच्या किनारी ज्याचा अंत्यविधी होतो तो स्वर्गात जातो. परंतु, कलियुगात ती एकाद्या सामान्य नदीसारखी होईल. अशारितीने तो ऋषी त्या शील व्रतात असलेल्या गरीब ब्राह्मणाला गंगेची महति सांगतो. त्यानंतर तो ब्राह्मण गंगेची प्रार्थना करून मोठ्या अध्यात्मिक योग्यतेला पोहोचतो. असें भिष्म युधिष्ठीराला सांगतो. वैशंपायन पुढे सांगतात, ते गंगा आख्यान जे ऐकतात व जे ऐकवतात त्याना सद्‌गति प्राप्त होते.

अनुशासन पर्व भाग सत्ताविसावा संपला.

*शील व उच्छ व्रतात शेतात पडलेले धान्य वेचून ते खाऊन निर्वाह करण्याचा असे असते. उच्छ मध्ये शेतातून वेचण्याचा उल्लेख असतो व शील म्हणजे दररोज धान्य वेचावयाचे असते त्याचा उद्यासाठी साठा करावयाचा नसतो असे असते.*

# अनुशासन पर्व

## भाग अठ्ठाविसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, अहो पितामहा, आपण सर्वगुणसंपन्न अहात हे सगळे जाणतात, म्हणून मला सांगा, "क्षत्रिय, वैष्य अथवा शुद्र काय केल्याने ब्राह्मण वर्णात जाऊ शकतो? आपल्यापेक्षा योग्य कोणी नाही जो ह्या विषयावर अधिकार वाणीने बोलू शकेल. त्याने काय केले म्हणजे तो त्याच्यापेक्षा उच्च वर्णात गणला जाईल त्याच जन्मात"?

भिष्म बोलतात, "साधारणपणे ब्राह्मण वर्णाला त्याच जन्मात जाणे कोणत्याही इतर वर्णाच्या माणसास शक्य नसते. अनेक जन्माच्या फेर्या झाल्यानंतर अखेरीस आत्मा ब्राह्मण जन्मात येतो. त्याबद्दलचे किस्सा मी तुला सांगतो, ते एक संभाषण आहे एका मातंग आणि गाढविणीमधील. त्याचे असे झाले कोण्या एके काळी एका ब्राह्मणाला एक मुलगा मिळतो. तो अन्य वर्णात जन्मला होता परंतु, जातकर्माच्या विधीने तो ब्राह्मण समजला गेला होता. त्या बालकाचे नांव होते मांतंग. तो त्याच्या ब्राह्मण पित्यासारखा विद्वान झाला होता. त्याचा बाप त्याला कांहीं सामुग्री आणण्यास सांगतो. तो त्या गोष्टी जमा करण्यासाठी निघतो. त्यासाठी तो त्याची गाडी काढतो व वेगांने निघतो. परंतु, त्या गाडीला जुंपलेला गाढव वयाने लहान असतो. ते गाढव मातंगाच्या सुचनेप्रमाणे न जाता भलती कडेच जातो. ते बाल गाढव त्याच्या आई कडे गाडी खेचून नेते असते. ते पाहून मातंग चिडतो आणि त्या लहानग्या गाढवाला मारू लागतो. त्यामुळे मार खाललेला तो चेहरा पाहून त्याची आई कळवळते. ती आपल्या बालकाला सांगते, अरे माझ्या बाळा, दुःख करू नकोस. तुझा चालक एक चांडाळ आहे. त्याच्याकडून दुसरे कांहीं अपेक्षिता येणार नाही. तो ब्राह्मण नाही कारण जर ब्राह्मण असता तर तो तुला अशारितीने मारत गेला नसता. कारण खरा ब्राह्मण सगळ्या प्राण्यांशी मायेने वागतो. खरा ब्राह्मण अशारितीने दुष्टपणा कधीच करत नाही. दुष्टपणा, द्वेषभाव, मत्सर, क्रौर्य ही चांडाळाची लक्षणं असतात. खर्या ब्राह्मणांत ते शक्य नाही. त्या तुझ्या गाडीच्या चालकाचा खरा वर्ण त्याच्या वर्तणूकीने स्पष्ट होत आहे. त्या मातेचे ते उद्गार ऐकल्यावर मातंग गाडीतून उतरतो व तिला विचारतो, "अहो गाढवी, मला सांगा, तुला कसे

समजले कीं माझी माता ब्राह्मण नाही आणि मी चांडाळ आहे? माझा ब्राह्मण दर्जा असा कसा नष्ट झाला ते सांग"?

गाढविण सांगते, एका ब्राह्मण स्त्रीशी एका शुद्राने जो न्हावी होता संबंध घेतल्याने तू जन्मला आलास. इतर वर्णाच्या बाईला शुद्रापासून जी संतति होते त्या संततिला चांडाळ समजले जाते. म्हणून तू चांडाळ आहेस. म्हणून जरी तू सगळ्या विद्या आत्मसात केल्या असल्या तरी तुझे बीज नीच आहे त्यामुळे त्या सगळ्या विद्या व्यर्थ ठरल्या आहेत. तुझ्यातील शुद्र अजून शाबूत आहे. कारण तुझ्या वागण्याने तू दाखवून दिले आहेस कीं, तू पंचव्रत आचरत नाहीस.

ते ऐकून मातंग घरी जातो. त्याला परत आलेले पाहून त्याचा बाप त्याला विचारतो, "तुला जे काम दिले होते ते तू केलेस कां? ती सामुग्री तू कां नाही आणलीस? त्याशिवाय तू असा कां आलास? तुझी तब्यात बिघडली आहे कां"?

मातंग सांगतो, "अहो तात, ज्याच्या जातीपातीचा पत्ता नाही अशा माणसाकडून आपण काय अपेक्षा करता"? ज्याची माता भ्रष्ट झाली आहे, मला ते त्या माणसाची वाणी बोलणार्या एका गाढविणीने सांगितले कीं, मी शुद्राचा मुलगा ब्राह्मणाच्या घरात वाढलेला आहे. ते खरे असेल तर मी ताबडतोब कठोर प्रायश्चित्ताची तपस्या करण्यासाठी जाणार आहे. असे बोलून तो मातंग घोर तपस्या करण्यासाठी अरण्यात निघून जातो. यथावकाश तो त्याचे तप पूर्ण करून ब्राह्मण पदी जाऊ लागतो. त्यानंतर तो त्या देवतांना त्रास देऊ लागतो ज्यांच्यामुळे त्याला हा जन्म घ्यावा लागला होता. त्याचे कठोर तप पाहून देवतांचा राजा इंद्र त्याच्या देवतांना वाचवण्यासाठी मातंगाला भेटतो व बोलतो कीं, तो ते तप थांबवून मनुष्याचे जे अनेक सुखोपभोग आहेत ते घेऊन सार्थकी व्हावे. त्याकरता इंद्र त्याला कांहीं वर देण्याचे सुद्धा आमिष देतो. तुला कोणती सुख भोगण्याची इच्छा आहे ते सांग. कितीही मुष्कील असली तरी ती मी तुला देण्याचे आशिर्वाद देतो असे इंद्र बोलतो मातंगाला. त्वरेने मांग तुला काय पाहिजे ते असें इंद्र त्याला पुन्हा पुन्हा बोलतो.

मातंग त्याला बोलतो, "ब्राह्मण पदाच्या प्राप्तीसाठी मी हे घोर तप आरंभिले आहे. ते प्राप्त झाल्याशिवाय मी ते थांबवणार नाही त्यानंतरच मी ते थांबवीन. जर तो आशिर्वाद तू देऊ शकत असशिल तर बोल".

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकून पुरंदर त्याला बोलतो, ब्राह्मण दर्जा तुला ह्याच जन्मात असा मिळणार नाही. कारण अशुद्ध रक्ताच्या इसमाला तो दर्जा प्राप्त होत नाही. तू आतताईपणे ते तप करत राहीलास तर नाहक नष्ट मात्र होशिल. परंतु, पुढच्या जन्मी ते ब्राह्मणपद तुला मिळू शकते, ह्या जन्मी ते शक्य नाही. ह्या जन्मात तू तुझ्या जन्माच्या वर्णातच रहाणार आहेस.

अनुशासन पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणतिसावा

भिष्म पुढे सांगतात, इंद्राचे ते बोल ऐकूनसुद्धा मातंग त्याचे तप चालू ठेवतो. एक शंभर वर्ष तो ते तप एका पायावर उभे राहून करत असतो. त्यानंतर पुन्हा शक्र येतो व त्याला ताकीद देतो कीं, त्याच्या तशा तपाने त्याला ब्राह्मणपद मिळणार नाही, नाहक मारला जाशिल असें शक्र त्याला पुन्हा सांगतो. असा आततताईपणा योग्य नाही. अरे मूर्खा, ही पद्धत नाही ब्राह्मण होण्याची. इंद्र परोपरीने सांगत असतो. इंद्र मातंगाला सांगतो पशूमधून मनुष्य होण्यासाठी व त्यात चांडाळ अथवा त्या प्रकारच्या तमोगुणी नीच कुळात जन्मण्यासाठी शेकडो जन्म जातात. त्यानंतर जर त्या जन्मात काही प्रगती झाली तर शुद्रात त्याचा जन्म होतो. असे हजार जन्म झाल्यानंतर तो वैश्य कुळात (रजोगुणी) जन्म घेतो, त्यात कांहीं प्रगती झाली तर तशा अनेक जन्मानंतर तो क्षत्रिय कुळात जन्म घेत असतो. त्यात कांहीं प्रगती करत असेल व रजो-सत्त्व गुणात तो गेला आहे व त्याच अवस्थेत कशाप्रकारची प्रगती करत आहे ते ब्रह्मा पाहून त्यानंतर उच्च कुलिन क्षत्रियात तो जन्म घेऊ लागतो. अशा सगळ्या जन्मात हजारो वर्षे जातात. त्यानंतर त्या अंतरात्म्याला ब्राह्मण कुळात जन्म मिळतो अशी साधारण व्यवस्था असते. तो ब्राह्मण भिक्षेकरी असतो (खालच्या पातळीचा ब्राह्मण). असे अनेक जन्म झाल्यानंतर तो गायत्री जपणार्या ब्राह्मणात जन्म घेतो. त्या कुळांत चारशे जन्म झाल्यानंतर तो उच्चकुलिन ब्राह्मण कुळात जन्म घेतो जो वेदांचा व्यासंग करू शकतो. त्या अनेक जन्मात लोभ, मोह, क्रोध अशा र्हास करणार्या वासनांच्या प्रभावामुळें तो सरळ प्रगती करत नाही तर कधी वरच्या पुन्हा खालच्या अशा कुळात तो वर खाली करत त्यातच रेंगाळत असतो त्यात किती जन्म जातात त्याचा पत्ता नसतो. जर त्या सगळ्या जन्मात तो पंचव्रताचे पालन करत असेल तर ठीक, नाहीतर त्याचा पुन्हा र्हास होऊन तो कदाचित पुन्हा शुद्र होण्याची शक्यता असते. इंद्र असें घाबरवणारे सगळे अंदाज मातंगाला सांगत असतो. त्याची अपेक्षा असते कीं, त्यामुळे मातंग घाबरून त्याची

तपस्या बंद करील. पुढे तो देवांचा राजा त्याला सांगतो कीं, त्यापेक्षा तो दुसरा कांहीं आशिर्वाद मागेल तर बरे होईल. परंतु, त्यात इंद्र त्या गोष्टीवर कांहीं बोलत नाही तो मुद्दा असा कीं, मातंग जरी जन्माने चांडाळ असला तरी त्या जन्मात तो कर्माने ब्राह्मण ठरत होता. गुणकर्म विभागशः ह्या नियमांने त्याचे ब्राह्मणत्व ब्रह्माने स्वीकारावयास पाहिजे पण ते होत नाही. त्याचे स्पष्टीकरण तो शक्र देत नव्हता. अशा कोणत्या त्याच्या गतकर्मामुळें तो त्या ब्राह्मणाचा मुलगा ठरला होता व वेदांचा अभ्यास सुद्धा केला होता. असें जर एकादा चांडाळ करू शकत असेल तर त्याचा अर्थ होतो कीं, जी माहिती शक्राने दिली ती केवळ मातंगाला घाबरवण्यासाठी होती हे तो मातंग समजतो व तो इंद्राच्या बतावण्यात येत नाही. इंद्राचा मातंगाला तपस्या करण्यापासून रोकण्याचा प्रयत्न साध्य होत नाही.

अनुशासन पर्व भाग एकोणतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग तिसावा

भिष्म पुढे सांगतात, इंद्राचे सांगणे मातंग नजरअंदाज करतो. त्याचे आशिर्वादाचे आमिष त्याला आकर्षित करू शकत नाही. त्याचा ह्याच जन्मात ब्राह्मण सिद्ध करण्याचा संकल्प तो सोडण्यास तयार नसतो. इंद्र त्याचा नाद सोडतो आणि त्यानंतर मातंग एका पायावर उभे राहून ध्यानसाधना करण्यास सुरूवात करतो. एक हजार वर्षे तो ती साधना करत असतो. त्याचे योग साधना उत्कर्षाला पोहोचते. एक हजार वर्षानंतर इंद्र पुन्हा त्याला भेटण्यास येतो. पुन्हा तो तेंच बोलतो. तेव्हां मातंग त्याला बोलतो, "एक हजार वर्षे मी हे घोर तप ब्रह्मचर्य पाळत करत आहे तरी मला ब्राह्मणाचा वर्ण ब्रह्माने मान्य केला नाही, मिळाला नाही हे खरे आहे".

शक्र त्याला बोलतो, "चांडाळ कांहींही केले तरी त्या जन्मात ब्राह्मण होऊ शकत नाहीत. असे ब्रह्मदेवाचे विधान आहे. त्यात बदल होत नाही. म्हणून तू कांहीं इतर वर मांग ह्या तपस्येच्या बदल्यात म्हणजे तुला कांहीतरी मिळाल्याचे समाधान प्राप्त होईल. मातंग ते ऐकून फार दुःखी होतो. तो प्रयाग तिर्थी जातो. तेथे एक शतक एका पायावर उभा राहून जपयज्ञ करतो. तो योग त्याच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम करतो. त्याचे शरीर हाडमांस होते, शरीर सुजलेले असते. असें सांगतात कीं, तो ऋषी मातंग एक दिवस खाली कोसळतो. वसवा ते पहातो. त्याला त्याची दया येते. तो तेथे लागलीच जातो व त्याला धरतो. शक्र त्याला बोलतो, ज्या ब्राह्मण होण्याचा तू प्रयत्न करत आहेस तो तुझा संकल्प तुला झेपत नाही. त्यामुळे तू अनेक प्रकारच्या आपत्तीत गेला आहेस. त्यासाठी तू आता जर तुझे जीवन संपुष्टात आणलेस तर पुढच्या जन्मी तू उच्च ब्राह्मण कुळात जन्म घेशिल. म्हणून तू तो नाद सोडून दे व इतर कोणता तरी आशिर्वाद घेऊन त्यात समाधान मान.

मातंग त्याला बोलतो, "मी फार दुःखी झालो आहे, अशात असे बोलून तू मला आणखीन त्रास देत आहेस. हे तुझे वागणे तुला तू ब्राह्मण असूनही कसे शोभते ते मला समजत नाही. आपण शंभर यज्ञ केले आहेत, तू सांगतोस कीं, इतर तीन वर्णाचे

कांहीं केले तरी त्यांच्या त्या जन्मात ब्राह्मण होऊ शकत नाहीत. ब्राह्मणाचा दर्जा मिळणे अवघड असते आणि तो मिळाल्यावर टीकवणे तितकेच अवघड असते. कित्येक वेळा कांहीं तो दर्जा सांभाळू शकत नाहीत. तरी ते ब्राह्मण समजले जातात जे अयोग्य आहे आणि मी येथे तप करून सुद्धा मला तो वर्ण मिळत नाही, जरी मी ब्राह्मणाचे सगळे कर्तव्य पार पाडत आहे. हा कोणता न्याय आहे ब्रह्मदेवाचा? एवढी तपस्या करूनही ते मला प्राप्त होत नाही हा ब्रह्मदेवाच्या राज्यातला अन्याय आहे. मातंग त्याची नाराजी व्यक्त करत असतो. माझ्या मातेच्या चुकीमुळें मी चांडाळ जन्मलो आहे त्यात माझा काय दोष"? आपल्या कर्माने आपले प्रारब्ध आपण बदलू शकत नाही. परंतु, त्या कर्माने तू पुढील जन्म ठरवू शकतोस ही रचना मला दुःखी करत आहे. पण ती नित्य आहे त्या नियमात बदल होणार नाही. असें आहे तेव्हां तू सांगतोस तर मला दुसरा कोणता आशिर्वाद दे आणि माझ्या तपस्येचे फळ मिळू दे. त्या नंतर मातंग त्याचा आशिर्वाद मांगतो.

भिष्म सांगतात, तो मांगतो कीं, त्याला कोणतेही रुप घेण्याची सिद्धी पाहिजे, त्याशिवाय कोठेही संचार करण्याची सिद्धी पाहिजे, मला जे सुखभोग पाहिजेत ते मिळाले पाहिजेत. मला किर्ती प्राप्त हो, पुरंदराकडे तो तसा आशिर्वाद मांगतो. शक्र बोलतो, "तू तुझ्या तपस्येने जे पुण्य जमवले आहेस त्या प्रमाणे तू एक देवता बनणार आहेस, त्याप्रमाणे तुला त्या सगळ्या सिद्धी प्राप्त होणार आहेत. त्याशिवाय स्त्रिया तुझी नेहमी भक्ती करतील".

असा आशिर्वाद देऊन इंद्र नाहीसा होतो.

मातंगसुद्धा त्याचे थकलेले शरीर टाकतो. त्याबरोबर तो त्या देवतेच्या जागी जे स्वर्गात असते जातो.

भिष्म युधिष्ठीराला सांगतो कीं, ब्राह्मणाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी अनेक जन्माचे पुण्य असावे लागते.

अनुशासन पर्व भाग तिसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकतिसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, ही कथा मी आधीसुद्धा ऐकलेली आहे. आपण नेहमी सांगता कीं, ब्राह्मणाचा वर्ण मिळणे फार अवघड असते परंतु, विश्वामित्र ब्राह्मण वर्णात जातात तसेंच फार प्राचीन काळी राजा वितहव्य सुद्धा तसांच क्षत्रिय झाला होता. असे काय केले त्यांने म्हणून तो ब्राह्मण झाला ते सांगा. कोणाच्या आशिर्वादाने ते घडले कीं, त्यांने तपस्या केली म्हणून ते घडले ते मला समजून घ्यावयाचे आहे.

भिष्म सांगतात, ऐक मी तुला ते सगळे सांगतो, राजर्षी वितहव्य त्या प्राचीन काळी ब्राह्मण वर्णात कसा आला. जेव्हां मनू सदाचाराने त्याचे राज्य करत असतांना त्याला एक पुत्र होतो. त्याचे नांव शर्यती होते. त्याच्या घराण्यात दोन राजे जन्म घेतात. एकाचे नांव होते हैहय आणि दुसर्याचे होते तलजंघ. ते दोघे वत्साचे मुलगे होते. त्यातील हैहयाला दहा बायका होत्या त्यांपासून त्याला शंभर पुत्र झाले. ते सगळे महान योद्धे होते. ते सगळे एकासारखे दिसत होते. त्या सगळ्यांचे रणकौशल्य विलक्षण होते. त्यांचा वेदाचा व्यासंग मोठा होता आणि त्यांचे शस्त्रांचे ज्ञान उत्तम होते. त्याच सुमारास काशीमध्ये देवोदासचा आजोबा जो मोठा पराक्रमी राजा राज्य करत होता, ज्याचे नांव हरयस्व होते. राजा हैहयाचे, ज्याला कांहीं वितहव्य असें सांगतात, मुलगे काशीवर स्वारी करतात. ते त्या गंगा आणि यमुना ह्यांच्या खोर्यात त्यांची मुलूखगिरी (लुटमार करणे) वाढवतात. त्या लढाईत ते राजा हरयस्वचा वध करतात. अशारितीने जिंकलेले ते हैहयाचे मुलगे त्यांच्या राजधानीकडे, वित्सास जातात. त्यावेळी हरयस्वाचा मुलगा सुदेव जो देवांसारखा तेजस्वी होता आणि सदाचाराचा साक्षात्कार होता, काशीचा राजा झाला. तो कांहीं काळ उत्तम राज्य करत असतांना वितहव्याचे शंभर पुत्र काशीवर स्वारी करतात तेथे सुदेवाचा ते पराभव करतात आणि लुटमार करून आपल्या राजधानीकडे परत जातात. त्यानंतर सुदेवाचा मुलगा देवोदास काशीच्या गादीवर बसतो. वितहव्याच्या मुलांचे शौर्य पाहून देवोदास इंद्राच्या मदतीने काशी भोवती कोट भिंत उभी करतो. काशीमध्ये ब्राह्मणांची वस्ती प्रामुख्याने होती. त्याशिवाय क्षत्रिय

आणि वैश्य व शुद्र सुद्धा होते. ते सगळ्या साधन सामुग्रीने सज्ज होते. काशी फार समृद्ध शहर होते. त्या शहराच्या सीमा गंगेपासून गोमतीपर्यंत पसरलेल्या होत्या. कालांतराने हैहय पुन्हा एकदा त्या राज्यावर चाल करण्याचे ठरवतात लुटमार करण्यासाठी. देवोदास त्यांना चोख उत्तर देतो. ते युद्ध देव आणि असुरांच्या युद्धासारखे भीषण होते. ते युद्ध एक हजार दिवस चालते. परंतु, त्या सुमारास देवोदासाचा खजिना संपून जातो. त्यामुळे तो त्याचे राज्य सोडून पळून जातो. तो भारद्वाज ऋषीच्या आश्रमात आश्रय घेतो. भारद्वाज देवोदासचे मुख्य पुरोहित होते त्याला बोलतात, "अरे राजा, मला सांग काय झाले आहे. असें काय झाले कीं तू माझ्या आश्रयाला आला आहेस"? मी तुझासाठी जे योग्य ते करण्यास तयार आहे. राजा देवोदास सांगतो, "वितहव्याच्या मुलांनी माझे सगळे मुलगे आणि आप्त मारले आहेत. मी माझा जीव घेऊन येथे पळून आलो आहे. माझा सर्वनाश माझ्या शत्रूंनी केला आहे. म्हणून मी आपल्या संरक्षणात आलो आहे. आपण आपल्या शिष्याला जे संरक्षण देता तसे मला द्या. त्या वितहव्याच्या मुलांनी माझा सगळा वंश मारला आहे. फक्त मी जीवंत आहे".

भिष्म पुढे सांगतात, "त्याची दयनीय अवस्था पाहून भारद्वाजांना फार वाईट वाटते. ते त्याला बोलतात कीं, "घाबरू नकोस, सुदेवाच्या मुला, मी एक यज्ञ करतो त्यामुळें तुला असा पुत्र प्राप्त होईल जो तुझ्या शत्रूचा सर्वनाश करून टाकील. त्यानंतर ऋषी एक यज्ञ करतात देवोदासाला पुत्र व्हावा म्हणून. त्यामुळे देवोदासला एक पुत्र त्या यज्ञातून होतो. त्याचे नांव होते प्रतर्दन. जन्माबरोबर तो प्रतर्दन तेरा वर्षाच्या मुलासारखा मोठा होतो. क्षणार्धात सगळे वेद आत्मसात करतो. सगळी शस्त्रविद्या आत्मसात करतो. त्यानंतर भारद्वाज त्यांच्या योगीक सामर्थ्याने त्या मुलांत शिरतात. प्रतर्दनाच्या अंगात सगळी शक्ती ते ओततात. तो प्रतर्दन त्याच्या रथात चढतो. तो त्याच्या पित्या पुढे जातो, त्याला पाहून देवोदासाला आनंद होतो. त्यानंतर देवोदास त्याला त्याचा उत्तराधिकारी म्हणून घोषित करतो. त्यानंतर तो वितहव्याच्या मुलांना ठार मारण्यासाठी निघतो.

प्रतर्दन गंगा ओलांडून वितहव्यांच्या प्रदेशात जातो. ते समजल्यावर वितहव्याची मुलं त्यांचे शस्त्र घेऊन त्याच्या कडे निघतात. त्यांच्यात युद्ध सुरू होते. त्या युद्धात मायावी शक्ती असलेला प्रतर्दन वितहव्याच्या सगळ्या मुलांचा नाश करतो. त्यांची डोकी उडालेली दिसत होती. त्या समरांगणात वितहव्याच्या मुलांची डोकी पडलेली दिसत होती. ते पाहून वितहव्य तेथून पळून जातो. तो भृगूच्या आश्रयाला जातो कारण भृगू त्याचे पुरोहीत असतात. भृगू त्याला संरक्षण देतात. त्यावेळी तेथे प्रतर्दन त्याच्या रथाने पोहोचतो व भृगूला सांगतो कीं, तो वितहव्याला त्याच्या हवाली करेल. त्याने माझा वंश नष्ट केला आहे म्हणून मी त्याला मारण्यासाठी आलो आहे. मी त्याची सगळी शंभर मुलं डोकी उडवून ठार मारली आहेत. आता त्याची पाळी आहे तर त्याला माझ्या हवाली करावे. त्याचा वध करून मी माझ्या पितरांचे ऋण फेडणार आहे.

ते ऐकून भारद्वाज मोठ्या सावधगिरीने व कृपाळूपणाचा आव आणत प्रतर्दनाला सांगतो कीं, त्याच्याकडे कोणी क्षत्रिय नाही येथे फक्त ब्राह्मण आहेत. ते ऐकून प्रतर्दन भृगूच्या पाया पडतो. तो बोलतो मी धन्य झालो आहे कारण माझ्या भयाने त्याने (वितहव्याने) त्याचा वर्ण बदलला तेसुद्धा आपल्या कृपेने ह्यासारखे मोठं श्रेय मला नाही. आता मला जाण्याची परवानगी द्या असे प्रतर्दन भृगूला बोलतो. तो त्याचा काशीकडे जातो. वितहव्य भृगूच्या आदेशाने ब्राह्मण झाला, तसा तो ब्राह्मणांचे सगळे संस्कार स्वीकारतो.

त्यानंतर त्याचा उरलेला एक पुत्र असतो तोसुद्धा ब्राह्मण होतो त्याचे नांव गृत्समद जो इंद्रासारखा तेजस्वी होता. त्याच्या नांवाने एक ऋचा आहे ती सांगते, जे गृत्समदा बरोबर रहातात, त्याला सगळे ब्राह्मण सन्मानाने वागवतात. त्याच्या प्रज्ञेने तो सगळ्या ब्राह्मणांत श्रेष्ठ ठरतो. गृत्समद ब्राह्मणांची परंपरा पुढे चालवतो. त्याचा मुलगा सुतेज त्याचा मुलगा वर्च, त्याचा मुलगा विहव्य, त्याचा मुलगा वितत्य, त्याचा मुलगा सत्य, त्याचा मुलगा शांत, त्याचा मुलगा श्रवस, त्याचा मुलगा तम, त्याचा मुलगा प्रकाश, त्याचा मुलगा वगिंद्र, त्याचा मुलगा प्रमती, त्याचा घृताची पासून झालेला मुलगा ऋऋ अशी त्यांची वंशावळ मी सांगितली. त्यातील वगिंद्र मंत्र विद्येत मोठा पारंगत होता. ऋऋ पासून शुनक झाले अशी त्यांची वंशावळ झाली जी शुद्ध ब्राह्मणी समजली जाते जरी

त्यांचा पूर्वज क्षत्रिय होता. वसिष्ठाचा द्वेष करण्याच्या दोषामुळे विश्वामित्रास ब्राह्मणपदासाठी जशी घोर तपस्या करावी लागली तशी वितहव्यास करावी लागली नाही, भृगूंच्या कृपेने तो ब्राह्मण झाला होता. कारण भृगू त्यांच्या घराण्याचे पुरोहित होते.

आणखीन काय मी तुला सांगू ते बोल.

अनुशासन पर्व भाग एकतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बत्तिसावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामहा, मला सांगा तिनही जगात वंदनीय असे कोण आहेत"?

भिष्म सांगतात, ते समजण्यासाठी मी तुला पूर्वी झालेले नारद आणि वासुदेव ह्यांच्यातील संभाषण सांगतो. एकदा वासुदेव पहातात कीं, नारद एका प्रसंगी अनेक जमलेल्या ब्राह्मणांना आदर पूर्वकपणे प्रणाम करत असतात. ते पाहून वासुदेव नारदाला विचारतो, "ह्यांपैकी कोणाला आपण विशेष मानता? जर मला ते सांगण्यास आपण तयार असाल तर सांगा".

नारद सांगतात, अहो गोविंदा, मी सांगतो कोणाला मी जास्त मानतो. मी साधारणपणे सगळ्या ब्राह्मणांना मानतो. विशेष करून जे सदैव वरूण, वायू, पर्जन्य, अग्नी आणि आदित्य ह्यांची आराधना करतात. ते पंचमहाभूतात आहेत त्याशिवाय स्थानू, स्कंध, लक्ष्मी, विष्णू, ब्राह्मण जे वाचस्पति आहेत, त्यानंतर चंद्रमा, सरस्वती ह्या देवतांची आराधना करणारे माझ्या दृष्टीने पुज्य आहेत. जे तपस्या करतात, जे वेदाचा व्यासंग करतात ते माझ्यामते पुज्य आहेत. जे निगर्वी आहेत, जे उपाशी राहून देवतांची पुजा करतात, जे क्षमाशिल आहेत, जे यज्ञ करतात, ज्यांचे त्यांच्या इंद्रीयांवर नियंत्रण आहे. जे पंचव्रत पाळतात, जे ब्राह्मणांना मोठी दानं करतात, त्यांचा मी आदर करतो, जे वनात राहून तपस्या करतात, जे कंदमुळांवर व फळांवर गुजराण करतात. जे शील वृत्तीने रहातात (भविष्यासाठी साठा न करता दररोज धान्य गोळा करणे अथवा भीक मागणे असे रहाणे, ह्याला शील व्रत म्हणतात), जे धर्मशास्त्रां प्रमाणे जगतात, नेहमी अतिथींचे स्वागत करतात. जे त्यांच्या कनिष्ठांचा सन्मान करतात, त्यांचे म्हणणे ऐकून घेतात. जे देवतेला दिलेला प्रसाद फक्त खातात. जे ब्राह्मचर्य पालन (सगळ्या स्त्रियांत माती, भगिनी आणि कन्या पहाणे आणि वैषयिक वासनांबद्दल औदासिन्य बाळगणे म्हणजे ब्राह्मचर्य व्रत.) करतात, जे शिष्यांना शिकवतात, जे त्यांच्या गुरूचा सन्मान करतात. जे षड्रीपूंपासून सावध रहातात. खरे बोलतात, जे गाईचा मांसाहार

करतात, जे भिक्षा मागून जगतात, ज्याना शरीराच्या सुखांबद्दल औदासिन्य आले आहे. ज्यांना धन दौलत जमा करण्याचा शोक नाही. जे कोणाशी भांडत नाहीत. जे मुक्या प्राण्याची सेवा करण्यात आनंद मानतात. जे देवतांची आराधना करतात, जे उच्छ व्रत (शेतात सांडलेले धान्य वेचून त्यावर गुजराण करणे) पाळतात. जे केवळ पाण्यावर रहातात, हवेवर रहातात ते मला प्रिय आहेत. जे अविवाहीत आहेत. जे पवित्र अग्नी सांभाळतात. जे सगळ्या देवतांचा सारखांच सन्मान करतात. एवढे सांगून नारद गप्प झाले.

भिष्म युधिष्ठीराला सांगतात त्यासाठी तू सुद्धा सगळ्या देवतांची, पितरांची, ब्राह्मणांची अतिथींची सन्मानपूर्वक सेवा करण्याचे धोरण ठेव. असे वागल्याने तुझे कल्याण होईल.

अनुशासन पर्व भाग बत्तिसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग तेहतिसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "भूतदया आणि कर्तव्य ह्यांची सांगड कशी घातली जाते त्याचे एक उदाहरण मला सांगा". जर कोणी मुक्या प्राण्याला संरक्षण दिले तर त्याचा त्याला काय फायदा होतो त्याचे उदाहरण असेल तर ते सांगा.

भिष्म सांगतात, एक प्राचीन किस्सा सांगतो, एकदा एक कबुतर घाबरलेल्या अवस्थेत राजा वृषदर्भाच्या मांडीवर येऊन बसते. ते राजाला सांगते कीं, ते ससाणा मला खाण्यासाठी आला आहे. मला आपण संरक्षण द्या.

राजा त्याला सांगतो कीं, तो आता राजाच्या संरक्षणात आला आहे त्याला कोणी मारू शकणार नाही. तो आता पूर्णतया सुरक्षित आहे त्याच्या जवळ. राजा वृषदर्भ त्याला अभय देतो. असे तो काशीचा राजा त्या कबुतराला आश्वासन देतो. त्यावेळी तो ससाणा तेथे येतो व राजाला सांगतो कीं, विधीच्या रचनेनुसार हे कबुतर माझे खाद्य आहे म्हणून त्याला माझ्या हवाली करा. मला फार भूक लागली आहे. माझे खाद्य माझ्या कडून काढून आपण मोठे पाप करत अहात, मी मोठ्या मेहनतीने त्याला पकडले आहे परंतु, तो थोडक्यात निसटला व आपल्या कडे गेला आहे. त्याला माझ्या हवाली करण्यातच खरा धर्म होईल कारण ते माझे विधीलिखीत खाद्य आहे. राजा त्याला सांगतो कीं त्याला मी अभय दिले आहे व त्यानंतर तू आला आहेस म्हणून मी आता त्या कबुतराला तुझ्या हवाली करणार नाही. त्यापेक्षा जास्त चांगले मांस मी तुला देण्यास तयार आहे जे ताजे आणि कोवळ्या बैलाचे आहे. ते घे आणि निघून जा.

ससाणा सांगतो कीं, तो त्या प्राण्याचे मांस खाणारा नाही. ते माझे विधीने ठरवलेले खाद्य नाही असे बोलून तो ससाणा त्या कबुतराच्या परत देण्याची मागणी करत रहातो. तो सागतो कीं, जर लागलीच त्याला ते कबुतर खाण्यास नाही मिळाले तर तो मरून जाईल व त्याचे पातक राजाला लागेल. ससाणा त्याला बोलतो कीं, तो माणसांचा राजा आहे आणि पक्षाच्या कारभारात त्याने लक्ष घालणे नितीशास्त्राच्या विरुद्ध आहे. त्यांला

माणसांना जे संरक्षण द्यावयाचे ते द्यावे आणि आम्हा पक्ष्यांच्या कामात लक्ष घालू नये. हे तुझे वागणे निसर्गाच्या नियमांविरुद्ध आहे. तरी तो आग्रह सोडून ते कबुतर तो त्यास देऊन टाकील तर ते योग्य होईल. परंतु जर तुला त्या कबुतराला अभय देण्याची एवढी इच्छा आहे तर मला त्याच्या बदल्यात तुझ्या अंगाचे मांस काढून दे.

ते ऐकल्यावर राजा त्यास तयार होतो. एका तागड्यात कबुतर आणि दुसर्यामध्ये त्याचे मांस ठेवून तोलास मोल इतके राजा त्याचे मांस देण्यास तयार होतो.

राजा त्याच्या अंगाचे मांस काढून तागड्यात ठेवत असतो परंतु, त्याने कितीही मांस ठेवले तरी ते कबुतराच्या वजना इतके होत नव्हते.

तेथे राजवाड्यात त्याच्या राण्यांमध्ये एकच गोंधळ उडतो परंतु, शपथेला बांधलेला वृषदर्भ त्याच्या अंगाचे मांस काढून तागड्यात ठेवण्याचे थांबवत नाही. त्याचे सगळे मांस निघाले तरी त्या मांसाने तागडे खाली होत नाही. राजाच्या त्या भूतदया आणि कर्तव्यदक्षता ह्यांची जणू परीक्षा होत होती. राजा त्याच्या रक्ताने माखला होता. ते देवांचा राजा इंद्र पहात होता. इंद्र त्याचे दैवी लोक घेऊन राजाचे कौतुक करू लागतात, स्वर्गातून दैवी वाद्ये वाजू लागतात. इंद्र वृषदर्भाला अमृताने स्नान घालतो त्यामुळें त्याला नवीन देह प्राप्त होतो आणि त्याला स्वर्गीय फुलांच्या माळा गळ्यात घालतो. त्याचे सगळे देव, गंधर्व, अप्सरा गुणगान करू लागतात. अखेरीस ब्रह्मदेव तेथे येतात. ते त्यांच्या रथातून राजाला स्वर्गात घेऊन जातात. त्यालाच पुढे सिवी राजा असे पुराणात सांगितले आहे. त्याच्या भूतदयेचे गोडवे सगळ्या स्वर्गात आणि पृथ्वीवर गाईले जात आहेत. तो काशीचा राजा त्याच्या दानशूरपणाबद्दल ख्यातनाम झाला. तिनही जगात त्याचा बोलाबाला झाला. शरणागताच्या संरक्षणार्थ राजा कोठल्या थराला गेला पाहिजे त्याचे उदाहरण सिवीने दाखवले होते. ही आख्यायिका ऐकणारे व सांगणारे त्यांच्या पापातून मुक्त होतात असे सांगतात.

अनुशासन पर्व भाग तेहतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग चौतिसावा

युधिष्ठीर विचारतो, "राजाच्या कोणत्या कामामुळे त्याचे ह्या आणि पुढच्या जीवनाचे सार्थक होते त्या बद्दल सांगा".

भिष्म सांगतात, "कृत युगात ब्राह्मणांचे स्थान अभेद्य होते. पुढे त्रेतायुगात ब्राह्मण तितके तेजस्वी राहीले नाहीत कारण त्याची तपस्या कमी झाली. त्यानंतरच्या युगात त्यांचे महत्व आणखीन कमी होत जाणार कारण ब्राह्मण त्यांचे व्रतस्थ जीवन जगण्याचे सोडून देतील. कलीयुगात ते वैश्य वृत्तीचे होतील. त्यांच्या परंपरा ते विसरतील. तरी अरे युधिष्ठीरा, आता मी जे ब्राह्मणांचे महत्व सांगणार आहे ते कृत युगातील आहे.

त्या युगात ब्राह्मणांची पुजा होत असे. राजाच्या अनेक कर्तव्यात ब्राह्मण पुजा हा एक विधी असे. आज ते तितके महत्वाचे राहलेले नाही. वेदाचे घोष करणार्या ब्राह्मणांची पुजा करणे त्याकाळात राजांसाठी एक महत्वाचा विधी होता. राजाच्या प्रदेशात रहाणार्या ब्राह्मणांना राजा लवून नमस्कार करत असतं. ते ब्राह्मण इतके सिद्ध होते कीं, त्यांच्या अध्यात्मिक सामर्थ्यामुळे राज्यावर अस्मानी संकट कधीच येत नव्हती. त्या ब्राह्मणांच्या मंत्रसामर्थ्यामुळें परचक्रांचे भय सुद्धा रहात नसे. असे उच्च दर्जाचे ते वंदनीय ब्राह्मण होते. म्हणून राजा त्या ब्राह्मणाना फार मानत असतं. ते ब्राह्मण त्यांच्या शापाने सगळी राज्ये भस्मसात करू शकत असतं. असे सामर्थ्य क्षत्रियात नव्हते. त्या ब्राह्मणांत इतर माणसांप्रमाणे इतर गुण होते, कांहीं फार रागीट होते दुर्वासासारखे, कांहीं प्रेमळ व समजूदार होते जसे गौतम, कांहीं धूर्त आणि व्यवहारी होते जसें अगस्त्य, कांहीं त्यांच्या ध्यानसाधनसाठी ख्यातनाम होते जसे वसिष्ठ, कांहीं गृहस्थाश्रमी होते जसे उद्दलक, कांहीं पशुपालन करत होते जसे उपमन्यू, कांहीं भीक मागून जगत असतं जसे याज्ञवलक्य, कांहीं त्यांच्या आपत्काळी वाटमारी करण्याबद्दल ओळखले जात होते जसे वाल्मिकी आणि विश्वामित्र, कांहीं इतरांत वाद वाढवण्यासाठी ओळखले जात होते जसे नारद मुनी, कांहीं नृत्य आणि अभिनयाबद्दल ओळखले जात होते जसे भरतमुनी, कांहीं त्यांच्या विलक्षण सामर्थ्यासाठी ओळखले जातात जसे अगस्त्य जे सागर पिऊन

टाकतात. ब्राह्मणांत विविध भूमिका निभावणारे आहेत. ते साधारणपणे सर्वगुणसंपन्न असतात. परंतु त्यांत एक गुण समान असतो व तो हा कीं, ते पंचव्रताचे पालन स्वाभाविकपणे करत असतात त्याशिवाय ब्रह्मचर्य आणि महादेवावरील श्रद्धा हे त्यांच्यात उत्कट असतात. त्यांच्या मधील मूळ ब्रह्म बीजातून झालेले (सनतकुमार, वेदाच्या देवता, ऋषी मरिची, अंगिरस, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रातू, सात मनू, सोम, अथर्व, बृहस्पति, भृगू, दक्ष, काश्यप, वसिष्ठ, कस्य, स्कंद, मार्कंडेय) ते कोणाही शक्तिला नष्ट करणे अथवा पराजित करणे शक्य नसते. त्यांच्या वंशजाना खरे ब्राह्मण समजले जाते. त्यानंतर क्षत्रियांतून (विश्वामित्र, वितहव्य) झालेले ब्राह्मण असतात. त्यानंतर द्वापार युगात आणि पुढे कलीयुगात राजे कांही ब्राह्मणांच्या नियुक्त्या करतील, ते वैश्य आणि क्षत्रिय व कांहीं शुद्रातून होणार आहेत. अशी एकंदर ब्राह्माणांच्या नियुक्तीचे परंपरा असेल. असें ब्राह्मदेव सांगतात कीं, पंचव्रतानुसार आचरण असलेले आणि ब्रह्मचर्य व्रतात रहाणारे कोणीही ब्राह्मण समजले तरी चालते. त्यात तिनही वर्णाचे मनुष्य, खालच्या देवता, सर्प वंशाचे, राक्षस वंशाचे येतात. त्याना जर तपोसामर्थ्य असेल तर गंधर्व आणि यक्ष, राक्षस, पिशाच्च बाधा करू शकत नाहीत. मूळ बिजाचे ब्राह्मण आशिर्वाद देऊन एकाद्याला देवतेचे पद प्राप्त करून देऊ शकतात. ते कोणालाही राजा करू शकतात, तसेंच शाप देऊन बरबाद करू शकतात. तसे इतर बिजाचे ब्राह्मण करू शकत नाहीत. कृतयुगात ब्राह्मणांची शक्ती कमाल असते व जसे युग खालच्या पातळीचे येते त्यांची शक्तीसुद्धा कमी होत असते. कलीयुगात नगण्य असेल. असे समजतात कीं, कलीयुगात मूळ बिजाच्या ब्राह्मणांचा निर्वंश झालेला असेल. ब्राह्मणांचा आधार शकांना यादवाना कंबोजांना, तसेंच इतर क्षत्रिय जमातींना नसतो त्यामुळे ते युद्धात आर्यांच्या पुढे हरत असतात. अशी शक्ती मूळबिजाच्या ब्राह्मणांच्या वंशजांची आहे. त्या ब्राह्मणांचा अपमान करण्यानेसुद्धा महापाप लागते म्हणजे अध्यात्मिक उर्जेचा मोठ्या प्रमाणात र्हास होतो. असे ऋषी सांगतात. त्या मुळ बिजाच्या ब्राह्मणांचा पराभव करतां येत नाही कारण त्यांत ब्रह्माची ताकद असते.

अनुशासन पर्व भाग चौतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग पस्तिसावा

भिष्म सांगतात, त्या ब्राह्मणांना नेहमी मोठ्या आदराने वागवावयाचे असते. त्यांच्या रुपाने साक्षात ब्रह्मदेव माणसांत वावरत असतो असे सांगितले आहे. त्या ब्राह्मणांना आनंदात ठेवण्यात सगळ्यांचे हित असते. अशा शुद्ध रक्ताच्या ब्राह्मणांचे राज्यात वस्तीला असणे त्या राज्यासाठी मोठे भाग्याचे समजले जाते. असे नारद सांगतात. असें समजतात, जे असा ब्राह्मण खातो ते पंचमहाभूतांना, आदित्य, सूर्य व चंद्र ह्याना मिळत असते. ज्याचा पाहूणचार ब्राह्मण घेत नाही त्याच्या वर मोठी तोहमत कोसळणार असें सांगतात. त्यांना भूदेव म्हणून ह्यासाठीच सांगतात, जर ब्राह्मण संतुष्ट झाला तर सगळे पितर संतुष्ट झाले असे समजतात. त्या मूळ बिजाच्या ब्राह्मणांचे वंशज सुद्धा उच्च कुलीन क्षत्रियापेक्षा श्रेष्ठ असतात. भृगूने त्यांच्या अध्यात्मिक तेजाने तलजंघांचा पराभव केला, अंगिरसाच्या मुलांने निप्पांचा पराभव केला. भारद्वाजांनी वितहव्यांचा पराभव केला तसेंच अलियांचासुद्धा पराभव केला. ते सगळे त्यांच्या अध्यात्मिक शक्तीच्या मदतीने केले होते.

ब्राह्मणांच्या सुप्त शक्तीबद्दल तुला सांगतो त्यासाठी वासुदेव आणि पृथ्वी ह्यांच्यातील संभाषण तुला सांगतो.

वासुदेव बोलतात, "अहो पृथ्वी माता, मला एक शंका आहे त्याचे निरसन कराल तर बरे होईल. असे काय केले म्हणजे गृहस्थाश्रमातील मनुष्य त्याच्या सगळ्या पापांचे निराकरण करू शकतो"?

पृथ्वी माता सांगते, "त्याने ब्राह्मणाची सेवा करावी आणि पंचव्रताचे पालन करावे, त्याची पापवृत्ती साफ होते. त्याची बुद्धी शुद्धी होते. त्याच्या प्रश्नांची उत्तर त्याला मिळू लागतात. त्याचा गृहस्थाश्रम समृद्ध होतो. नारदाने सुद्धा तेंच सांगितले होते फार पूर्वी. भिष्म सांगतात, पृथ्वीमातेचे ते ऐकून माधव फार छान फार छान असें उद्गारतो. म्हणून अरे कुंतीसुता , कधीही मूळ बिजाच्या शुद्ध रक्ताच्या ब्राह्मणाची पुजा करत रहा. तसे केल्याने तुझा सदैव उत्कर्ष होत जाईल. अनुशासन पर्व भाग पस्तिसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग छत्तीसावा

भिष्म सांगतात, अरे युधिष्ठीरा तू धन्य आहेस, ब्राह्मण त्यांच्या जन्मानेच धन्य झालेले असतात. त्यांचा शिजवलेल्या खाद्यांवर पहिला हक्क असतो. त्याच्या कडून पंचव्रताचे नियम (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता) शिकता येतात. त्या मुळ ब्राह्मणांना देवतांचे मुख समजले जाते. देवतांना जो प्रसाद द्यावयाचा तो ब्राह्मणांना खाण्यास देण्याची पद्धत त्यामुळे प्रचारात आली. त्याचप्रमाणे ब्राह्मणाच्या तोंडून शाप अथवा वर आला तर ते देवतेचा आहे असे समजतात. ब्राह्मणांना उत्पन्न केल्यानंतर ब्रह्माने त्यांना त्यांची कर्तव्ये कोणती ते सांगितले होते त्या प्रमाणे ते वागतील तर त्यांना ब्रह्म समृद्धी प्राप्त होतो असें समजले जाते. ब्राह्मणांने शुद्राची कामं करावयाची नसतात. तसे केल्याने त्याचे ब्राह्मतेज कमी होते. यज्ञात साजूक तुपाचे अर्घ्य देणारा ब्राह्मण लहान बालकापेक्षा श्रेष्ठ दर्जाचा परमेश्वराचा वारसदार ठरतो. रांगणारा, बोलू न शकणारा तान्हा बालक हा परमेश्वराचा वारसदार समजला जातो. त्याहीपेक्षा ब्राह्मण श्रेष्ठ असे समजले जाते. अशी माहिति ब्रह्माने स्वतः त्याच्या कवनातून गाईली आहे, भिष्म सांगतात. ब्राह्मणांना असलेल्या वाङसिद्धीमुळे ते दुर्जनाना त्रासदायक ठरतात. त्यांच्या वाणीने तो दुर्जनाचा नाश करू शकतो. ब्राह्मणांच्या शापाने अनेक क्षत्रिय समाज शुद्र ठरले आहेत. ब्राह्मणांच्या मदतीशिवाय क्षत्रिय राज्य करू शकत नाही. तू नेहमी ब्राह्मणांना भेटी देत असतोस त्यात कांहीं ब्राह्मण त्या भेटी घेत नाहीत. कारण त्या घेतल्याने ब्राह्मण देणार्याचे ऋणी होत असतात. तशामुळे त्यांचे अध्यात्मिक सामर्थ्य कमी होत असते. अशा भेटी न घेणार्या सावध ब्राह्मणांपासून तू जपून रहा. असे ब्राह्मण राजावर लक्ष ठेवण्यासाठी असतात. अशा ब्राह्मणांपासून तू तुझे राज्य सांभाळ, युधिष्ठीरा.

## - अनुशासन पर्व भाग पहिला समाप्त -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,